म. ग्रं सं. वाचनालय. ठाणे.
विषय
दा. क्र. २०००२

IRBK-0120002

वाचनालय नाटक
20002
२८/१०/८३

# म्हैस येता माझ्या घरा—

[तीन अंकी विनोदी नाटक]

वसन्त सबनीस

प्रकाशन क्रमांक ३५२

IRBK-0120002
IRBK-0120002

परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

मूल्य चार रुपये

प्रकाशक
विष्णु गजानन परचुरे
ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ २
गिरगांव, मुंबअी ४

आवृत्ती पहिली
१४ जून १९६८

नाट्य परीक्षण-मंडळाचा मंजुरी क्रमांक
डी. आर. एम् ५६९/६८
४-६-६८

© प्रतिभा सबनीस १९६८

मुखपृष्ठ सजावट
चित्रसार्वभौम
रघुवीर मुळगांवकर

छायाचित्र
दत्तू आंबेरकर

**महत्त्वाची जाणीव—**

या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क सौ. प्रतिभा सबनीस यांच्याकडे असून त्यांनी ते सध्या म्हणजे १४ जून १९६८ पासून १४ जून १९७० पर्यंत नाट्यसंपदा, मुंबई या संस्थेकडे दिले आहेत. तोपर्यंत दुसऱ्या कोणत्याही संस्थेला या नाटकाचा प्रयोग करता येणार नाही. नाट्यसंपदाने आणखी मुदतवाढ मागितली नाही तर नंतर इतर संस्थांना प्रयोग करता येईल. मात्र त्यासाठी सौ. प्रतिभा सबनीस यांना प्रयोगमूल्य पाठवून त्यांची आगाऊ लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

सौ. प्रतिभा सबनीस
८/८७ रामकृष्णनगर
खार, मुंबई ५२

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबअी ४

नाटकाचा प्रथम प्रयोग शुक्रवार, दि. १४ जून १९६८ रोजी मुंबई मराठी साहित्य संघाच्या डॉ. भालेराव नाट्यगृहात नाट्यसंपदा, मुंबई या संस्थेने रात्रौ वाजता सादर केला. या प्रयोगात काम केलेले कलाकार

मी : शंकर घाणेकर
कुटुम्ब : गुलाब कोरगावकर
बाळक्या : गजन जोशी
रघ्या : मास्टर सचिन
हंब्या : मास्टर चंद्रशेखर भावे
टांगेवाला : आनंद मातोंडकर
इंदिराबाई : सौ. मंगला पर्वते
वन्सं : सौ. शालिनी सावंत
बेडके : विजू खोटे
डॉक्टर ; वासुदेव चंद्रचूड
सुरेखा : लता रायकर
सलूनवाला : हेमचंद्र देसाई
पानवाला : दिनकर पणशीकर
वाळवणे : कमलाकर कुळकर्णी
शांडिल्य : पंढरीनाथ बेर्डे
भाजीवाला : सौ. जयश्री
गाडीवान : विलास गुर्जर
एक म्हातारा : गजानन भावे
पोलिस सब इन्स्पेक्टर : रमाकांत वेदपाठक

दिग्दर्शक : नंदकुमार रावते □ नेपथ्य : दत्ता चौडणकर
प्रकाश योजना : चंदन होनावर, बापू आंगणे □ पार्श्वसंगीत : अरविंद मयेकर
रंगभूषा : बाबा वर्दम व यशवंत मोहित □ रंगमंच व्यवस्था : राजाराम चव्हाण
व्यवस्था : दादा पराडकर □ निर्मिती प्रमुख : बिपीन तळपदे.
निर्माता : प्रभाकर पणशीकर

माझ्या वाङ्मयीन उचापतीची
शालेय जीवनापासून साक्षीदार
असलेल्या
**प्रा. यस्मीन शेख. (जेरुषा)**
या माझ्या बालमैत्रिणीस अर्पण—

# दोन शब्द

हे नाटक आहे की फार्स आहे याचे निश्चित उत्तर देणे अवघड आहे· कारण माझ्या मते ही नाट्यवस्तू नाटक, फार्स आणि काही प्रमाणात वग ह्या तिन्ही प्रकारांना थोडी थोडी स्पर्श करून जात आहे. सबब याला एकच शिक्का देता येत नाही. म्हणून विनोदी नाटक अशी ढोबळ संज्ञा देणे क्रमप्राप्त आहे.

'सुगंध'या वार्षिकात मी गेली ८-१० वर्षे सातत्याने 'कुटुम्बा'वर एकांकिका लिहीत आहे. त्या एकांकिकांतील निवडक एकांकिका एकत्र करून आणि त्यात काही पात्रांची, प्रसंगांची, संवादांची व रचनेची भर घालून 'म्हैस येता माझ्या घरा—' हे नाटक उभे केले आहे. अर्थात हे कथात्मक नाटक नाही. फार्सवजा आहे. तरीही त्यामागे एक सूक्ष्म पण गंभीर असे सूत्र आहे. ते प्रेक्षकांना जाणवेल अशी आशा आहे.

मी उभ्या केलेल्या 'कुटुम्बा'बद्दल अनेक गैरसमज आहेत. त्यांपैकी महत्त्वाचा गैरसमज म्हणजे मी हे 'कुटुम्ब' माझ्या बायकोवरून लिहिले आहे. तसे असते तर हे मी लिहिण्यास शिल्लक राहिलो असतो की नाही याची शंकाच आहे. म्हणून मी आज या निमित्ताने जाहीर करतो की या नाटकातील 'कुटुम्बा'मध्ये माझ्या बायकोप्रमाणेच इतर अनेकांच्या किंबहुना सर्व पुरुषांच्या बायका कमी अधिक प्रमाणात मिसळलेल्या आहेत. अनेक घरांतील थोडा थोडा अंश घेऊन हे 'कुटुम्ब' 'भरले' आहे !

या नाटकात पात्रांची संख्या भरपूर आहे. तेव्हा इतक्या पात्रांना परिणाम-ारकपणे सांभाळू शकणारी भरभक्कम संस्था नाटकाच्या निर्मितीसाठी मिळणे ावश्यक होते. त्यादृष्टीने 'नाट्य संपदे' ने ही जबाबदारी घेतल्यामुळें माझी पावशी चिंता दूर झाली. श्री. प्रभाकर पणशीकरांसारखा जिद्दीचा, नाटकवेडा, सछ दृष्टीचा व उत्साही निर्माता या नाटकाचा निर्माता म्हणून उभा राहिल्यावर ातीच्या बाबतीत कसलीही उणीव राहणार नाही याबद्दल मला खात्री होती.

दिग्दर्शक श्री. नंदकुमार रावते यानी या नाटकावर अतिशय मेहनत घेतली या. त्यांच्याबरोबर सर्व कलाकारानीही फार श्रम केले आहेत. त्यांचे श्रम

पाहून पाहणाराही थकून जात असे. या सर्वांचा जाहीर ऋणनिर्देश करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

श्री. दत्ता चौडणकर यांनी वातावरणानुकूल नेपथ्य उभारून आणि श्री. अरविंद मयेकर या तरुण कलाकाराने आडवळणाचे पण आकर्षक पार्श्वसंगीत देऊन नाटकाचे सौंदर्य वाढविल्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो.

प्रयोगाच्या तारखेलाच पुस्तक प्रकाशित करण्याच्या जिद्दीने माझे मित्र श्री. गजाननराव परचुरे यांनी ज्या विद्युत्वेगाने काम केले त्यांचाही मला येथे साभार उल्लेख केला पाहिजे. मुखपृष्ठाची सजावट चित्रसार्वभौम श्री. रघुवीर मुळगांवकर यानी केली. त्यांच्यासारख्या ख्यातनाम चित्रकाराने आमची निकड लक्षांत घेऊन क्षणाचाही विलंब न लावतां बाकी सर्व कामें बाजूला ठेवून त्यानी आमचें काम करून दिलें याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

नाट्यसंपदेची निर्मिती, परचुऱ्यांचे प्रकाशन आणि मौजेची छपाई असा त्रिवेणी संगम योग या नाटकाला लाभला आहे तेव्हा प्रेक्षकांच्या पसंतीचा राजयोगही त्याला लाभेल अशी आशा आहे.

१० जून १९६८ **वसंत सबनीस**

# म्हैस येता माझ्या घरा—

## अंक पहिला

म. ग्रं. ...
दा. क्र. २०००२ ... २८।१०।८३
वि. नाटक ...

(पडदा उघडतो त्यावेळी मी माइकपुढे उभा असतो. मी हा एक मध्यम वयाचा व बरीच वर्षे नोकरीत पिचलेला कारकून. नोकरीमुळे गरीब, दीनवाणा आणि घरातील दडपणामुळे केविलवाणा.)

**मी :** मंडळी, तुमची माझी तशी ओळख नाही. नसली तरी हरकत नाही. माझं नाव सांगण्याची गरज नाही. कारण अनंत कुटुंबवत्सल कारकुनांपैकी मी एक आहे. जगात नाव मिळवावं आणि सांगावं—पाळण्यांत मिळालेलं नाव सांगण्यात कसला आला आहे पुरुषार्थ ! लोक मला पंत म्हणतात, पण ते काही खरं नाव नाही माझं. तेव्हा माझं नाव न सांगताच मी आमच्या कुटुंबाची कथा तुम्हांला सांगणार आहे. तसं पाहिलं तर आमच्या कुटुंबाबद्दल शेजारी-पाजारी बरंच बोलतात. सांगण्यासारखं असेल ते तर सांगतातच पण चारचौघांत सांगण्यासारखं नसतं तेही सांगत सुटतात.

आमच्या कुटुंबात आमचं कुटुंब, मी, रघ्या आणि बंड्या एवढी आटोपशीर माणसं आहेत. अर्थात आटोपशीरपणाला कुटुंब तेवढं अपवाद. कुटुंब या शब्दामुळं तुमचा थोडासा घोटाळा होण्याचा संभव आहे. तुम्ही जिला

पाहू, धर्मपत्नी किंवा नुसतीच पत्नी म्हणता तिलाच मी कुटुंब म्हणतो. अर्धांगी म्हणूच शकत नाही, कारण अर्धांगी या शब्दाचा अर्थ कितीही ताणला तरी त्यात आमचं कुटुंब मावणं शक्यच नाहीं. आणि दुसरी गोष्ट अशी की आमच्या ह्या कलत्राचा आवाज आणि विस्तार एखाद्या भरलेल्या व वाजत्या-गाजत्या सबंध कुटुंबाएवढा आहे.

आमची जागा छोटी आहे. त्यामुळं साहजिकच कुटुंबानं व्यापून उरलेल्या जागेत आम्हा तिघाना वावरावं लागतं. सबब शरीरात आणि मनात एक प्रकारचा कायमचा संकोच निर्माण झाला आहे. त्यात कुटुंबाचा एक मावसभाऊ—त्याला सर्वजण बाळक्यामामा म्हणतात—अधून मधून वस्तीला असतोच. आपल्या मेव्हण्याचं हे घर म्हणजे आपल्या बापाचंच घर आहे असं समजून तो निःसंकोचपणे राहतो. तसा मीच कुटुंबप्रमुख असलो तरी कुटुंब प्रमुख आहे आणि घरातलं माझं स्थान सांगणं थोडसं अवघड आहे. आणि नेमका या अवघडपणाचाच फायदा घेऊन शेजारी पाजारी बेधडक सांगतात की मी कुटुंबापुढे नांगी टाकतो म्हणून. माणसानं किती खोटं बोलावं याला काही सीमा ! अहो, आमची नांगी केव्हाच तुटलेली आहे, तेव्हा ती मी टाकीनच कशी ? आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे, माणसाची भाषा संस्कारातून निर्माण होते हा कोण्या विद्वानाचा सिद्धांत आमच्या कुटुंबानं केव्हाच सिद्ध करून दाखवला आहे. आमच्या कुटुंबाची भाषा शब्दसंपत्तीसुद्धा संस्कारा-तूनच निर्माण झाली आहे—फक्त ती अंत्यसंस्कारातूनच निर्माण झाली आहे इतकंच.

अशा या आमच्या कुटुंबासमवेत जगावं लागणारं कौटुंबिक जीवन कसं असेल याची तुम्हांला कल्पना यायची नाही. तुम्ही हळूच माझ्या मागून या —पण दुरूनच आमच्या घरात डोकवा. मेहेरबानी करून कुटुंबाच्या वाटेला मात्र जाऊ नका. परिणामाची जबाबदारी मी घेऊ शकत नाही. तुम्ही निघा लगेच. गडबड करू नका. हळूच या. पाऊल वाजवू नका...तोंड वाजवू नका...प्रश्न विचारू नका...या असे सरळ...या...या...या...पण गंमत बघायची ती दुरूनच—

(मी जातो आणि त्याच वेळी मागचा पडदा उघडतो. आतल्या बाजूस दोन खोल्यांच्या बिऱ्हाडातली एक खोली दिसते. खोलीत पसारा. एक कॉट, एक टेबल, दोन तीन जुन्या खुर्च्या. पुस्तकाचं शेल्फ म्हणायचं पण त्यात पुस्तका-

बरोबर बाटल्या, जोडे, रद्दी, एखादा कपडा इत्यादी अनंत वस्तू ठेवलेल्या नव्हे कोंबलेल्या आहेत. भिंतीवर रंग उडालेले—भरत कामाचे एक दोन नमुने, कॅलेंडर पण पाने फाटलेली, जुनी छत्री, खुंटाळ्यावर काही मळकट व काही स्वच्छ कपडे, टेबलावर पुस्तके आणि इतरत्र सटरफटर सामान. उजवीकडे समोर खोलीचे मुख्य दार. भिंतीला खिडकी. डावीकडे स्वयंपाक घरात जाण्याचे दार. त्यातून स्वयंपाकघराचा ओझरता भाग दिसतो. कुटुंब हातात नुकतीच मिळालेली लग्नाची एक आमंत्रणपत्रिका घेऊन घाईघाईने बाहेरच्या दारातून आत येते. तेच मुळी आरडाओरड करीत.)

**कुटुंब** : अरे, रघ्या, बंड्या—मेली कुठं तडफडलीत जाऊन कुणास ठाऊक ? रघ्या—मेल्यांनो कान फुटलेत का तुमचे ? पाणी द्यायलासुद्धा वेळेवर यायचे नाहीत—रघ्या...बंड्या...

(बाळक्या बाहेरून येतो. बाळक्या हा २२—२३ वर्षांचा बेकार तरुण. पंतांचा म्हणजे 'मी' चा मेव्हणा. कुटुंबाचा मावसभाऊ, पोर लाडात वाढल्याने बिघडलेलं. फिल्म स्टोरी लिहून किंवा हिंदी पिक्चरमध्ये हीरो बनून पैसा मिळविण्याची बिनडोक कल्पना उराशी बाळगून फिरणारा. त्याच्या बोलण्याचालण्यात व हावभावात हिंदी चित्रपटाची विलक्षण छाप आहे.)

**बाळक्या** : (येता येता) मी आलो आहे—मैं आया हूं दिदी...तुला पाणी हवय ना ? मी देतो—

**कुटुंब** : मेल्या अजून शेवटची घटका आली नाही माझी—रघ्या, बंड्या कुठं आहेत ?

**बाळक्या** : मघाशी होते इथंच...

**कुटुंब** : तूं काय करीत होतास बाळक्या बाहेर ?

**बाळक्या** : मी बाहेर गॅलरीत उभा होतो...कुछ सोच रहा था...फिल्म स्टोरी की बारे में...

(कुटुंब चिठ्ठी पाहून विचारात पडले आहे)...

तुम क्या सोचती हो दिदी...

**कुटुंब** : मी सोचते आहे लग्नाची चिठ्ठी

**बाळक्या** : लग्नाची चिठ्ठी ? किसकी शादी है दिदी ?

**कुटुंब** : यम्नीची...

**बाळक्या** : यम्नी...याने जमुना...जमुना कौन है ? कहाँ रहती है ?

कुटुंब : यम्नी म्हणजे माझ्या चुलत बहिणीच्या मामे बहिणीची भाची...
कळलं ?

बाळक्या : पूरा समझमे नही आया लेकिन—

कुटुंब : मेल्या लेकिन अन् फेकीन करू नकोस—मला लग्नाला जायचंय सोलापुरला—

बाळक्या : जरूर...जरूर...शादी एक खूबसूरत चीज होती है दिदी. शादी का मायना होता है दो दिलो का संगम...मोहब्बत की रोशनी...

कुटुंब : तुझी रोशनी बिशनी घाल मेल्या चुलीत. मी रघ्या, बंड्याला घेऊन जाणार आहे...तू येणार आहेस का माझ्याबरोबर ?

बाळक्या : नही...दिदी मै नहि आ सकूंगा...मला दोघा तिघांना भेटायचं आहे पिक्चरच्या संबंधात...पिक्चरचं काम म्हणजे बडा जिम्मेदारीका मामला रहता है दिदी...चान्स केव्हा मिळेल ते काय सांगता येतं ?

कुटुंब : म्हणजे तू येत नाहीस—

बाळक्या : म्हणजे काय दिदी...एकदा पिक्चरमध्ये गोळी लागली की मग सोलापुरलाच काय पण पंढरपुरलासुद्धा येईन मी तुझ्याबरोबर...मला पिक्चर-मध्ये काम तरी मिळालं पाहिजे नाहीतर माझी छोरी तरी गेली पाहिजे...

कुटुंब : तुझी छोरी काय सावकाश जाईल—मला मात्र वेळेवर सोलापुरला गेलं पाहिजे.

बाळक्या : केव्हा जाणार आहेस तू ?

कुटुंब : उद्या सकाळी निघालंच पाहिजे...म्हणजे लगेच तयारीला लागलं पाहिजे...रघ्या, बंड्याला आण शोधून आधी—

बाळक्या : जरूर... (निघतो. दारापाशी थांबतो)...दिदी...एक बात पूछू ?

कुटुंब : काय ?

बाळक्या : तुम तो कल जा रही हो...म्हणजे चारसहा दिवस तू इथं नसणार...

कुटुंब : मग ?

बाळक्या : तसं नव्हे...बात यह है की...माझ्याजवळ पैसे कमी आहेत...म्हणजे काय आहे की फिल्मवाल्यांना भेटायला जायचं म्हणजे जरा नीटनेटकं—रुबाबात गेलं पाहिजे...

कुटुंब : म्हणजे तुला पैसे पाहिजेत—असंच ना ?

वाळक्या : बडी हुश्शार आहेस दिदी...दिदी, खरं सांगू?...(गातो) तुमसे अच्छा कोन है...तुम हमे पहेचान लो...दिदी, जादा नहि सिर्फ पाँच रुपिया दे दो...

कुटुंब : मेल्या ऊठसूठ पैसे मागतोस माझ्याकडं...

वाळक्या : एकदा मला पिक्चरमध्ये काम मिळू दे नाहीतर माझी ष्टोरी जाऊ दे...तुला पैशातच बुडवून टाकतो. मग तूच म्हणशील, मेल्या, काय करू मी इतक्या पैशाचं? अग पंताना मागायचं धाडस होत नाही म्हणून तुझ्याकडं मागतो इतकंच...मग देशील ना पाच रुपये दिदी?

कुटुंब : देईन बरं बंधुराजा...जायच्या आधी देईन–कळलं?

वाळक्या : वाहवा! दिदी कबीर हाच सर्वांत मोठा कवी आहे हे आज पटलं मला...कारण तो म्हणतो–

> **आसमान गिरने लगे तो गिरना दो**
> **धरती टूटने लगी तो टूटने दो**
> **लेकिन बडी बेहेनका बडा सहारा**
> **जो कभी कभी न छूटने दो—**

(जाता जाता) मी रघ्या, बंड्याला पाठवून देतो लगेच...(जातो)

कुटुंब : (ओरडून) त्यांना म्हणावं असाल तसे घरात या आधी...

(आंत जाऊन एक ट्रंक घेऊन येते. ती ठेवते. दुसरी ट्रंक आणण्यासाठी म्हणून वळते तेवढयात रघ्या व बंड्या येतात. रघ्या वय वर्षे १०–११. कपडे मातीनं मळलेले, ढोपरांना माती लागलेली, हात मातट, हाफ शर्टाच्या बाहीला तोंड पुशीत येतो. त्याच्या मागोमाग बंड्या वय वर्षे ७–८. नमुना तोच. शर्टाचा मागचा भाग चड्डीत खोचलेला. पुढचा भाग चड्डीच्या बाहेर व त्या भागाने घाम पुशीत येतो.)

रघ्या : काय ग आई?

कुटुंब : मेल्यानो, कुठं उंडारताय कुत्र्यासारखे?

बंड्या : चौकात गोट्या खेळत होतो.

कुटुंब : चुलीत घाला त्या गोट्या—

रघ्या : तू आपलं सगळं चुलीत घालतेस नेहमी. गोष्टीची पुस्तके वाचायला लागलो तर ती चुलीत घाला, विटीदांडू खेळायला लागलो तरी म्हणतेस चुलीत घाला तो विटीदांडू, उद्या आम्हाला सुद्धा म्हणशील की चुलीत घाला कार्ट्यांना—

**कुटुंब :** रघ्या, फाजीलपणानं बडबडू नकोस उगीच. मेल्यांनो, सदा न् कदा त्या गोट्या—दुसरा धंदाच नाही जसा काही. उद्या आई मेली तरी गोट्या खेळत बसाल.

**रघ्या :** त्यावेळी मुळीच खेळणार नाही. बघ हवं तर—

**बंड्या :** आमचा डाव अर्धाच राहिला आहे तिकडं...कशाला बोलावलंस आम्हाला ?

**कुटुंब :** बोलावलं होतं माझं डोकं शेकायला—का ?

**रघ्या :** हॅट, शक्यच नाही ते—

**कुटुंब :** कां रे मेल्या, का शक्य नाहीं ?

**रघ्या :** कारण बाबा परवा त्या चिंतूकाकांना सांगत होते की, आमच्या रघ्याच्या आईला डोकं नाही म्हटलं तरी चालेल. मग आम्हांला ते शेकायला तू बोलावशीलच कशी ?

**कुटुंब :** रघ्या, मेल्या खरं सांग–असं म्हणाले तुझे बाबा ?

**रघ्या :** तुझ्या शप्पथ असं म्हणाले.

**कुटुंब :** लाजाच गुंडाळल्या आहेत सगळ्यांनी—आता येऊ देत तर घरी म्हणजे सांगते कुणाला डोकं आहे आणि कुणाला नाही ते—

**रघ्या :** पण आम्हांला कशाला बोलावलंस ते सांग ना ?

**कुटुंब :** मेल्यांनो, ही लग्नपत्रिका बघा. तुमच्या चुलत मावशीच्या मामेबहिणीच्या भाचीचं म्हणजे यम्नीचं लग्न आहे सोलापुरास. उद्या जायचंय आपल्याला.

**बंड्या :** आपल्याला म्हणजे कुणाकुणाला ?

**कुटुंब :** आपल्याला म्हणजे मला आणि तुम्हांला दोघांना—

**बंड्या :** आणि बाबा ?

**कुटुंब :** माझ्या माहेरचं लग्न. तुझ्या बाबांचं काय गाठोडं आहे तिथं ? आणि कार्ट्यांनो, ते मला बिनडोक म्हणतात तरी तुम्हांला त्यांचाच पान्हा फुटतोय ना ? इतके कसे मुर्दाड झालात म्हणते मी ? चला, मुकाट्यानं कपडे आवरायला लागा.

**रघ्या :** अग पण आई उद्या जायचंय ना आपल्याला ?

**बंड्या :** मग खूप वेळ आहे. चल रे दादा खेळायला—

**कुटुंब :** काही नाही जायचं आता खेळायला—

**रघ्या :** अग पण मुलं चिडवतात आम्हांला अर्धा डाव सोडून आलो तर— भागूबाई पळाली असं म्हणतात.

म्हैस येता माझ्या घरा—

कुटुंब : म्हणू देत – पण आता जायचं नाही.

रघ्या : जाणार जा (निघतो).

कुटुंब : रघ्या, मागं फीर – पाय मोडून टाकीन—

रघ्या : (चिडून तणतणत मागे येतो) मोडा एकदा, आमचे पाय मोडा, हात मोडा, मान मोडा, कंबर मोडा – सगळं काही मोडून टाका—

कुटुंब : फार सुटलीय जीभ !

रघ्या : मग काय तर ? परवा नंदीबैल बघायला निघालो तेंव्हासुद्धा असंच म्हणालीस – गेलास तर म्हणे तंगडी मोडीन—

कुटुंब : मग – नंदीबैलाला काय बघायचंय ? आरशात बघा म्हणजे दिसेल तुम्हाला नंदीबैल.

रघ्या : हॅट, आम्ही काय नंदीबैलासारखे आहोत होय ! खरं पाहिलं तर तूंच आहेस गबदूल नंदीबैलासारखी. (रघ्याच्या थोबाडीत बसते. रघ्या वाजवीपक्षा मोठ्यानं रडतो )

कुटुंब : मेल्यांना, ताळतंत्र म्हणून काही राहिलेलं नाही. (बंड्याला) आणि तू रे बैलोबा – उभा का राहिला आहेस नुसता ? तुला सांगितलं ना कपडे आवरायला ?

बंड्या : अग पण डाव अर्धाच राहिला आहे ना आमचा—

कुटुंब : गाढवांनो, कानडीत का सांगितलं आता ? (बंड्याच्याही पाठीत धपाटा) कार्टी नुसती गिळायला आहेत. कामाला हात लावतील तर ह्यांच्या बापाची बाभळ बुडेल जशी काही. मलाच मेलं पाहिजे सगळीकडं... (रागारागाने आत जाते.)

बंड्या : (रघ्याच्याजवळ जाऊन) दादा लागलं का रे तुला ?

रघ्या : हॅट—

बंड्या : मग इतक्या मोठ्यानं रडलास तो ?

रघ्या : अरे आधीच मोठ्यानं रडलं म्हणजे जास्त मार बसत नाही. हे टेक्निक आहे—

बंड्या : आई आत गेली आहे तेवढ्यात जाऊ या का पळून ?

(तितक्यात कुटुंब एक ट्रंक घेऊन येते. ठेवते. दोन्ही पोरं लगेच रडण्याचं व मुसमुसण्याचं सोंग करतात. कुटुंब पुन्हा आत जाते, ते गेल्याचं पाहून)

बंड्या : मग काय करायचं रे दादा ?

रघ्या : प्रार्थना करायची—

**बंड्या** : प्रार्थना ? कमाल आहे तुझी – आता प्रार्थना ?

**रघ्या** : हो – प्रार्थना करायची देवाची.

**बंड्या** : ती कशासाठीं ?

**रघ्या** : बाबा बाहेरून लौकर यावेत आणि आईबाबांचं भांडण व्हावं म्हणून...

**बंड्या** : भांडण व्हावं म्हणून प्रार्थना करतात होय कधी ?

**रघ्या** : तुला कळत नाही बंड्या. अरे आईबाबांचं भांडण सुरू झालं एकदा की मग आपल्याकडे कुणाचंच लक्ष जाणार नाही. मग आपण पळायचं...

**बंड्या** : होय रे होय...माझ्या लक्षातच आलं नाही – चल करू या प्रार्थना आपण...(दोघेही डोळे मिटून बसतात.)

**दोघेही** : देवा, परमेश्वरा बाबा बाहेरून लौकर येऊ देत आणि आईबाबांचं भांडण होऊं दे...बाबा बाहेरून लौकर येऊ देत आणि आईबाबांचं भांडण होऊ दे...(कुटुंब आतून दुसरी टूंक घेऊन येते. पोरं गप्प बसतात. पोरांना डोळे मिटून बसलेली बघितल्यावर टूंक आपटते)

**कुटुंब** : मेल्यानो, इथं डोळे मिटून झोपा घेताय आणि कपडे आवरायला सांगितलं तर जिवावर येतंय तुमच्या (दोघांनाही दोन धपाटे मिळतात. दोघांची रडारड. तेवढ्यात मी बाहेरून येतो)

**मी** : अग, पोरांना का मारतेस अशी ?

**कुटुंब** : मला डोकं नाही ना, म्हणून मारते – समजलं ?

**मी** : समजलं – पण त्यांना मारून का ते येणार आहे ?

**कुटुंब** : (उसळून) लाजा कशा वाटत नाहीत म्हणते मी ? सगळ्या गावाला सांगत सुटता की रघ्याच्या आईला डोकं नाही म्हणून – इतकी मी मरमर मरते आहे तुमच्यासाठी – त्याची तरी काही लाज धरा.

**मी** : अग पण—

**कुटुंब** : काही एक बोलू नका तुम्ही – त्या चित्या फडणिसाला तुम्हीच ना सांगितलंत ?

**मी** : अग ते चिंतोपंत केवढे, तू केवढी – आणि त्यांना बेशक चित्या म्हणतेस ? (रघ्या व बंड्या एकमेकांना खुणावून पळ काढतात.)

**कुटुंब** : एकदा नाही दहादा म्हणीन. त्याच्या बापाची भीती आहे की काय मला ? प्रत्यक्ष नवरा आपल्या बायकोला डोकं नाही म्हणून सांगतो आणि तो मेला इतका म्हातारा झाला तरी मुकाट्यानं ऐकून घेतो ?

**मी :** अग तुझा गैरसमज झाला आहे काहीतरी. कुणी सांगितलं —ंज्या, पाटा,

**कुटुंब :** तुमच्याच कार्ट्यानं. त्या मेल्या रघ्यानं सांगितलं. बोला खरं यु. की नाही ते ? आता का वाचा बसली तुमची ?

**मी :** अग मुलांना काय कळतंय ? ती आपल्याच नादात असतात—काहीतरी भलतंसलतं ऐकतात आणि त्यावर तू विश्वास ठेवतेस ?

**कुटुंब :** मला खात्री आहे—तुम्ही नक्कीच म्हणाला असाल असं—

**मी :** हे बघ तूं अशी संतापत जाऊ नकोस—तुझं ब्लड प्रेशर वाढेल अशानं—

**कुटुंब :** वाढू दे वाढलं तर—त्यात तुमच्या काकाचं काय जातंय ?

**मी :** माझ्या काकाचं काहीही जाणार नाही. पण आधीच तुझं शरीर हे असं वाढलेलं त्यात ब्लड प्रेशर वाढलं तर—

**कुटुंब :** तुम्हाला माझं काहीच वाढलेलं खपत नाही मेलं—

**मी :** तुझ्यापुढं कसं बोलावं हेच कळत नाही मला—

**कुटुंब :** नाहीच कळायचं. माझ्याबद्दल दुसऱ्यापुढं काय बोलावं तेवढं बरीक चांगलं कळतं तुम्हाला. मेली मी झिजतेय चंदनागत (मला हसू आवरत नाहीं) हसायला काय झालं तुम्हाला ?

**मी :** आता हसण्यासारखंच बोलतेस तूं—आणि मला विचारतेस हंसायला काय झालं म्हणून ?

**कुटुंब :** हो...मीच हसण्यासारखं बोलते. विदूषक आहे ना मी ? मी कोलांट्या उड्या मारते—मग का हसू नये तुम्ही ? हसा—पोटभर हसा—पोट धरधरून हसा—अगदी अस्वलानं गुदगुल्या केल्यागत हसा—

**मी :** अग तसं नाही—

**कुटुंब :** नाही कसं ? तसंच आहे. मी झिजते म्हणून हसा, मला डोकं नाही म्हणून हसा आणि शेवटी मी मेले म्हणून सुद्धा हसा—

**मी :** हसण्याचं सोडून दे—चहा तरी मिळणार आहे की नाही मला ?

**कुटुंब :** करा आणि प्या...

**मी :** मी करू ?

**कुटुंब :** हो करा मुकाट्यानं—मला वेळ नाही. मला तयारी करायची आहे.

**मी :** तयारी ? कसली ?

**कुटुंब :** दुसऱ्या कुणाच्या अंत्ययात्रेची नाही. माझीच—

**मी :** (संपूर्ण बुचकळ्यात) तुझी ?

बंड्या : घर्घताय काय असे वेंधळ्यासारखे? मी उद्या सोलापुरला जाणार आहे.

र : सोलापूरला? सोलापुरात काय आहे विशेष?

कुटुंब : आहे माझं श्राद्ध सोलापुरात—काय म्हणणं आहे तुमचं?

मी : मग जायलाच हवं तुला—

कुटुंब : तुम्हाला काय बरंच झालं—केव्हा एकदा हिचं श्राद्ध होतंय आणि केव्हा एकदा आपण मोकळे होतोय् असं वाटत असेल नाही तुम्हाला?

मी : आता श्राद्धाची गोष्ट कुणी काढली? तूच काढलीस ना?

कुटुंब : (वेडावून) म्हणे तूच काढलीस—(सरळ) नीट ऐका—माझ्या चुलतबहिणीच्या मामेबहिणीच्या भाचीचं म्हणजे यम्नीचं लग्न आहे सोलापुरात. मघाशीच लग्नचिठ्ठी आली आहे.

मी : हो...पण तुझ्या चुलतबहिणीच्या मामेबहिणीची भाची—तिच्या लग्नाला काही गेलंच पाहिजे असं नाही.

कुटुंब : पण मी आगंतुक म्हणून का जाते आहे? चांगली छापील लग्नचिठी आली आहे.

मी : लग्नचिठी आली म्हणून प्रत्येक लग्नाला का जातात कधी? अगत्याचं पत्र नको का?

कुटुंब : अगत्य काय पत्रात असतं? (लग्नचिठी दाखवीत) बघा एकदा डोळे उघडून काय लिहिलंय ते...अगत्य येण्याचे करावे...आहे ना अगत्य त्यात? शिवाय बाळक्याचंही तसंच मत पडलं.

मी : तसं नव्हे...जायचं म्हणजे पैशाचा प्रश्न आहे.

कुटुंब : जेव्हा तेव्हा मेला तुमचा पैशाचा प्रश्न. तो कधी सुटलाय का? उद्या मी मेले तरी पैशाचा प्रश्न म्हणून अडून बसाल तुम्ही—

मी : छेः छेः अशा वेळी पैशाकडे का बघतं कुणी? अग जो रीतसर खर्च आहे तो करायलाच पाहिजे.

कुटुंब : मला सोलापुरास जाऊन यायला खर्च तो मेला काय मोठा येणार आहे? पन्नास—पंचाहत्तर रुपड्यांचा प्रश्न. मी, रघ्या अन् बंड्या—

मी : म्हणजे पोरांनाही नेणार आहेस की काय?

कुटुंब : मग काय इथंच ठेवू त्याना उंडारायला? पोरं माझ्या नजरेत असली म्हणजे ठीक असतात.

मी : अग पण आज तारीख कोणती? पैसे कुठून आणायचे याचा काही विचार?

**कुटुंब** : त्यात विचार तो काय करायचा? सरळ बँकेत जा आ‍ सतरंज्या, पाटा, आणा. मला एवढी हौस आहे प्रवासाची—पण कधी नेलत का दार्जि. जायचंय काश्मीरला—उटकमंडला? म्हणून मी आपली मेली इकडचा तिकडचा लह। प्रवास करून ती हौस भागवून घेते तर ते सुद्धां बघवत नाही तुम्हाला.

**मी** : पुन्हा मुलांची शाळा बुडेल—

**कुटुंब** : बुडाली तर बुडाली—वाहून तर नाही ना जायची? शाळा शाळा ती काय मेली—नाही तरी मेले मास्तर चार चार दिवसांची सुटी काढतात तेव्हां होतंच की नाही पोरांचं नुकसान?

**मी** : तुला कसं सांगावं—

**कुटुंब** : ते नाही ना कळत? मग मुकाट्यानं मी सांगते ते ऐका. माझी ट्रंक आणून द्या आणि चहा करायला जा (मी घुटमळतो) जा म्हणते ना—(मी जातो) रध्या, बंड्या... (इकडे तिकडे पाहते) मेली डोळा चुकवून केव्हा पळतात तेच कळत नाही. रध्या...(दोघेही येतात) कारट्यांनो, तुम्हांला बाहेर जाऊ नका म्हणून बजावलं होतं तरी उलथलात ना बाहेर? मुर्दाड मेले—

**रध्या** : मग इथं बसून काय करायचं? तुमचं भांडण ऐकायचा कंटाळा येतो आम्हाला.

**बंड्या** : अन् झालंच तर ते पलिकडचे मिशावाले फडकेकाका विचारतात आम्हांला सारखं की, आज आईचं आणि बाबांचं भांडण कशावरून झालं म्हणून? मग सांगावं लागतं आम्हाला—

**कुटुंब** : शेजाऱ्यांना मेल्याना चोंबडेपणाशिवाय दुसरं काही सुचतच नाही.

**रध्या** : अन् रानडीणकाकू सुद्धा विचारतात मला. त्या परवाच विचारत होत्या की रध्या, आई मारते का रे बाबांना?

**कुटुंब** : रध्या, मेल्या—

**रध्या** : तुझ्या अन् बाबांच्या गळ्याशप्पथ असं विचारत होत्या. अन् म्हणत होत्या, सोन्यासारखी पोरं आहेत; पण ही बया—म्हणजे तू—सारखी डरकाळ्या फोडीत असतेस—

**कुटुंब** : असं म्हणाली ती पांढरी रानडीण? मेलीला जा म्हणावं आता दारावरनं चांगले दात पाडून हातात देईन.

(याच वेळी मी ट्रंक घेऊन येतो. ट्रंक तशीच हातात धरून)

**मी** : माझ्या दातांनी काय केलं तुझं?

बंड्या. 'ब' तुमच्या दातांबद्दल नाही म्हटलं—ठेवा ती ट्रंक खाली.

र : ट्रं ठेवतो. तीन्ही ट्रंका बघतो)

कु : म्हणजे सगळ्या ट्रंका नेणार आहेस की काय तू? चार दिवसासाठी तर जायचंय्—

कुटुंब : मी लग्नाला जातेय—कुणाच्या मर्तिकाला नाही जात. चार नव्या साड्या नकोत न्यायला?

मी : पण तुझ्या त्या चार नव्या साड्या एका ट्रंकेत सहज मावतील—

कुटुंब : चार म्हणजे काय अगदी मोजूनच चार साड्या न्यायच्या असतात का? दहा मोठी माणसं तिथं यायची—चार दिवस मी काय त्याच त्याच साड्या नेसून हिंडू? इतकं का दळिद्र आलं आहे मला!

मी : अग पण तीन ट्रंका न्यायच्या म्हणजे त्रासाचं नाही का व्हायचं?

कुटुंब : त्यात कसला आला आहे त्रास? मी काय त्या माझ्या डोक्यावरनं नेणार आहे थोड्याच?

मी : पण हमालीचा खर्च तरी—

कुटुंब : एवढा तिकिटांचा खर्च करायचा—त्यात हमालीचा का जड आहे?

मी : नाही म्हटलं तरी दोन हमाल लागतील—

कुटुंब : स्टेशनावर पांच-पंचवीस हमाल असतात. आणि हाक मारल्याबरोबर दहाजण धावत येतील. दोन हमाल मिळायला का अडचण पडणार आहे?

मी : असं कर—मी तुला एका ट्रंकेत सगळे कपडे बसवून देतो...

कुटुंब : काही नको—बोहारणीसारखे कपडे कोंबता तुम्ही ट्रंकेत...कपडेच काय पण मलासुद्धा ट्रंकेत घालाल तुम्ही.

मी : मला ट्रंकांचा विध्वंस करायचा नाही इतक्यात—

कुटुंब : शब्दानं शब्द वाढवण्याची खोड काही जात नाही तुमची—आधी सामान आणा भरायला—

मी : अग पण तूं उद्या सकाळी जाणार आहेस ना?

कुटुंब : मग आयत्या वेळी का धावपळ करायची? तुम्हाला कुणालाच कामं नकोत करायला...(आम्ही तिघेहि तसेच उभे राहातो) ऐकत काय उभे राहिलात? रघ्या, बंड्या आणि तुम्ही सुद्धा मुकाट्याने कपडे आणि सामान भरायला लागा. (मी आणि पोरं आतल्या खोलीतून ट्रंक आणतो) हं ठेवा या बाजूला...(मी सर्व ट्रंका उघडून ठेवू लागतो आणि पोरं घरातल्या हाताला लागतील त्या वस्तु आणून ट्रंके-

जवळ टाकतात. त्यांत विस्कटलेलीं धोतरं, साड्या, ओले कपडे, सतरंज्या, पाटा, वरवंटा, विळी, चाळणी, कपबशा.. सगळं काही असतं) मेल्यानो, गावाला जायचंय फक्त मला...जप्ती नाही आली घरावर...

(पण पोरं थांबत नाहीत. अगदी सूड घेतल्यासारखी धावत जाऊन कपडे आणून रचीत राहतात. याच वेळी मागचा पडदा खाली येतो आणि मी पुढच्या बाजूस येऊन पुन्हा माइकपुढे उभा राहतो.)

**मी** : मंडळी, हे आमचं कुटुंब प्रकरण असं आहे. मला माहीत आहे—तुम्ही मला विचारणार पुढं काय झालं म्हणून...दुसरं काय व्हायचं ? मी मुकाट्यानं कुटुंबाची प्रवासयोजना मान्य करतो. दिवसभर मी आणि पोरं प्रवासाची योजना करण्यासाठी गुरासारखे राबतो. जेवणाचे हाल असतात. झोपेचे धिंडवडे निघतात. रात्रभर डोळ्याला डोळा लागत नाही. कारण ट्रंका भरण्याचे काम अखेरच्या क्षणापर्यंत चालूच असतं. दर दहा मिनिटांनी आमच्या कुटुंबाला एकेका वस्तूची आठवण येते. मग सगळे दिवे लावून ती वस्तू शोधून ट्रंकेत टाकीपर्यंत अर्धा तास सहज जातो. असं पहाटेपर्यंत चालू असतं. पहाटे जरा कुठे डोळा लागतो न लागतो तोच ट्रंकांची आदळआपट ऐकू येते. ती सगळ्या ट्रंका उघडून बसलेली असते. तिनं म्हणे रात्रभर विचार करून ट्रंकांतल्या सामानाची पुनर्रचना करण्याचे ठरविलेले असते. आता पुनर्रचना म्हटली की त्रास आलाच – मग ती राज्यांची असो नाहीतर ट्रंकांची असो. चहा, दूध असल्या क्षुद्र गोष्टींचं नांव काढण्याची कुणालाच छाती होत नाही. माझी स्थिती तर फारच बिकट होते – मी घाईघाईनं आंघोळ करून येतो. पण माझे कपडेच सापडत नाहीत. सबब मी फक्त टॉवेल गुंडाळून घरभर कपडे शोधीत फिरत असतो. तिकडं गाडीची वेळ जवळ येत असते. इकडं टॉवेल सुटण्याची धास्ती असते. माझ्या अव्यवस्थितपणाबद्दल कुटुंबाची शब्दपंचमी चालूच असते. माझेही कपडे ट्रंकांतून भरले गेलेले असतात. बऱ्याच वेळाने दोन ट्रंका भरून शिव्या आणि माझे कपडे परत मिळतात. असे यातनामय पाच सहा तास गेल्यावर गाडीची वेळ येऊन ठेपते. परिस्थितीत म्हणण्यासारखा फरक पडलेला नसतो.

(मी जातो. मागचा पडदा वर जातो. तीन भरलेल्या ट्रंका, डबे, एक पसरलेला होल्डाल, छत्री, फिरकीचा तांब्या, टिफीन कॅरिअर, टोपली, मोठा थर्मास, वगैरे सामान पडलेले असते. बंडू ट्रंक भरण्याच्या उद्योगात आहे. उगाच तांब्या, टिफीन कॅरिअरच्या जागा बदलतो. तेवढ्यात कुटुंब नवी साडी नेसून येते.)

कुटुंब : मेली कुठली गोष्ट कधी वेळेवर मिळायची नाही या घरात. मेल्या, माझा ब्रश दिसत नाही तो—जा घेऊन ये (बंड्या जातो आणि मोरी घासायचा ब्रश घेऊन येतो.) मेल्यानो, तुमची टाळकी तर फिरली नाहीत ना? गवड्या, मला दात घासायचा ब्रश पाहिजे—यानं का मेल्या दात घासतात कुणी?

बंड्या : हत्तीचे दात याच ब्रशानं घासत असतील नाही दादा?

कुटुंब : माझे दात काय हत्तीच्या दातासारखे आहेत? आणि कायरे डोंब्र्या, माझं गंगावन पाहिलंस का कुठं?

बंड्या : गंगावन? गंगावन म्हणजे काय?

कुटुंब : डोंबल तुझं. रघ्या...रघ्या...(रघ्या डोळे चोळत येतो) गंगावन पाहिलंस?

रघ्या : आपल्या घरात वृंदावन आहे का तरी? काहीतरी विचारायचं आपलं—

कुटुंब : वृंदावन नाही मेल्या, गंगावन—

रघ्या : म्हणजे ते खोटे केस होय?

कुटुंब : कुठे पाहिलेस का ते सांग मुकाट्यानं? खरे का खोटे विचारलंय् कुणी तुला?

रघ्या : परवा तू डोक्यातून काढताना पाहिलं मी...(मी येतो.)

मी : काय झालं आतां?

कुटुंब : माझं गंगावन पाहिलंत का तुम्ही तरी?

मी : मी? मी तुझ्या केसालासुद्धा धक्का लावला नाही कधी आजपर्यंत—

कुटुंब : मेलं घरात लक्ष म्हणून द्यायचं नाही कधी. तरी कालपासून सगळ्यांच्या कानीकपाळी ओरडते आहे...तो होल्डाल तरी बांधणार आहात का कुणी? (मी मुकाट्यानं होल्डाल गुंडाळून बांधू लागतो) जरा नीट बांधा—नुसती तिरडी आवळल्यासारखा नका बांधू...(कुटुंब धडाधड ट्रंका बंद करून बिनकिल्ल्यांची कुलपे बंद करते आणि मग कमरेला किल्ल्या शोधते. आजूबाजूला शोधते.)

मी : काय पाहिजे तुला आता? काय शोधतेस?

कुटुंब : घराचा उकिरडा करून टाकलाय मेला सगळ्यांनी...

मी : आम्ही लाख उकिरडा केला—पण तू का अशी कोंबडीसारखी उड्या मारतेस?

कुटुंब : कुलुपं बंद केलीत...किल्ल्या कुठाहेत?

मी : ट्रंकेत तर ठेवल्या नाहीस ना तूं?

**कुटुंब** : मी लाख ठेवल्या असतील—पण तुम्ही कशाला आणलीत कुलपं...? हा तुमचा वेंधळेपणा...हज्जारदा सांगितलं तुम्हाला की किल्ल्या का घेऊन बंद करायची कुलपं आणू नका म्हणून...आता ह्या किल्ल्या सापडायच्या कधीं आणि मला गाडी मिळायची कधी?

**मी** : रघ्या, बंड्या ट्रंकेच्या किल्ल्या शोधा पाहू पटकन—

(आम्ही तिथे किल्ल्या शोधण्याचा कार्यक्रम करतो. किल्ल्या सांपडत नाहीत अशी खात्री पटताच मी घाईघाईने हातोडी आणतो आणि धडाधड कुलुपे फोडतो. रघ्या, बंड्या आतल्याच खोलीत असतात. ते धावत येतात.)

**बंड्या** : अग आई, किल्ल्या सापडल्या...अग तूच नाही का रात्री दादाजवळ ठेवायला दिल्या होत्यास हरवू नयेत म्हणून! (रघ्याही येतो.)

**कुटुंब** : (बंड्याच्या पाठीत धपाटा घालून) मेल्या कुलुपं फोडली एवढी, तोपर्यंत तुझी काय वाचा बसली होती? आणा ती हातोडी इकड—काटर्यांचं टाळकंच शेकून काढते चांगलं—आणि तू रे मेल्या रघ्या—

**रघ्या** : आमच्या लक्षातच राहिलं नाही किल्ल्या आमच्याजवळ आहेत ते—

**कुटुंब** : (त्यालाही एक रपाटा) मेल्या एवढी आठवण रहात नाही म्हणजे काय?

**रघ्या** : पण तुला तरी कुठं राहिली होती आठवण! तूच दिल्या होत्यास ना आमच्याजवळ किल्ल्या? आम्हाला आठवलं नाही तर मारता लगेच—
(हे सहन न होऊन रघ्याच्या आणखी एक तोंडात बसते)

**कुटुंब** : लहान नाही, मोठं नाही, पुन्हा उलटून तर बोल मेल्या. तुझ्या जिभेला डागच देते की नाही ते पहा—(रघ्या रागारागाने कोपऱ्यात जाऊन बसतो.) बसलास काय असा आईबाप मेल्यागत? गाडीची वेळ झाली कळत नाही? (माझ्यावर मोर्चा) आणि तुम्ही तरी काय असे शुंभासारखे उभे राहिलात? टांगा आणायला नको! का तेही काम मीच करू? मेली इतकी धावपळ चाललेली दिसतेय डोळ्यांना तरी तुम्ही आपले थंडच—दहिभातासारखे...

**मी** : मी जातो टांगा आणायला—पण त्या ट्रंकांच्या कुलुपांचं काय करायचं?

**कुटुंब** : कुलपं नसली तरी दोरी बांधीन मी—पण आधी टांगा आणा.

**मी** : आणतो.........(मी जातो)

**कुटुंब** : रघ्या, ऊठ बघूं तिथनं!

**रघ्या** : (निर्वाणीच्या पवित्र्यात) मी उठणार नाही—

**कुटुंब** : मेल्या, गाडीला जायचंय—

**रघ्या** : आम्ही येणार नाही तुझ्याबरोबर—कशाला यायचं ? मारच खायला ना ? मुळीच येणार नाही.

**कुटुंब** : रघ्या, सरळ सांगते ते ऐक—ऊठ मुकाट्यानं—

**रघ्या** : उठणार नाही. काय करशील तू ? मारशीलच ना ? खुश्शाल मार—

**कुटुंब** : कार्ट्या, तू तसा नाही वठणीवर यायचास—

**रघ्या** : (कोडगेपणानं बसतो) मार ना...पाय मोडायचा असला तरी मोड, हात मोड, तगंडी मोड, मान मोड, काय वाटेल ते मोड...जीव गेला तरी हरकत नाही.

**कुटुंब** : मेल्या इतका कसा कोडगा झालास म्हणते मी ! लाज नाही वाटत तुला ?

**रघ्या** : मुळीच वाटत नाही.

**कुटुंब** : मागच्या जन्मीचं वैर घेऊन आलाय जसा काही छळायला—(ओरडून) उठतोस की नाही तिथून ? ऐकू येतंय का मी काय म्हणतेय ते ?

**रघ्या** : ऐकू येतंय पण उठणार नाही.

**कुटुंब** : मर मेल्या तिथंच (रघ्याला ढकलते.)

**रघ्या** : (कुर्ऱ्यात) मरतो—पण माझे कपडे काढून दे ट्रंकेतले—

**कुटुंब** : मी ट्रंक उघडणार नाही आता—

**रघ्या** : मग चार दिवस काय आम्ही नागडं हिंडायचं ?

**कुटुंब** : हिंड मेल्या खुशाल—नाही तरी लाज गुंडाळून ठेवलीच आहेस तूं—बंडया चल तू मुकाट्यानं—

**रघ्या** : आई, माझे कपडे काढून दे म्हणून सांगतोय...

**कुटुंब** : चांडाळा किती छळशील मला ? घे मेल्या हे कपडे एकदा उरावर बांधून. (चरफडत ट्रंक उघडते आणि त्यातील रघ्याचे कपडे फेकून देते. तेवढ्यांत मी व टांगेवाला येतो.)

**मी** : काय झालं पुन्हा ?

**कुटुंब** : तो मेला खवीस बसला आहे ना मानेवर ? मेल्याचं टाळकं फिरलं आहे—येत नाही म्हणतो.

**मी** : अरे रघू, असं करू नये बाळा—आता इतकी तयारी झाल्यावर—

**रघ्या** : तुम्ही आमच्या भांडणात पडू नका बाबा. मला जायचं नाही आईबरोबर.

मी : मूर्ख आहेस का तू ?

रघ्या : हो आहे.

कुटुंब : मरू दे कार्ट्याला...आता माझी तरी गाडी चुकवू नका...ए टांगेवाला उचलो ये सामान—

टांगेवाला : अवं बाई, ह्ये एका बिऱ्हाडाचं सामान हाय—ह्ये सामान आन् वर ह्या बाई आपल्याला न्हाइ झेपायचं.

कुटुंब : मेल्या मी सामानावर का बसणार आहे ?

टांगेवाला : पर बाईसाहेब इक्तं सामायन कसं मावायचं टांग्यात—मला न्हाई निवायचं ह्ये. तुमी आपलं हमाल आणा आन् तीन टांग्यांत सामान भरा...

कुटुंब : नेहमी तर नेतात सगळे टांगेवाले...तुलाच रे काय झालं ?

टांगेवाला : कशाला खालीपिली डोकं खाता माझं ? तुम्ही आपला दुसरा टांगा बघा. (तो जाऊ लागतो)

कुटुंब : अरे मेल्या थांब जरा. आता वेळ आहे का आम्हाला दुसरा टांगा शोधायला ?

टांगेवाला : मग आणा सामायन उचलून बाहेर. मी थांबतो—(निघून जातो.)

कुटुंब : (मला) पुन्हा तुमचा वेंधळेपणा. आपलं सामान उचलायचं आहे हे लक्षात घेऊन चांगला धडधाकट टांगेवाला नको बघून आणायला ? कुठला तरी मरतुकड्या घोड्यासारखा टांगेवाला आणायचा आणि मग त्याची मनधरणी करीत बसायचं—तुम्ही असे—तीं कार्टी तशी.

मी : हे सगळं मला आता पाठ झालं आहे—

कुटुंब : पोराना जन्म द्यायचं तेवढं पाठ झालं आहे तुम्हाला, त्यांना वळण कोण लावील ?

मी : वळणाचं नंतर पाहूं—आधीं गाडीची वेळ पाहिली पाहिजे. हे सामान नेलं पाहिजे आधीं—रघू बाळ ये बरं इकडं हात लावायला जरा—

रघ्या : मी मुळीच येणार नाही. आईच्या गावाला जाण्याच्या कामात मला मुळीच भाग घ्यायचा नाही...

कुटुंब : काही नको मेल्याचा तोरा एवढा—सामान ते काय मेलं, मी सुद्धा नेईन...ही ट्रंक तुम्ही धरा तिकडून—मी धरते इकडून—चला उचला.



अंक पहि-

(मी आणि कुटुंब दोन्ही बाजूला धरून दोन ट्रंका नेऊन ठेवतो. दोघेही घामाघूम. घाई आहेच. तिसरी ट्रंक नेताना कुटुंब खांद्याला थर्मास अडकवते. हातात टोपली अन् टिफीन कॅरिअर घेते. बंड्या बाहेरच आहे. आम्ही जातो आणि दोनतीन मिनिटांत ट्रंक, हवे कोसळल्याचा धडाडधूम आवाज येतो. रघ्या पळत बाहेर जातो. स्टेजवर संपूर्ण शांतता. फक्त कुटुंबाचे किंचाळत विव्हळणे ऐकू येते. मी लंगडत गुडघ्यावर हात दाबीत घामाघूम झालेला असा धांवत येतो.)

**मी :** रघ्या...रघ्या...गेलं वाटतं कार्ट कुठंतरी...अयाई ग—

(गुडघा दाबून धरून बसतो. बाळक्या धावत बाहेरून येतो. हीरो स्टाइल न बिघडवता जेवढी गडबड करता येईल तेवढी करतो.)

**बाळक्या :** अहो पंत...दिदी घायल हो गयी...पंत तुमची बायको तिकडे ट्रंकेखाली अडकली आहे आणि तुम्ही इथं गुडघा कुरवाळीत काय बसलात ?

**मी :** अरे बाळक्या...

**बाळक्या :** अशा संकटकाळी तरी नीट नावानं हाक मारा मला. लहान असलो तरी मेव्हणा आहे तुमचा...बी. राम म्हणा नाही तर निदान बाळकराम तरी म्हणा...आधी ताईला ट्रंकेखालून मुक्त करा...

**मी :** अरे मला माहीत आहे सगळं...तेवढ्यासाठी तर धावत आलो मी रघ्याला बसायला...असं कर तू आधी डॉक्टरला बोलावून आण...

**बाळक्या :** अहो डॉक्टर नकोत, आधी पहेलवान आणले पाहिजेत—ट्रंका उचलायला...

**मी :** अरे पण ट्रंका तिच्यावर पडल्या नाहीत. ती ट्रंकांवर पडली आहे... सुटकाच करायची असेल तर आधी ट्रंकांची केली पाहिजे. ते पाहू नंतर. आधी डॉक्टरला आण...

**बाळक्या :** डॉक्टरला ? इम्पॉसिबल पंत...मुझे इतना वख्त नही है...मला महत्त्वाची अपॉइंटमेन्ट आहे. डॉक्टरकडे जाण्याइतका वेळ नाही मला... सचमुच पंत वख्तही वैसा है—

**मी :** मग डॉक्टरला कोण आणील ?

**बाळक्या :** परमेश्वरकृपेनं तुम्हाला दोन मुलगे आहेत...त्यातला एक या कामासाठी वापरता येईल. एकतर ट्रंका वगैरेसारखं जड सामान तुम्ही न्यायचं सोडून तिला न्यायला लावलंत आणि आता डॉक्टरसाठी माझ्या मागं लागता ? आप तो बहोत मुश्कील आदमी मालूम होता है...माझी दिदी तिथं घायल



म्हैस येता माझ्या घरा—

होकर बैठी है...नही गिरी हैं, मेरा फर्ज है उसके पास बठना...पंत सम्सेल यातून काही बरंवाईट झालं तर शेवटच्या क्षणी वहिणीला सोडून गेला असं. डाग लागायचा मला...नही नही पंत मैं डॉक्टर के यहाँ नही जा सकता... मै मजबूर हूँ पंत, मै मजबूर हूँ—

**मी** : अरे पण बाळक्या...

**बाळक्या** : (हिंदी हीरोच्या स्टाइलमध्ये) नहीं पंत यह नही हो सकता...मुझे माफ करना...माफ करना...(जातो)

**टांगेवाला** : (येतो) साहेब, गाडी मिळायची न्हाइ आता—

**मी** : कसली गाडी घेऊन बसलास तू...आमची गाडी मोडून पडलीय बाहेर ...आता कुठं जातोस दुसरी गाडी बघायला?

**टांगेवाला** : मग साहेब मला गरीबाला तरी मोकळं करा—

**मी** : तुला मोकळं काय करायचं?

**टांगेवाला** : साहेब अर्धा तास खोटी झाली माझी–भाडं बी गेलं–समदं नुसकानच झालं माझं. पैसं तेवढं द्या...

**मी** : अरे तुझ्या टांग्यात पाय सुद्धां ठेवला नाही मी आणि पैसे मागतोस?

**टांगेवाला** : पाय ठेवला नसल तुम्ही पर तुमच्या पायीच नुसकान झालं न्हवं माझं?

**मी** : तुझं कसलं नुकसान? उलट तू सामान नेलं नाहीस म्हणून माझ्या कुटुंबाचा पाय मुरगळला आहे. तूं ते नेलं असंतस तर—

**टांगेवाला** : माजा पाय मोडला असता साहेब. अगुदर पैसे द्या अन् मला मोकळा करा.

**मी** : अरे तुला मोकळं करू का माझ्या कुटुंबाला ट्रंकेपासून मोकळं करू...

**टांगेवाला** : तुमचं कुटुंब काय राव घरचंच हाय. त्येला कवा बी मोकळं करतां यील–माझं तसं न्हाई—

**मी** [illegible]न) पिळा लेको पिळा मला (मी रुपयाची नोट त्याच्या अंगावर भि[illegible] [illegible]ा निघून जातो. कुटुंबाचे विव्हळणे आणि बाळक्याचे समजावणे ऐकू ये[illegible] [illegible]गो. आणि वैतागून शेवटी झपाटल्यासारखा माईक धरतो. मागचा पडदा पड[illegible] [illegible]त.)

(पुन्हा दिवे [illegible] वेळी मी माईकपुढे शांतपणे उभा असतो.)

**मी** : मंडळी, ख[illegible] [illegible]न? माझ्या आयुष्यातली अपुरी राहिलेली अशी

एव महत्त्वाकांक्षा आहे आणि ती म्हणजे आमचं कुटुंब धडपणानं गावाला जाऊन आल्याचं पाहण्याची! अहो, इतरांची अनेक कुटुंब परगावालाच नव्हे तर परदेशालासुद्धा जातात आणि विमान अपघात झाला नाही तर सुखरूप परतसुद्धा येतात. पण आमचं कुटुंब धडपणे गावाला जात नाही; आणि गेलंच तर धडपणे परत येत नाही. मी म्हणतो तसं अजिबात परत नाही आलं तरी चालेल—पण तेही भाग्य नशिबात असावं लागतं...कुटुंबाचा प्रवास म्हटला की माझा चेहरा सामान नसताना आवळलेल्या होल्डालसारखा दिसू लागतो. माझं एक सोडा, पण रेल्वेचे नोकर, मोटारींचे ड्रायव्हर, स्टेशनावरचे हमाल आणि टांगेवाले यांचेसुद्धा आमच्या कुटुंबामुळं ग्रह फिरतात. कारण यांपैकी कुणी ना कुणी तरी कुटुंबाच्या तडाख्यात सापडतो आणि शब्दांच्या वरवंट्याखाली रगडून निघतो.

गेल्या वर्षीचीच गोष्ट. कुटुंब रेल्वेनं बार्शीला निघालं होतं. आधीच गाडी पाच दहा मिनिटं लेट झालेली होती. आमचं कुटुंबही नित्याच्या प्रथेला अनुसरून स्टेशनवर लेट गेलं. ही जेमतेम गाडीपाशी पोचली असेल नसेल—तेवढ्यात गाडी हळुहळू सुरू झाली. कुटुंबाचा संताप अनावर झाला. रेल्वेखात्याला शिव्या देण्याचा सपाटा सुरू झाला. तेवढ्यात गार्डाचा डबा तिच्यापुढून चालला. गार्ड हिरवा बावटा हालवीत डब्याच्या दारात उभा होता. "आणखी दोन मिनिटं थांबला असतास तर काय जीव गेला असता तुझा?" असा दणदणीत सवाल टाकून कुटुंबानं त्या गार्डाच्या कोटाला धरून बावट्यासकट खसकन खाली खेचला ना त्याला! बिचारा गार्ड कसा तरी धडपडत उभा राहिला. एवढ्या मोठ्या गाडीचा एवढा मोठा गार्ड, पण दिसत होता एखाद्या मार खाल्लेल्या मडगार्डासारखा! गार्डासाठी गाडी थांबवावी लागली आणि आमचं कुटुंबही गाडीत बसलं. तेव्हापासून रेल्वेचा समस्त नोकरवर्ग आमच्या कुटुंबाला पाहिलं की रुळासारखा सरळ वागतो.

मंडळी, परवाचा प्रकार तर तुम्ही प्रत्यक्षच पाहिला आहे. अहो आम कुटुंब आधी जिन्यात पडलं आणि नंतर आजारी पडलं. तो मुरगळलेला पा त्यात तो फ्लूचा अटॅक, माझी दमछाक, रध्या-बंड्यांचा हैदोस...ह्य पंधरा दिवस गेले. आमच्या घरावर इस्पितळाची आणि माझ्यावर च वॉर्डबॉयची कळा दिसू लागली. मंडळी, अजून पाय बरा झालेला नाही. मा विद्वान मेव्हणे बाळक्यामामा बहिणीच्या सुश्रूषेसाठी इथंच मुक्काम ठोकू

आहेत हे वेगळे सांगणे नलगे. तेव्हा तो इतिहासप्रसिद्ध पाय बघायचा असेल तर आमच्या घरी हळूच पायधूळ झाडा......

(पुन्हा अंधार. मागचा पडदा वर जातो. मागचीच खोली. कुटुंब पलंगावर पसरलं आहे. विव्हळत आहे. टेबलावर औषधाच्या बाटल्या, तस्त, गरम पाण्याची पिशवी वगैरे रुग्णोपयोगी साहित्य. पलंगाजवळ खुर्चीवर बाळक्या चिंताक्रांत मुद्रेनं बसलेला आहे.)

**कुटुंब** : अरे बाळकरामा...बाळक्या कसं होईल रे माझं ?

**बाळक्या** : त्याच काळजीत आहे मी दिदी...गेले पंधरा दिवस तू अशी अंथरुणावर आहेस...उद्या तुझं यातच काही झालं तर—

**कुटुंब** : मेल्या—

**बाळक्या** : म्हणजे (अर्थपूर्ण रीतीनं) तसं काही होणार नाही पण पाय कायमचा अधू झाला तर—

**कुटुंब** : मला कंटाळा आला आहे रे इथं पडून राह्यचा—

**बाळक्या** : मै जानता हूं दिदी...बीमारीसे आदमी परेशान हो जाता है... तू थोडी कळ काढ...

**कुटुंब** : मेल्या पायातनं तर सारख्या कळाच येताहेत—पुन्हा तू मला कळ काढायला सांगतोस ? लाज आहे का काही तुला ?

**बाळक्या** : तसं नाही...मेरा मतलब यह था की...माझं पिक्चरचं कॉन्ट्रॅक्ट झालं किंवा ष्टोरी गेली की तुला दार्जीलिंगलाच नेतो हवा पालटायला...

**कुटुंब** : हवा पालटायला ? खरं म्हणतोस बाळक्या ?

**बाळक्या** : तुझ्या पायाशपथ...यह मस्करी नही दिदी...सच बोलता हूँ... अग तो शांताराम तो सत्य जितरे का कोण आहे ना ! ते तर माझ्या मागं लागले आहेत सारखे—

**कुटुंब** : कुणी का असेनात ते—पण दुसरे सगळे लोक सोडून तुझ्याच का रे मागं लागले ?

**बाळक्या** : म्हणतात आम्हालाच ष्टोरी द्या...आणि आमच्या पिक्चरमध्ये काम करा...आता हे दोन्ही एकदम करणं कसं शक्य आहे मला ?

**कुटुंब** : हो ना...ष्टोरी वेगळी काम वेगळं...

**बाळक्या** : पण मी साफ सांगितलं त्यांना—ष्टोरी हवी असेल तर दहा हजार रुपये मोजा आणि माझं काम हवं असेल तर पंधरा हजार मोजा.

**कुटुंब** : काय दहा हजार? म्हणजे एकावर तीन पूज्यं?

**बाळक्या** : हो...ना...नाही...नाही...मला वाटतं दहावर तीन पूज्यं असावीत—ते असू दे—अगं माझ्या मागं धावता धावता ह्या मोठमोठ्या प्रोडयूसरांच्या मोटारींचे टायर संपूर्ण फाटायची वेळ आली आहे...

**कुटुंब** : असं म्हणतोस? मग एक कर, ते टायर संपूर्ण फाटायच्या आधीच भेट त्यांना...

**बाळक्या** : सवाल दस हजार का है दिदी...

**कुटुंब** : सवाल असू दे रे–पण मी म्हणते फार ताणून धरू नकोस...साडेनऊ नव्हे नऊ हजार म्हणाले तरी देऊन टाक ती स्टोरी...

**बाळक्या** : छेः छेः तुला काय कळतंय या फिल्म इंडस्ट्रीतलं? अग मी दहा हजाराच्या पेक्षा एक पै कमी करणार नाही. हरगीज नही...

**कुटुंब** : असं काय रे करतोस बाळकरामा, अरे असा विचार कर–तुझे ते रोडयुसर झाले तरी त्यांना बायकापोरं, प्रपंच असणारच की–म्हणून म्हणते नऊ हजाराला होय म्हण तू...

**बाळक्या** : (उसळून) नही दिदी यह नही हो सकता–कभी नही हो सकता ...दिदी तुम तो बहोत शरीफ लडकी आहेस...

**कुटुंब** : मेल्या तुझ्या तोंडाचं काय बोळकं झालंय मला लडकी म्हणायला...

**बाळक्या** : चुकलो दीदी...मुझे माफ कर दो...मला एवढंच म्हणायचं आहे की—

**कुटुंब** : मेल्या दहा हज्जार नाही बारा हज्जार घे–पण मला लडकी बिडकी म्हणालास तर याद राख...होउ दे तुझ्या मनासारखं...मग तर झालं? पण मेल्या मला दार्जीलिंगला न्यायला मात्र विसरू नकोस म्हणजे झालं—

**बाळक्या** : मुळीच विसरणार नाही...बातच सोड तू विसरण्याची—

**कुटुंब** : तशी मला खात्री आहे हो तुझी बाळक्या...एवढी बहिणीची सेवा करतोस...सुश्रूषा करतोस...देवाला काय दिसत नसेल हे? तो तुला दहाच काय पण वीस हजार रुपयेसुद्धा देईल मनात आलं तर—

**बाळक्या** : अग दिदी मी विशेष असं काय केलं...मेरा फर्ज हमने पूरा कर दिया बस्स! मद्रासला जायचं होतं पिक्चरच्या कामासाठी तेवढं रद्द केलं तुझ्यासाठी बस्स! इसमे कोनसी बडी बात हैं दिदी?

**कुटुंब** : अरे माझी पोटची पोरं सुद्धा माझ्यासाठी राबत नाहीत–मेली गेली

असतील गावातले उकिरडे फुंकायला – आणि हे गेले असतील ऑफिसची धुणी धुवायला...

**बाळक्या :** ऑफिसची धुणी धुवायला! म्हणजे पंत काय लॉंड्रीत कामाला जातात की काय?—

**कुटुंब :** पण बाळक्या केव्हा रे निघायचं दार्जीलिंगला जायला आपण?

**बाळक्या :** दहा हजार रुपये हातात पडले की लगेच—

**कुटुंब :** ते केव्हा रे तुझ्या हातात पडणार?

**बाळक्या :** तेच तर तुला सांगणार होतो. मला आत्ता एका प्रोड्यूसरला भेटायला जायचं आहे...फक्त जाण्यापुरते पाच रुपये दे...दहा हजाराचा सौदा ठरवूनच येतो...दहा हजार रुपये आले की त्यातले दोन हजार तुझे...

**कुटुंब :** (आनंदानं) दोन हज्जार? आणि माझे? खरं? नक्की?

**बाळक्या :** हो ना नक्की...गेल्या ८–१० वर्षांची आणि पुढच्या १०–१२ वर्षांची भाऊबीज म्हणून देऊन टाकणार आहे तुला...

**कुटुंब :** खरं म्हणतोस बाळक्या?

**बाळक्या :** खरं म्हणशील तर दहा हज्जार तुलाच द्यावेत असंसुद्धा मनात येतं माझ्या नेहमी —

**कुटुंब :** हे बघ मी म्हणते – मला दहा हज्जार नाही दिलेस तरी चालतील; पण दोन हज्जार मात्र न विसरता दे म्हणजे झालं...

**बाळक्या :** नक्की देईन दिदी...नक्की देईन...फक्त पाच रुपये मात्र आत्ता तू दे...

**कुटुंब :** मग असं कर...स्वयंपाकघरात दुभत्याच्या कपाटात हिंगाच्या डबी खाली साबणाची डबी आहे त्या डबीत पाच रुपये आहेत ते घे...

**बाळक्या :** लाख लाख शुक्रिया दिदी...तुम देवता हो...दिदी...इस दुनियामे सबसे बडी चीज एकही है...बहेन...तुम्हारी जैसी बहेन जिसने पाया है— (आत जातो.)

(तेवढ्यांत इंदिराबाई आणि इंदिराबाईंच्या वन्सं येतात.)

**इंदिरा :** आम्ही आलोत म्हटलं...

**कुटुंब :** इंदिराबाई का? या ना या...आणि या कोण?

**इंदिरा :** या माझ्या वन्सं...

**कुटुंब :** बसा...बसा इथंच...(इंदिराबाई व त्यांच्या वन्सं पलंगाचा कठडा व खुर्ची

यावर वसतात. इंदिरावाई ३५ च्या व वन्सं २७ ते ३० च्या दरम्यानच्या. दिसायला वऱ्या.)

**इंदिरा :** काय म्हणतेय तुमची तब्बेत? अहो येईन येईन म्हटलं पण सवड म्हणून होत नाही बघा...(बाळक्या आतून येतो.)

**बाळक्या :** बहोत बहोत शुक्रिया दिदी...(बायकांना) नमस्तेजी...माफ करना मुझे...तुम्हे मैं क्या कहूँ यारो मुझे तो माफ कर देना। अभी तो जा रहा हूँ मैं हमारी याद रख देना। मैं घाई में हूँ...मी जातो...मला अपॉइंटमेंट आहे...

**कुट्टुंब :** लौकर ये रे परत...

**बाळक्या :** जी हाँ दिदी...(जातो)

**कुट्टुंब :** माझा मावसभाऊ आहे. फार हुशार आणि कर्तबगार आहे हो... त्याला म्हणे एका फिल्म ष्टोरीचे दहा हज्जार रुपये मिळणार आहेत...

**इंदिरा :** काय दहा हज्जार?

**कुट्टुंब :** हो हो...ते कोण शांताराम अन् ते कोण सदा जितरे म्हणून कोण आहेत म्हणे तें तर मोटारचे टायर फाटेपर्यंत याच्या मागं लागलेत म्हणे...

**इंदिरा :** कां? त्यांचं काही पळवून आणलं यानं?

**कुट्टुंब :** नाही हो...ष्टोरी आम्हालाच दे म्हणून...हा म्हणतो मी देणार नाही. ते म्हणतात दे...ते धावतात याच्या मागं...असं चाललंय बघा सारखं...

**इंदिरा :** मग देऊन टाकावी ष्टोरी का फिरी काय असेल ती—

**कुट्टुंब :** पण हा म्हणतो दहा हज्जार द्या...ते म्हणतात साडेनऊ हजार घे...

**इंदिरा :** म्हणजे फक्त पाचशे रुपयांसाठी का टायर फाडून घेताहेत ते आपल्या मोटारीचे? चमत्कारीकच म्हणायचे?

**कुट्टुंब :** नाही. मी म्हणते साडेनऊ हजार झाले तरी कमी का आहेत ते?

**इंदिरा :** तुमच्या मानानं ते खूपच आहेत हो...तसं पाहिलं तर आमच्या माहेरच्या मानानं दहा हज्जार रुपये म्हणजे काहीच नाहीत...ते असू दे मेलं. तुमचा पाय कसा काय आहे आता?

**कुट्टुंब :** कसलं काय न् कसलं काय...अहो पाय अजून जमिनीवर टेकून काही उभं राहतां येत नाही. त्यात तो मेला फ्लू का ब्लू म्हणतात तो झाला...

**इंदिरा :** म्हणजे एन्फ्लुएंझा...

**कुट्टुंब :** एन्फ्लुएंझा वगैरे काही नाही—उगाच काहीतरी बोलू नका—साधा फ्लू होता.

**दिरा :** त्यालाच फ्लू म्हणतात अलिकडं—

कुटुंब : आपल्याला काय कळंतय त्यातलं ? डॉक्टर फ्लू म्हणाले, चारी अंगानं फ्लू म्हणायचं — डॉक्टर प्लेग म्हणाला तर आपणही प्लेगच म्हणायचं. होणार

इंदिरा : नाही तर काय ? अलिकडं फारच तऱ्हा झाल्या आहेत बा.. आजाराच्यासुद्धा. पण तुम्ही आपलं पायाला जपा म्हणजे झालं—

वन्सं : आणि फ्लूलासुद्धा जपायला लागतं हो—

इंदिरा : काहीही म्हणा पण तुमचं नशीब थोर म्हणून पाय मुरगळण्यावर निभावलं — आमच्या बनीच्या चाळीतली ती एकनाथ्यांची बायको — तुमच्या-सारखीच जिन्यावरून पडली बघा — अन् काय सांगायचं ? वर उचलून नेईपर्यंत प्राण गेला बघा तिचा—वेळ आली की मग कसलंही निमित्त पुरतं...म्हणून म्हणते वेळींच जपा...

वन्सं : आणि फ्लूचं तरी काय तसंच ना ? आमच्या शकूची नणंद नाही का सहा दिवसांत फ्लूनं गेली ?

इंदिरा : पण ती भीती यांना नाही. कारण सहा दिवस होऊन गेले आहेत आता—

वन्सं : हो — पण पुन्हां फ्लू होणार नाही कशावरनं ?

कुटुंब : पण मला आता खूप बरं वाटतंय हो...

वन्सं : अहो प्रत्येक रोग्याला असंच वाटत असतं. पण ते काही खरं नाही...

इंदिरा : आमच्या लेल्यांच्या सुनेचं काय झालं ? हे असंच, बरं वाटतंय, बरं वाटतंय म्हणून फिरली घरात, पुन्हा तिसऱ्या दिवशी ताप आला आणि पाचव्या दिवशी संपलंच सगळं...

कुटुंब : माझं मुळीच व्हायचं नाही तसं...मी मुळीच मरायची नाही इतक्यात—

इंदिरा : पण काळजी घेतलेली बरी...वेळ का सांगून येते कधी ?

कुटुंब : तुम्ही माझ्या समाचाराला आलात का अंत्यदर्शनाला ?

इंदिरा : बघा वन्सं...आपण आपली कामं धामं सोडून यांच्या समाचाराला आलो तें ऱ्हायलंच बाजूला — ह्या वाकड्यातच शिरल्या—

वन्सं : तरी तुम्ही म्हणालाच होता...

कुटुंब : काय म्हणाल्या होत्या तुमच्या वैनी ?

रघ्या : कापण जातोय खऱ्या...पण काहीतरी कारण काढून बया भांडली

कुटुंब : अ: मिळविली...

यावर बसतात. इंदि-
इंदिरा : ...जे मी का भांडते सगळ्यांशी ? माझ्या उशाशी बसून मरणाऱ्या
...च का सांगत होते मघापासनं ? दुसऱ्याला पाण्यात पाहण्यात जन्म
म्हण-
...ली सगळा...

इंदिरा : आम्ही नाही हो कुणाला पाण्यात पाहात...सगळ्या आळीला ठाऊक आहे कोण कसं आहे ते ?

कुटुंब : आळीत मेली सगळी तुमच्यासारखीच माणसं भरली आहेत ना ? तुमच्यासारखं ढोंग येत नाही आम्हांला—

इंदिरा : उगाच वाटेल ते बोलू नका...मी काय ढोंग केलं असं ?

कुटुंब : नाहीतर काय ? ह्या तुमच्या वन्सं...तुमची नवी साडी पळवली यानी असं गावभर सांगितलंत आणि आता त्यांनाच घेऊन फिरताय याला काय म्हणायचं ?

वन्सं : (उसळून) कोण म्हणतं मी यांची साडी पळवली म्हणून ?

कुटुंब : ह्याच सांगत होत्या...तुमची भावजय सांगत होती हे. नाहीतर आम्हांला कशाला कळल्या असत्या तुमच्या घरातल्या भानगडी ?

इंदिरा : मी कशाला सांगीन...उगाच काहीतरी सांगू नका...

कुटुंब : आता का ? आता का ?

इंदिरा : उगाच गैरसमज होतोय हा...

वन्सं : आता काही सारवासारवी करू नका वहिनी...ती साडी तर मी तुम्हांला विचारूनच नेली होती. तरीही तुम्ही माझी अशी निंदा करता ? तुमचं मन इतकं हलकं असेल असं वाटलं नव्हतं मला...

इंदिरा : आणि तुमचं तरी काय मोठं भारी आहे ? भावजींच्या लग्नात मी तुमच्या मोत्यांच्या बांगड्या नुसत्या घालून पाहिल्या तर केवढं आकांडतांडव केलंत तुम्ही ? रडलात काय, रुसलात काय–जशी काही मी बांगड्या घेऊन पळूनच चालले होते ?

वन्सं : नाहीतरी मी बघून ठेवलंय तुमचं...तुम्हाला खोटं नाटं सांगायची खोडच आहे पहिल्यापासून...

इंदिरा : मी कशाला सांगू खोटं नाटं ?

वन्सं : मग यांना कसं समजलं ? ते काय वर्तमानपत्रात छापून आलं...
तुमचं काही वाटत नाही मला – पण माझ्या दादाचं कसं होणार र
लागून राहिली आहे मला—

इंदिरा : काही नको एवढा भावाचा पुळका यायला...चांगले चारी अंगानं मुटले आहेत ते काय उगाच? (वेडावून) म्हणे माझ्या दादाचं कसं होणार याची चिंता लागून राहिली आहे मला?
वन्सं : मग आहेच मुळी काळजी मला दादाची...तुम्ही अशा पावलो-पावली खोटं बोलणार—
इंदिरा : मग आलात कशाला एवढे पैसे खर्च करून विजापुराहून? काही कुणी तार नव्हती ना पाठविली या म्हणून?
वन्सं : तुम्ही कोण विचारणार? मी माझ्या भावाकडे आले आहे. अगदी हक्कानं आले आहे.
इंदिरा : (वेडावून) म्हणे हक्कानं आले आहे.
वन्सं : होयच मुळी. आणि अशीच येत राहणार आहे, समजलं?
इंदिरा : मग कशाला येता लोचटासारखं पुन्हा पुन्हा?
वन्सं : दारातलं कुत्रं भुंकणारं आहे म्हणून घरातल्या माणसांना भेटायचं का कुणी सोडतं? काय हो?
कुटुंब : अगदी खरं आहे बघा तुमचं म्हणणं...
इंदिरा : काय खरं आहे? मी कुत्रं काय? बघून घेईन...बघून घेईन...
वन्सं : खुशाल घ्या बघून काय बघायचंय ते...
इंदिरा : असल्या नणंदा असण्यापेक्षा नसलेल्या परवडल्या...
वन्सं : तसंच म्हणायचं तर माझा दादा ब्रह्मचारीच राहिला असता तर जास्त सुखी झाला असता—असली खोटारडी बायको गळ्यात पडली—करील काय बापडा?
इंदिरा : चूप,......बकबक बंद करा—तमाशा नको आहे व्हायला दुसऱ्याच्या घरात...(तरातरा निघून जाते. तिच्या मागोमाग वन्सही जातात.)
कुटुंब : मेल्या कैदाशिणी आहेत नुसत्या...आई ग...ह्या पायानं तर मेला उच्छाद आणलाय नुसता...(रघ्या आणि बंड्या शाळेतून येतात. दप्तरे फेकतात व बाहेर जाऊ लागतात) रघ्या, मागं फिर—कुठं निघालास?
रघ्या : बाहेर—
कुटुंब : जायचं नाही—
रघ्या : का पण?
कुटुंब : आईची सेवा केलीस तर पाप नाही ना लागायचं?

बंड्या : हो ग आई, आज मास्तरानीसुद्धा शाळेत आम्हांला सांगितलं की जगात आई इतकं मोठं कुणी नाही.

कुटुंब : सांग...सांग त्या राक्षसाला...

रघ्या : पण मास्तर काही आपल्या आईबद्दल तसं म्हणाले नसतील. त्यांनी कुठं आपली आई बघितली आहे ?

कुटुंब : मेल्या रघ्या, तुझ्या जिभेला काही हाड ? थांब, मी बरी तर होऊ दे एकदा—मेल्या टिचभर आहेस तर माझी निंदा करतोस—मोठेपणी तर भिंतीत चिणूनच ठार मारशील मला तू—

रघ्या : मी काय संभाजी आहे वाटतं ?

कुटुंब : औरंगजेब आहेस नुसता—अशीच निंदा करीत जा बरं आईची—कल्याण होईल तुझं...बडबड बंद कर आणि पाय रगड मुकाट्यानं माझा...

रघ्या : तुझं आपलं हेच असतं नेहमी—वाचून दाखव, औषध आण, पाणी दे, पाय रगड, डोकं दाब—आम्हांला खेळायला म्हणून सोडायचं नाही कधी—

कुटुंब : मेल्या मी इथं मरायला टेकलेय आणि तुला खेळ सुचतोय होय ?

रघ्या : एक महिना झाला तू रोज हेच म्हणतेस—मी मरायला टेकले—मी मरायला टेकले—नुसतं म्हणतेस तेवढी—

कुटुंब : तोंड फोडीन उलट बोललास तर—मुकाट्यानं पाय रगड...

रघ्या : पाय रगड...आमचे हात दुखतात ना सारखे पाय रगडून...

कुटुंब : चांडाळा, एवढेसे पाय रगडायला सांगितलं तर—

रघ्या : एवढेसे आहेत होय तुझे पाय ?

कुटुंब : तुझ्यापुढं तर बोलायची सोयच नाही...प्रत्येक शब्दाला तू फाटे फोडतोस...जा मर जा मेल्या खेळायला...जा उलथ जा... (रघ्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन पळतो. बंड्या काय करावं ह्या विचारांत.)...जा ...जा...तूही जा...कोणी नको मला इथं. मला एकटीला मरू द्या सुखानं... बघू सुद्धा नका परत येऊन जा...हो चालता (बंड्याही जातो). मागच्या जन्मी काय पाप केलं होतं म्हणून असली कार्टी पोटी आली आहेत कुणास ठाऊक ? बापाला घरी बसायला फुरसत नाही...मी अशी अंथरुणात...पोरांना शिस्त लावायची कुणी ? (तेवढ्यात मी एका तालीम मास्तरला घेऊन येतो. हा मास्तर चांगला गुंडगोळा आहे. मुंडेछाट पैरण, गळ्यात गंडा, थाट पेहेलवानी, नाव वेडके.)

म्हैस येता माझ्या घरा—

ने पाय हातात घेतला

**कुटुंब :** (मला समोर पाहाताच) झाली का सवड आपल्याला. आलात का एकदाचे तोंड दाखवायला ? च्या पायाने

**मी :** तोंड दाखवायला नाही – तुझा पाय दाखवायला – हे तालीम मा... वेडके – मोडलेले हाड, मुरगळलेले पाय हा हा म्हणता दुरूस्त करतात.

**मास्तर :** म्हणजे मी अगदी हाडाचा तालीममास्तर आहे. (स्वतःच मोठ्यानं ... हसतो.) मी हाडावर केलेली कोटी इथं कुणाच्याच लक्षात आलेली दिसत नाही ?

**कुटुंब :** पण आता डॉक्टरचं औषध चालू आहे ना ?

**मास्तर :** डॉक्टर रोग बरा करील – मुरगळलेला पाय कसा बरा करील ? अहो तेथे पाहिजे जातीचे—

**मी :** त्यांना पाय दाखव—

**कुटुंब :** आतापर्यंत पाच पंचवीस माणसं गेली पाय बघून – जसं काही प्रदर्शन मांडलंय माझ्या पायाचं...

**मी :** अग तुझा पाय बरा व्हावा म्हणूनच ना ही सारी खटपट ? मग दाखवतेस ना पाय ह्यांना ?

**मास्तर :** तुम्ही मला पाय दाखवा म्हणजे मी त्याला माझा हात दाखवीन (स्वतःच मोठ्यानं हसतो. इकडं तिकडं पाहतो. दुसरं कुणीच हसत नाही) मी केलेली कोटी लक्षात नाही आली वाटतं ?

**कुटुंब :** काही नको...हे मेले मास्तर भलतेच आडदांड दिसताहेत. माझा पाय मोडूनच टाकतील ते...

**मास्तर :** अहो, मी बोलून चालून तालीम मास्तर. मी गायन मास्तरासारखा नाजूक कसा दिसेन ? मी आडदांडच दिसलो पाहिजे. तुम्हाला माहीत आहे का ? मी आडदांड का दिसतो ? कारण मी दंड काढतो. (हसतो, पाहतो) शब्दाची कसरत लक्षात आलेली दिसत नाही ? जाऊ द्या – दाखवा पाय तुमचा (दंड ठोकतो)

**कुटुंब :** अहो, पण हे खरंच का तालीम मास्तर आहेत ?

**मास्तर :** तुम्हाला खोटं वाटतं ? मग दंड बैठका काढून दाखवू ? का तुमच्या ह्या यजमानाशी कुस्ती खेळून दाखवू ? काय करू सांगा ?

**मी :** छेः छेः तसलं भलतं सलतं काही करू नका कृपा करून...म्हणजे बायकोचा दुरूस्त होईल पाय पण नवऱ्याच्या हाडांचं काय ? काय ? पाय कायची करामत आली नाही ना लक्षात ?

वाईने) चला आटपा पाय दाखवा लौकर. मला अजून चार
वंड्या : हो
बघायला जायचं आहे दुसरीकडं...
जगात आ
कु...ब : मी मुळीच दाखवणार नाही पाय...

मास्तर : अहो, तुम्ही पाय दाखवायला वेळ लावलात तर माझ्या पोटावर पाय येईल. (स्वतः हसतो) माझ्या पायावरचा विनोद फुकटच गेलेला दिसतो!

मी : असं काय करतेस? दाखव ना पाय त्यांना—

कुटुंब : नाही...नाही...नाही...मी पाय दाखवणार नाही.

मी : ऐक माझं—मी पाय धरतो पाहिजे तर पण पाय दाखव.

कुटुंब : छळा...छळा मला सगळीजणं...घ्या (पलंगावरून पाय खाली सोडते) करा काय करायचं असेल ते...

मास्तर : (अस्तन्या सरसावून बसतो) थोडं टर्पेंटाईन देता आणून?

मी : टर्पेंटाईन?...थांबा हं...आत्ता समोरच्या दुकानातून आणतो...आलोच मी...

मास्तर : रॉकेल तरी आहे?

मी : हो...आहे...हे घ्या... (जवळ असलेली रॉकेलची बाटली देतो) टर्पेंटाईन आणतोच आता — (मी जातो)

कुटुंब : (दाराकडे पाहात) मला भीती वाटतेय हो या मास्तरांची—

मास्तर : हे बघा वहिनीसाहेब, मी काही रस्त्यावरचा वैदू नाही. तुमच्या यजमानानी बोलावलं म्हणून आलो. मी अडला नारायण आहे म्हणून तुमचा पाय धरायला आलो आहे असं समजू नका. करा पाय पुढं—

कुटुंब : अहो पण...

मास्तर : हे बघा तुम्हाला दाखवायचा नसेल पाय तर नका दाखवू—गेला उडत तुमचा पाय—मला काय इतर पाय नाहीत बघायला? (दरडावून) मुकाट्यानं पाय पुढं करा—

कुटुंब : मास्तर...पण अगदी हळू चोळा हो...तुमच्या पाया पडते मी... (तालीम मास्तर बजरंग बैठक मारून पाय चाचपतो. चोळतो. कुटुंब विव्हळते. मास्तर तिकडे लक्ष देत नाही. मास्तर पाऊल खेचू लागतो. कुटुंबाचा आवाज चढतो. तरीही मास्तर निर्विकार आहे. त्याचे ओढणे आणि पाय पिळणे चालूच आहे)...अहो...अहो ...मेले...मेले...धावा...धावा...सोडा पाय माझा...मेले...मेले...(मास्तर पाय तर सोडीतच नाही उलट दातओठ खाऊन पायाची ओढाताण करतो) मेले ग बाई

मी...मी काही जगत नाही आता...अरे रघ्या, बंड्या, पाय हातात घेतला
धावा रे कुणीतरी...

**मास्तर** : उगाच काय आरडाओरडा करताय? जरा सोसलं पाहि दुसऱ्या पायाने टर्पेंटाईन

(पुन्हां पाय ओढतो)

**कुटुंब** : कसलं सोसताय आता...मेले...ग...मेले...अहो तुम्ही मास्तर आहात का राक्षस आहात? कसाई आहात...कसाई...दैत्य...चांडाळ... नराधम...अरे या मास्तरला धरा रे कुणीतरी...

(डॉक्टर हातात बॅग घेऊन येतात)

**डॉक्टर** : काय झालं? काय झालं?

**कुटुंब** : बरं झालं तुम्ही आलात डॉक्टर...मला वाचवा याच्या हातनं—

**डॉक्टर** : (मास्तरला) अहो मिस्टर, काय चाललंय हे? बाईमाणसावर हात टाकता?

**मास्तर** : बाई माणसावर नाही बाई माणसाच्या पायावर—आणि तुम्ही कोण विचारणार मला

**डॉक्टर** : मी डॉक्टर आहे—

**मास्तर** : डॉक्टर असलात तर दवाखान्यात. इथं काय त्याचं?

**डॉक्टर** : पण आपण कोण?

**मास्तर** : मी तालीम मास्तर वेडके.

**डॉक्टर** : वेडके काय? वा रे वेडके? वेडके, त्यांचा पाय का धरलात?

**मास्तर** : दुरुस्त करण्यासाठी.

**डॉक्टर** : व्हा बाजूला—अगोदर—माझी केस आहे ही.

**मास्तर** : केस तुमची असेल—पण पाय माझा आहे.

**डॉक्टर** : अहो मी फॅमिली डॉक्टर आहे—

**मास्तर** : मग मीही फॅमिली मास्तर आहे.

**डॉक्टर** : फॅमिली मास्तर? तुम्हांला अर्थ तरी कळतो का याचा?

**मास्तर** : न कळायला काय झालं? फॅमिली मास्तर म्हणजे फॅमिली असलेला मास्तर—अहो आमचं इंग्रजी कच्चं असलं तरी थोडं कळतं आम्हाला—

**डॉक्टर** : आधी बाजूला व्हा—

**मास्तर** : होणार नाही—

**डॉक्टर** : मग धक्के मारून बाहेर घालवावं लागेल तुम्हांला.

वंड्या : हो ग ... फॅमिली डॉक्टर मला धक्के मारण्यापूर्वी स्वतःचा विचार
जगात आहे ... तालीम मास्तर. तेव्हा मला धक्के मारताना तुमची हाडं मोडली
कुटुंब : नैतिक आणि शारीरिक जबाबदारी माझ्यावर नाही, समजलं?

मास्तर : पण तुम्ही हा पाय सोडा...

मास्तर : सोडणार नाही. हा पाय काही मी सोडण्यासाठी धरलेला नाही...

(मास्तर पाय ओढतो. कुटुंब किंचाळते.)

डॉक्टर : तुम्हाला डोकं आहे की नाही? करेल फिरवल्यासारखा पाय फिरवता आहात तुम्ही?

मास्तर : हां, डॉक्टर मला शिकवू नका तुम्ही...आजपर्यंत तीनशे सदुतीस पाय दुरूस्त केले आहेत मी...हा तीनशे अडतिसावा—

डॉक्टर : अहो पण पेशंटची इच्छा नाही तर तुमची का बळजबरी?

मास्तर : पेशंटचा संबंधच कुठं येतो यात? पेशंटनं मला बोलावलेलं नाही. पेशंटच्या यजमानानी बोलावलं आहे.

डॉक्टर : पण माझं औषध चालू आहे त्यांना...

मास्तर : खुशाल चालू ठेवा...मी कुठं नको म्हणतोय?

डॉक्टर : पण त्यांच्या प्रकृतीला असले उपाय सोसणार नाहीत—

मास्तर : पण त्यांच्या यजमानांना सोसतात. हा पाय त्यांनी माझ्या हातात दिला आहे. आता खुद्द परमेश्वरानं जरी सांगितलं तरी फार तर मी त्याचे पाय धरीन पण हा पाय सोडणार नाही–

डॉक्टर : मी बऱ्या बोलानं सांगतो पाय सोडा.

मास्तर : मीही बऱ्या बोलानं सांगतो की हा पाय सोडणार नाही.

कुटुंब : डॉक्टर — मला सोडवा हो या मास्तरच्या तावडीतनं? त्याला कात्रीनं ढोसा, इंजक्शनच्या सुइनं टोचा काय वाटेल ते करा...पण माझा पाय सोडवा...

डॉक्टर : तुमच्या यजमानांना नसते उद्योग सांगितले होते कुणी करायला?

कुटुंब : अहो...पण डॉक्टर...डॉक्टर...

डॉक्टर : डॉक्टर गेला मसणात...काय वाटेल ते करा...मी चाललो. (ताडताड डॉक्टर निघून जातो.)

मास्तर : जाऊ दे गेला तर...अहो औषधावाचून डॉक्टर गेला...मी आहे ना इथं–

कुटुंब : काही नको...केलेत तेवढे हाल पुरे झाले माझे–

**मास्तर** : हे पाहा वहिनीसाहेब, एकदा मी केस म्हणजे पाय हातात घेतला की तिचा म्हणजे त्याचा निकाल लागेपर्यंत सोडत नाही...

**कुटुंब** : सोडत नाही काय ? तू नाही तुझा बाप सोडील. (कुटुंब दुसऱ्या पायाने मास्तरला लाथ मारते. मास्तर पाय सोडून उताणा पडतो. त्याचवेळी मी टर्पेंटाईन घेऊन धावत येतो.)

**मी** : काय झालं ? काय झालं ?

**मास्तर** : तुमचं कुटुंब एवढं लाथाळ असेल असं वाटलं नव्हतं हो मला... तुमचं कसं काय होत असेल देव जाणे ?

**मी** : आमचं सोडा हो–तुमचं काम तर झालं ना आजचं ?

**मास्तर** : कसलं कर्मांचं झालं ? अहो अजून टर्पेंटाईन लावून चोळला पाहिजे पाय...

**कुटुंब** : हात तर लाव पुन्हा माझ्या पायाला...तुडवीनच पायाखाली तुला...

**मास्तर** : अहो, हे काय तुमचं कुटुंब म्हणायचं का सँडो ? कसली लाथ हाणली मला...

**मी** : लाथ ? हे पाहा मास्तर...आता आजच्या दिवस राहू द्या...उद्या बघू...

**मास्तर** : (चिडून) उद्या बघू ? मला काय समजता तुम्ही ? मला काही दुसरा उद्योग नव्हता म्हणून तुमच्या कुटुंबाचा पाय धरायला आलो ?

**मी** : असं रागावू नका मास्तर...

**मास्तर** : रागावू नको तर काय करू ? माझा अपमान केला तुमच्या कुटुंबानं आणि त्या फॅमिलीवाल्या डॉक्टरनं...

**मी** : डॉक्टरनं ?

**मास्तर** : हो हो...तो आला होता इथं बॅग हलवीत...

**कुटुंब** : रागावून गेले डॉक्टर...तुम्हांला काय त्याचं ?

**मास्तर** : हो हो...बॅग हलवीत आला आणि हात हलवीत परत गेला.

**कुटुंब** : आधी या मास्तरला घराबाहेर काढा बघू...

**मास्तर** : कुणाला बोलता आहात तुम्ही !

**कुटुंब** : तुम्हाला...निघा मुकाट्यानं...

**मास्तर** : तालीम मास्तर झालो म्हणून अपमान सुद्धा सहन करीन का काय मी ? अहो मला चक्क लाथ मारली यानी. राक्षस म्हणाल्या...चांडाळ म्हणाल्या (रडू लागतो)

मी : उगी उगी मास्तर...उगी उगी...

मास्तर : उगी उगी करू नका...माझे पैसे द्या आधी...

मी : किती द्यायचे ?

मास्तर : पाच रुपये...

कुटुंब : पाच रुपये ? मुळीच देऊ नका. उलट माझा पाय जास्त दुखावल्या-बद्दल दहा रुपये घ्या त्याच्याकडनंच...

मास्तर : बघा बघा...कसं बोलताहेत त्या !

मी : मास्तर एक तारखेनंतर मी तुमचे पैसे देईन...मी माफी मागतो तुमची—

मास्तर : माफी मागा – किंवा न मागा पण पैसे मात्र विसरू नका—ठीक आहे. मी जातो आता...मला नको ही तुमची केस...मी जातो पण लक्षात ठेवा... तुमच्या कुटुंबाला जाऊ दे तरी आमच्या तालमीवरनं...मग सांगीन काय ते...

कुटुंब : अरे जा...जा...तुझ्यासारखे छप्पन्न तालीम मास्तर धुणी धुवायला होते माझ्या माहेरी—

मास्तर : बघा...बघा...अजून माझा अपमान चालूच आहे...पण याद राखा...मी नावाचा वेडके तालीम मास्तर...(जातो) (मीही त्याच्या मागे जाऊ लागतो)

कुटुंब : मागं फिरा, कुठं निघालात ?

मी : कुठं नाही...

कुटुंब : मग उभे रहा इथं...(मी उभा राहतो)

मी : काय ?

कुटुंब : हा तालीम मास्तर कशासाठी आणला होतात तुम्ही ? माझ्यावर मारेकरीच घालायचा होता तर सरळ सरळ मला मारायचं होतत...त्यासाठी पाय बरा करायचं ढोंग कशाला ?

मी : अग पण तसं नाही—

कुटुंब : नाही कसं ? तसंच आहे...मी नकोशी झाली आहे ना तुम्हाला ? मी मरावं असं वाटतंय तुम्हांला...

मी : अग नाही...

कुटुंब : तेवढंच पाहिजे ना तुम्हाला...ठीक आहे...मीच या खिडकीतून उडी मारते आणि मरते...

मी : खिडकीतून ?

कुटुंब : हो...

मी : अग पण... खिडकीतून म्हणजे...

कुटुंब : खिडकीतून म्हणजे खिडकीतून—मला पोचवा त्या खिडकीपर्यंत—

मी : मी नाही तुला मरणाच्या दारात नव्हे मरणाच्या खिडकीत नेणार—

कुटुंब : मग मीच जाते...

मी : तसं करू नकोस...आधीच एक पाय मुरगळलेला आहे... दुसराही मोडेल कदाचित...

कुटुंब : मला मरायचं आहे. जगायचं नाही...

मी : हो, पण खिडकीतून उडी टाकून तू मरणार नाहीस...कारण खिडकी तशी फार म्हणजे मरता येईल इतकी उंच नाही—

कुटुंब : तरी मी मरेन—मी उडी टाकणार म्हणजे टाकणार—

मी : अग पण तुला खिडकीपर्यंत तरी चालत जाता येईल का ?

कुटुंब : खुरडत जाईन पण जाईन...

मी : असं करू नये वेड्यासारखं... चल पडून रहा बघू तू थोडा वेळ. (मी तिला हात द्यायला जातो. ती हात झिडकारते)

कुटुंब : हात लावू नका माझ्या अंगाला...(पलंगावरून उठते. पलंगाला धरीत धरीत चालते. माझी तारांबळ)

मी : अग पण ऐक माझं...एकदम मरण म्हणजे फार होतय हे—

कुटुंब : होऊ दे, पण मी आता ऐकणार नाही...निघाले मी...

मी : जाऊ नकोस...पाय बरा होईपर्यंत तरी थांब...मग जा हवं तर...

कुटुंब : नाही...मला आत्ताच गेलं पाहिजे...गेलं पाहिजे...

मी : जा...खुश्शाल जा...

(मी खुर्चीत शांतपणे बसतो. कुटुंब खिडकीपर्यंत जाते. मी डोळे गच्च मिटून घेतो. पण काही आवाज येत नाही म्हणून डोळे उघडून पाहातो. तेवढ्यात बाळक्या येतो. पाहतो)

बाळक्या : यह क्या कर रही हो तुम दिदी...

मी : (शांतपणे) ओ जीव देती है !—तू बाजूला हो बाळक्या—

बाळक्या : म्हणजे मौत ! नही पंत मौत इतनी सस्ती नही है...पंत, प्यार हो जाता आहे किया नही जाता—वैसी मौत भी आती है लायी नही जाती

—मौत, जिंदगी का गीत की आखरी लकेर होती है...वह जिंदगी के चित्रपट का 'समाप्त' स्लाइड है...दिदी मेरी कसम है...मरो मत...मरो मत...धीर धर आणि पंताना म्हण—किस्मत हमारे साथ है। मरनेवाले मरा करे।

## पडदा

# अंक दुसरा

२०००२ २८।१०।८३
नाटक

(माईकपुढे मी)

**मी :** मंडळी, हसू नका माझ्या परिस्थितीला. मला माहीत आहे, तुम्ही मनातल्या मनात म्हणत असाल – काय हा माणूस, काय ह्याचं कुटुंब, काय ह्याची पोरं...पण मी गळ्याशप्पथ सांगतो हे सगळं मला अनावर झालं आहे. पोरं कुटुंबाच्या संस्कारात वाढली आहेत. माझ्या संस्कारांचा त्यांच्यावर परिणामच झाला नाही. असं का हे मला आजपर्यंत कळलेलं नाही. संसार खूप पाहिले मी आणि तुम्हीही पाहिले असतील परंतु आमच्या संसारासारखा संसार दुनियेच्या पाठीवर कुठे असेल की नाही याची शंकाच आहे. आमच्या कुटुंबाचा हट्टीपणा पाहिलात तुम्ही. त्यात काही तरी शिकायची हट्टी हौस...मला तर संसार नको पण कुटुंब आवरा अशी आरोळी द्यावीशी वाटते. (मी जातो. मागचा पडदा उघडतो. आमच्या बिऱ्हाडात कोणीही नाही. कुटुंब शेजारींच कुठंतरी गेलेलं आहे वाळक्या बाहेरून येऊन डोकावतो. घरात कुणी नाही याची खात्री करून घेतो आणि अधिरतेने सुरेखाला ये ये म्हणून हाताने खुणावतो. सुरेखा ही १८-२० वर्षांची मुलगी. दिसायला बरी. पण हेअरस्टाईल वगैरे करून अधिक सुंदर दिसण्यासाठी धडपडणारी. सिनेमावेडी.

–मौत, ि सिनेमाविषयक थापावर भाळलेली.)

चित्रपटच्या : बहारो फूल बरसाओ मेरा मेहबूब आया है (गातो) — (सिनेमा मत ल्ने हावभाव करीत) आईये ... आइये ... मेरी सपनो की देवता ... आइये सुरेखा येते)

सुरेखा : अय्या ? इथं राहतोस तू ?

बाळक्या : जी हां ... मैं यहाँ रहता हूँ ... लेकिन मेरा दिल तेरे पास रहता है ... (गातो) मैं यहाँ और दिल वहाँ

बता दो मुझे तू है कहाँ —

सुरेखा : घरांत कुणीच नाही ?

बाळक्या : या घरकेला कोणीही नाही ... ना पंत–ना दिदी ... सिर्फ तुम और मै ... चाँद और चांदनी ... शमा और परवाना ...

सुरेखा : कसं छान बोलतोस रे तू ? मला नाही हिंदी बोलता येत असं सिनेमातल्यासारखं ...

बाळक्या : सिर्फ तेरे लिये सुरेखा ... सिर्फ तेरे मोहब्बत के लिये मैं जिंदगी का यह लम्बा रास्ता काट रहा हूं ...

सुरेखा : खरं म्हणतोस ?

बाळक्या : तेरे लिये क्या न कर सकता मै...चाहे तो चाँद भी आस्मानसे खीच लूंगा...संसार मे एकही चीज सच है सुरेखा...जिसको कोई मोहब्बत कहते हैं कोई प्यार कहते हैं... जब दिल धोखा देने लगता है तब प्यार हो जाता है...खरं सांगू सुरेखा तुला प्रथम पाहिलं तेव्हाच मनात आलं की (गातो)

तुमसे ओ हसीना कभी मोहब्बत न मैंने करनी थी
मगर मेरे दिलने मुझे धोका दे दिया...

सुरेखा : आलं लक्षात...पण मला हे सांग की ही जागा कुणाची आहे ?

बाळक्या : अग माझीच आहे. सध्या माझ्या मावसबहिणीला दिली आहे वापरायला...मेरे शादी के बाद...एक घर बसाऊंगा तेरे घर के सामने...

सुरेखा : पण मग तुझी बहीण कुठं राहील ? (कुटुंब आतून बाहेर येते व पाहते)

बाळक्या : राहील मसणात—

कुटुंब : मेल्या मी काय रस्त्यावर पडलेय मसणात राहायला ? (बाळक्या ताड कन उडतो.)

बाळक्या : बाप रे...

कुटुंब : ही कोण आणलीस घरात ?

बाळक्या : तू कशाला आलीस दिदी ? मेरी ख्वाब की दुनिया टूट गयी... यह है सुरेखा...मेरी मेहबुबा...

कुटुंब : कसली बुब्रा म्हणालास ?

बाळक्या : मेहबुबा......

कुटुंब : मेल्या मुसलमानीण पोरीच्या का मागं लागला आहेत तू ?...आणि काय रे बाळक्या मला नाक वर करून मघाशी सांगितलस की मी तुला पोहायला शिकवणार आहे म्हणून...

बाळक्या : (आठवण होऊन) ओफ्...माफ करना दिदी...मी अजिबात विसरलो बघ...मी येतोच आता परत—तुझा स्वयंपाक व्हायचाय ना अजून ? ...तू तो आटप लौकर...जा...जा ना...प्लीज दिदी...

कुटुंब : मी तयारी करून ठेवते सगळी...लौकर ये नाहीतर टाळकंच शेकीन मेल्या तुझं (आत जाते)

सुरेखा : (इतका वेळ भिऊन बाजूला उभी आहे)...हीच का तुझी वहीण ?... काम भारी दिसतंय (तिला दटावतो) मला उशीर होतोय घरी जायला...

बाळक्या : छोड दो घर की बात...सुरेखा (कुटुंब ऐकत नाही याची खात्री करून घेतो) इतनी मासून शाम है—यह हवा दिल बहलाती है—और तुम्हारे जैसी खूबसूरत परी मेरे पास है—

सुरेखा : आणि आत आपला बहिणोबा आहे...

बाळक्या : चूप...सुरेखा...तुम नही तो कुछ नही...तुम्हारे बिगर यह जिंदगी बेकाम है...हमेशा तुम मेरे पासही रहना...

सुरेखा : पासही रहूँगी लेकिन...परीक्षेत नापास झाले तर माझी आत्या फाडून खाईल ना मला...मला जाऊ दे आता...खूप उशीर झाला आहे...पण परवा मला शूटींग दाखवायला नेणार आहेस ना ?

बाळक्या : क्यूं नही ? जरूर ले जाऊँगा...

सुरेखा : मग मी जाऊ आता ?

बाळक्या : तुझे जानाही होगा तो जाइए मेहबुबा
लेकिन ख्वाब बनके आना मेरे दिलरुबा...

–मै पण मी मघाशी जे सांगितलं त्याची आठवण आहे ना तुला ?

**सुरेखा :** नसायला काय झालं ? (पर्स उघडून दहा रुपयाची नोट काढते) हीच ना ?

**बाळक्या :** करेक्ट...सुरेखा...यहही प्यार की बडी निशानी है...सचमुच सुरेखा मैं प्यार का प्यासा हूँ...पैसे का नही...(नोट खिशात घालतो) क्यूँ की पैसा तो आता है और जाता है...प्यार हमेशाके लिये दिल में रह जाता है...

**सुरेखा :** आता तरी इजाजत देना जाने के लिये (जाऊ लागते)

**बाळक्या :**

**रुक जा ओ जानेवाली रुक जा**
**मैं तो राही तेरी मंझील का**
**नजरों में तेरी बरात की**
**आदमी बुरा नही ये दिल का...**

थांब मी येतो तुला पोचवायला...(तिच्या बरोबर जातो.)

(बाळक्या व सुरेखा गेल्यावर कुट्टंब आतून येते. बाळक्या आहे का गेला हे पाहते आणि खुर्ची मधोमध ओढून घेते. खुर्चीच्या पुढे एकावर एक अशा दोनतीन गाद्या पसरते. सर्व ठाकठीक झालं आहे की नाही हे पाहते. दाराकडे पाठ करून खुर्ची ठाकठीक करीत असतानाच सलूनवाला येतो. आलेला तो बाळक्या या ठाम समजुतीने कुट्टंब ओरडते.)

**कुट्टंब :** मेल्या तुला काळवेळेची काही शुद्ध ! आत्ता येतो म्हणालास आणि इतक्या वेळानं उगवलास होय तू ?

**सलूनवाला :** ओ बाई ते बी. राम इथच राहतात ना ?

**कुट्टंब :** (वळून पाहते.) कोण पाहिजे आपल्याला ? कोण बी. राम ?

**सलूनवाला :** ते फिल्म स्टोरीवाले—

**कुट्टंब :** ते होय ? हो इथंच राहतात. पण सांगून ठेवते. स्टोरी पाहिजे असेल तर दहा हज्जार रुपये पडतील...

**सलूनवाला :** अहो...पण बाई...

**कुट्टंब :** दहा हजारापेक्षा एक दमडी कमी घेणार नाही. तुम्ही म्हणाल साडे-नऊ हज्जाराला द्या म्हणून...पण जमायचं नाही–आधीच बजावून ठेवते...

**सलूनवाला :** पण बाई आमची स्टोरी वेगळी आहे–दोन रुपयांची स्टोरी आहे ती—

म्हैस येता माझ्या घरा— 

कुटुंब : दोन रुपयांची असली तरी दहा हजारच पडतील...

सलूनवाला : मी सलूनवाला आहे बाई...

कुटुंब : सलूनवाला असा नाही तर कल्हईवाला असा दहा हजाराच्या खाली बोलणार नाही मी...

सलूनवाला : मला त्यांनाच भेटायचं आहे...

कुटुंब : त्यांना भेटलात तरी दहा हजारच द्यावे लागतील. समजलं ?

सलूनवाला : केव्हा येतील ते ?

कुटुंब : आइंटमेंटला गेले आहेत...तुम्ही उद्या या...

सलूनवाला : ठीक आहे...सलूनवाला येऊन गेला म्हणून सांगा त्यांना...

कुटुंब : सांगते.. पण दहा हजार लक्षात ठेवा तुम्ही...या आता. (सलूनवाला जातो.) ह्या बाळक्याला मेल्याला वेळेचं भान म्हणून नसतं कधी...भाऊ म्हणून गय करते मी त्याची...रघ्या बंड्यानं असं केलं असतं तर चांगली कणीकच तिंबली असती मेल्यांची...(एकदा खुर्चीवर चढून गादीवर उतरते. तेवढ्यात बाळक्या धामाधुम होऊन येतो. तो शिव्या देतच येतो.)

बाळक्या : हरामखोर लेकाचे...

कुटुंब : काय झालं रे बाळकरामा ?

बाळक्या : मूर्ख लेकाचे...रस्त्यात अडवतात...

कुटुंब : पण का ?

बाळक्या : (लगेच भानावर येऊन) छोरी द्या म्हणे. जो उठतो तो छोरी मागतो...अरे छोऱ्या काय झाडाला लागतात ?

कुटुंब : छोऱ्यासाठी का अडवलं तुला मेल्यांनी ? ती पोरगी पण छोरीच मागत होती काय रे मघाशी ?

बाळक्या : (जीभ चावतो) नाही तर काय ? पानवाल्याला छोरी पाहिजे, सिगारेटवाल्याला छोरी पाहिजे, लॉंड्रीवाला छोरी संपवा म्हणतो...काय आहे काय हा चावटपणा ?

कुटुंब : आणि हो...सलूनवाला आला होता आता इतक्यात...त्याला मी दहा हजार रुपये सांगितले छोरीचे...

बाळक्या : सलूनवाल्याला ?

कुटुंब : मग सोडते की काय ?

बाळक्या : त्यानं छोरी मागितली ?

कुटुंब : तो मेला काय मागतोय? त्याला बोलूच दिलं नाही मी...मला म्हणाला बाई आमची थ्योरी वेगळी आहे. मी म्हटलं वेगळी असली तरी दहा हजारच पडतील...

बाळक्या : मग काही म्हणाला तो?

कुटुंब : का रे? त्याला थ्योरी नको होती?

बाळक्या : नको होती. तो सलूनवाला आहे ना? त्याला सलूनकार पाहिजे म्हणून माझ्या मागं लागला आहे तो...

कुटुंब : मग मरू दे मेल्याला... तुझं संपलं ना बाहेरचं काम? तू सांगितलीस तशी तयारी करून ठेवली आहे सगळी...ही खुर्ची...ह्या गाद्या...

बाळक्या : दिदी खरं सांगू...या वयातही तुझी पोहायला शिकायची हौस पाहिली की आदरानं तुझ्यापुढं मान झुकवावीशी वाटते...

कुटुंब : मेल्या, मान झुकव नंतर किती झुकवायची असेल तेवढी...आधी हे पोहण्याचं सांग काय सांगणार आहेस ते—

बाळक्या : हो सांगतो—या खुर्चीवर उभी राहा अशी (खुर्चीवर स्वत: उभा राहतो.) आणि अशी उडी मार. (उडी मारून गादीवर पडतो)...ह्या गाद्या म्हणजे पाणी समजायचं...कळलं? मार बघू उडी आता? (कुटुंब खुर्चीवर चढून उडी मारते. बाळक्या 'शाब्बास' म्हणून टाळ्या वाजवतो. कुटुंब धडाधड उड्या मारू लागते. रघ्या आणि वंच्या बाहेरून येतात आणि आईच्या नव्या कर्तबगारीकडे बघत राहतात. आणि पोट धरधरून हसतात. कुटुंब त्यांच्याकडे दुर्लक्ष करते.)

कुटुंब : (एकदम कसली तरी आठवण होऊन) मेल्या, डाळ जळली असेल माझी—(बाई बाईने आत जाते)

रघ्या : (पुढे येऊन) काय बाळक्यामामा...आई काय करीत होती रे!

बाळक्या : तुम्हांला काय करायचं आहे त्याच्याशी?

रघ्या : प्रश्नाचं उत्तर द्यावं—पुन्हा प्रश्न विचारू नये—

बाळक्या : विचारीन मी—मामा आहे तुमचा...

रघ्या : मामा म्हणे. पण तुला बाबा ढोंग्या म्हणतात हे माहीत आहे का तुला?

बाळक्या : कुणाला?

रघ्या : तुला तुला ... ढोंग्या बाळक्या असं म्हणतात—

बाळक्या : थांब ताईलाच सांगतो मी...

रध्या : म्हणे ताईला सांगतो मी. अहा
खातोस होय?

वाळक्या : रध्या, मी मोठा आहे तुझ्याहून...

रध्या : नुसतं वय वाढलं म्हणजे अक्कल वाढत नाही—
नेहमी मला...

बंड्या : अन् तू तर एरंडासारखा वाढला आहेस, असं बाबा
नेहमी...

ठक्या : तुम्ही काय पोरं आहात की भुतं?

तू तरी काय मामा आहेस की बोका?

: एकेकाचं थोबाड फोडीन म्हणजे कळेल...

अरे जा थोबाड फोडणेवाले...तुझ्या तंगड्या राहतील का विजारीत?

: रध्या...बरं नव्हे हे सांगून ठेवतो आधी...

अरे जा, जा...दरवेळी येऊन आमच्याबद्दल आईला काहीतरी
आणि आम्हाला मार बसवतोस...

: तुम्ही कार्टीच तसली आहात...

तू तरी काय असा दिवटा लागून गेला आहेस? तुला तुझ्या वडि-
ातनं हाकलून दिलं हे काय आम्हाला माहीत नाही असं वाटलं की
तू बेकार आहेस हेंही आम्हाला माहीत आहे...तुझा रुबाब फुकटचा
ह...दुसऱ्याच्या जिवावर मोहब्बत करीत फिरतोस हेही कळलं आहे
आम्हाला—

बाळक्या : माझी छोरी गेली म्हणजे कळेल तुला माझी किंमत...

रध्या : अरे रस्त्यावरचं कुत्रं वास सुद्धा घेणार नाही तुझ्या छोरीचा...जा
आत ताईच्या मागं...(रध्या त्याला ढकलतो. बाळक्या धडपडत आत जातो.) बंड्या
आपण पण उड्या मारू या...चल...

(रध्या आणि बंड्या खुर्चीवरून टेबलावरून धडाधड गाद्यावर उड्या मारतात.
त्यांत दंग होतात. तेवढ्यात कुटुंब स्वयंपाकघराच्या दारात येऊन उभें राहते.
मागें बाळक्या.)

बंड्या : दादा, आता आईसारखी उडी मारून दाखव पाहू?

रध्या : दाखवूं? बघ हां! (रध्या कुटुंबासारखा जडपणे चालण्याची नक्कल करीत
मोठ्या कष्टाने खुर्चीवर चढतो. आणि कुटुंबाची नक्कल करीत उडी मारतो.)

राहिलास...ऊठ ना !

कुटुंब : तो मेला काय मागतोय ) मेल्या उठवत नाही मला एवढंसुद्धां कळ-

म्हणाला बाई आमची छोरी हे नाही ना तुला? मुर्दाड आहेत कार्टी अगदी...

हजारच पडतील...

ले तरी ही कार्टी मला उठवायला मागंपुढं पाहायची

बाळक्या : मग

ट धरधरून हसतात. कुटुंब आवाज न करता मागून येते. आणि

कुटुंब : का

पकडते)

बाळक्या

म्हण : मेल्या, किडे पडतील तुझ्या तोंडात...आईची नक्कल करतोस ?

बाळक्या : दे दोन ठेवून थोबाडीत त्याच्या... (रघ्या हिसडा मारून उठतो आणि पलंगाखाली जातो. कुटुंब रांगल्यासारखे गुडघ्यावर बसून पलंगाखाली वाकून बघत. बाळक्या दुसऱ्या बाजूने वाकून बघतो) तो बघ...तो बघ...त्या कोपऱ्यात बसलाय...

कुटुंब : मेल्या, पलंगाखाली गेलास म्हणजे काही पाताळात नाही गेलास— रघ्या, बाहेर ये मुकाट्यानं...नाहीतर तिथं येऊन चेचीन मी तुला...बाळक्या, काठी आण रे आतली. (बाळक्या धावत जाऊन काठी आणतो. कुटुंब काठीने रघ्याला ढोसू पहाते. रघ्या काठी पकडून ठेवतो.) रघ्या मेल्या, काठी सोड...

रघ्या : (खालून) सोडणार नाही...

कुटुंब : थांब मेल्या, तूं असा ऐकायचा नाहीस...बाळक्या धर रे काठी

(बाळक्या आणि कुटुंब दोघं मिळून काठी ओढतात. रघ्या एकदम काठी सोडून देतो. कुटुंब आणि बाळक्या धडपडत उताणे पडतात. बंड्या टाळ्या पिटून हसतो. आपल्या पराभवाचा राग कुटुंब बंड्यावर काढते. बंड्याला दोन धपाटे बसतात.)

बंड्या : मला का म्हणून मारतेस ? मी काय केलं ?

कुटुंब : मेल्या, नुसता दगडासारखा उभा राहिलास इथं...काठी धरायला मदत केली असतीस तर गाठोडं गेलं असतं तुझ्या काकाचं ?

बाळक्या : नाही तर काय ? आणि हसतोय टाळ्या वाजवून...

कुटुंब : (पलंगाजवळ वाकून) मेल्या, मुकाट्यानं बाहेर ये...नाहीतर खरोखर धोंडा मारीन तुला...

बाळक्या : मी आणून देतो धोंडा तुला...पलंगाखाली बसायचा काय चावटपणा लावला आहे ?

कुटुंब : बाळक्या आणच एक चांगला मोठा धोंडा...मेल्याच्या डोस्क्यातच घालते...

**वाळक्या** : चांगला मोठा धोंडा आणतो...(वाळक्या निघतो आणि मी येत असताना मला धडकतो.)

**मी** : कुठं निघालास बाळक्या ?

**बाळक्या** : धोंडा आणायला...रध्याच्या डोस्क्यात घालायचा आहे... तुम्ही बाजूला व्हा.

**मी** : मूर्ख, मागं फिर — रघ्या कुठं आहे ?

**कुटुंब** : तो मेला बसलाय पलंगाखाली लपून...

**मी** : अरे रघू, बाहेर ये पाहू...

**कुटुंब** : ये तर मेल्या बाहेर...तुला चेचते की नाही ते पहा—

**रघ्या** : (खालून) बाबा, मी मुळीच बाहेर येणार नाही. जन्मभर इंथच राहावं लागलं तरी चालेल.

**मी** : अरे ये बाहेर...मी आहे इथं...मुळीच घाबरू नकोस...

**वाळक्या** : यामुळंच मुलं बिघडतात पंत—

**मी** : बाळकरामशेठ, तुम्ही असेच बिघडलात वाटतं ?

**कुटुंब** : आमचा बाळकराम बिघडला म्हणायला काहीच कसं वाटत नाही तुम्हाला ! (रघ्या हळूच पलंगाच्या बाहेर येतो आणि कुटुंबापासून दूर जातो.)

**मी** : वाद नको...मी चुकलो...तुमचा बाळकराम फार हुशार, फार सुधारलेला, फार चाणक्ष, फार उद्योगी...बस्सं...

**कुटुंब** : आहेच मुळी...उगीच नाही त्याच्या फिलमीच्या ष्टोरीला दहा हजार रुपये मिळणार आहेत. टेन थावजंड नाही का रे बाळकराम ?

**बाळक्या** : अर्थात्...

**कुटुंब** : आणि दहा हजार पेक्षा एक दमडी कमी करणार नाही तो. होय की नाही रे बाळक्या ?

**वाळक्या** : अर्थात...(दरम्यान मी पसरलेल्या गाद्या, त्याजवळची खुर्ची याकडे पाहातो.)

**मी** : बंड्या, अरे काय हे ? घर आहे की वेटिंग रूम ! या गाद्या काय पसरल्या आहेत.

**बंड्या** : त्या आम्ही नाही पसरल्या...आईनं पसरल्या आहेत...

**मी** : आईनं ?

**बंड्या** : हो आईला गाद्या पातळ करायच्या होत्या—

**मी :** गाद्या पातळ करायच्या होत्या ? मी नाही समजलो —

**रध्या :** हो बाबा, आई खुर्चीवर उभी राहून धाडकन् गाद्यावर उड्या मारीत होती आणि हा बाळक्यामामा शाब्बास म्हणून ओरडत होता...

**मी :** (कुटुंबास) काय सांगताहेत मुलं ? तूं गाद्यावर उड्या मारीत होतीस ?

**कुटुंब :** मग मला भीती आहे की काय कुणाची ?

**मी :** (आश्चर्यानं) म्हणजे तूं गादीवर उड्या मारीत होतीस ?

**कुटुंब :** (ठासून) होय, मी मारीत होते उड्या. तुमची हरकत आहे काही ?

**मी :** छेः छेः माझी हरकत नाही...पण कशासाठी ? म्हणजे आनदानं बेभान होऊन मारीत होतीस की आपला वेळ जात नाही म्हणून मारीत होतीस ?

**कुटुंब :** मी जलतरण शिकणार आहे...

**मी :** (आश्चर्यानं) तूं...तूं...काय शिकणार आहेस ?

**कुटुंब :** जलतरणविद्या...

**रध्या :** हां...म्हणजे कपात पाणी ठेवून काटक्यानी कप वाजवायचे —

**बाळक्या :** मूर्खा, त्याला जलतरंग म्हणतात...

**मी :** मग जलतरण म्हणजे ?

**कुटुंब :** मी म्हणते रध्याला एक नसेल डोकं...पण तुम्हाला तरी कळायला पाहिजे – जलतरण विद्या म्हणजे पोहणं...

**मी :** मग पोहायला शिकणार आहे असं सांगायचं — जलतरण कशाला ?

**कुटुंब :** कां ? माझी शब्दसंपत्तीसुद्धा वाढलेली बघवत नाही ना तुम्हाला ? मी पोहायला म्हणणार नाही – जलतरणच म्हणणार – मग काय आहे म्हणणं तुमचं ?

**मी :** माझं काहीही म्हणणं नाही...पण हे पोहण्याचं वेड कुठून डोक्यात शिरलं तुझ्या ?

**कुटुंब :** तोंड संभाळून बोला. मी जे काही करीन त्याला वेड म्हणता तुम्ही. तेही पोरांच्या देखत...मेलं ह्या घरात राहणं असह्य करून टाकलंय एकेकानं... मला लागलंय वेड...काय करणार आहात तुम्ही ? दुसरी बायको करायची आहे तुम्हाला ? खुश्शाल करा—

**मी :** (धावरून) कुणाला ? मला ?...ह्या जन्मात दुसरी तर नाहीच पण पुढल्या पाच जन्मात पहिलीसुद्धा करणार नाही.

**कुटुंब** : जीभ लांब करून बोलता तेवढं येतं तुम्हाला...तुम्ही आत जा सगळीजणं–मला जलतरणाची प्रॅक्टीस करायची आहे इथं...

**मी** : इथं?

**बाळक्या** : हो इथं...पाण्यात कशी उडी मारायची ते मी तिला इथं शिकवतोय्...

**मी** : म्हणजे बाळक्या तुझा शिक्षक आहे?

**कुटुंब** : तुम्हाला उत्साह नाही. माझ्या बाळकरामाला आहे...कितीही झालं तरी बहिणीवर प्रेम आहे त्याचं—

**मी** : अग पण हे तुझं पोहायचं का वय आहे!

**कुटुंब** : पोहायला वय का लागतं?

**मी** : मग काय लागतं?

**कुटुंब** : पाणी लागतं—

**मी** : पण तुझी प्रकृती ही अशी–वय हे इतकं—आकार हा असा–वजन हे असं—

**कुटुंब** : मेलं कशाचं कौतुक म्हणून नाही तुम्हाला–इतर बायकांचे नवरे बघा...बायको विहिरीत पोहायला लागली की काठावर आनंदानं उड्या मारीत असतात...नुसते—

**मी** : उड्या मारीत असतील पण आपली बायको नक्की बुडणार या आनंदानं आणि तुला माहीतच आहे की उड्या मारल्या म्हणजे माझ्या पोटांत दुखतं... पण मी म्हणतो काय करायचं आहे पोहायला शिकून!

**कुटुंब** : शिकलं तर वाया नाही ना जायचं? समजा, उद्या एखादं धरण फुटलं तर हे पोहणं नाही का उपयोगी पडायचं?

**मी** : ते वय गेलं आता—

**कुटुंब** : मेलं धरण फुटायला सुद्धा का वय लागतं! मी कुणाचंच ऐकणार नाही. जलतरण शिकणार म्हणजे शिकणार...मी सांगते तसं करा–आजच्या आज एक भोपळा आणा...

**बाळक्या** : हो भोपळा असलाच पाहिजे...भोपळ्याशिवाय भागायचं नाही...

**कुटुंब** : जा, आधी भोपळा घेऊन या तुम्ही...रघ्या, बंड्या...तुम्ही चालते व्हा खेळायला...मला प्रॅक्टिस करायची आहे—

**मी** : अग पण—

**कुटुंब** : बोलू नका. आधी भोपळा आणायला जा...जा...म्हणते ना ?

(मी, रघ्या व बंड्या जातो. बाळक्या विजयी मुद्रेनं आमच्याकडे पाहतो. कुटुंब खुर्चीवर उभे राहते आणि मधला पडदा पडतो. मी माईकपुढं येऊन उभा राहतो)

**मी** : मंडळी, हा संसारसागर तरून जायलाच हवा ना ? भोपळ्याशिवाय तो तरता येईल असं वाटेना. मुकाट्यानं भोपळा आणला. तशी अनेकांची कुटुंबं पोहायला शिकतात हो. पण ती कशी आणि केव्हा...शिकतात ते कळतसुद्धा नाही. पण माझंच नशीब असं की आमचं कुटुंब पोहायला शिकतय् ही बातमी अत्यंत कुतूहलजनक ठरली. सबंध गल्लीतील तमाम घरांत यावर कडाक्याची चर्चा झाली. एवढी कडाक्याची चर्चा आपल्या लोकसभेतही कधी झाली नसेल. मी नानापरीनं कुटुंबाला पोहण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण कुटुंब थेंबभरसुद्धा मागं हटलं नाही. झाले काय की कुटुंबाला पोहायला भरीला घालणारा आमचा दिव्य मेव्हणा बाळक्या कुठल्यातरी असलेल्या—नसलेल्या अपॉइंटमेंटमागं निघून गेला आणि कुटुंबाच्या हट्टाग्रहास्तव एके दिवशी भल्या पहाटे मी, कुटुंब आणि भोपळा असे तिघेजण विहिरीवर गेलो. रघ्या आणि बंड्या काहीतरी अर्वाच्यपणा करतील म्हणून त्यांना घरातच ठेवलं.

(मागचा पडदा वर जातो. मी माईकपासून निघून जातो. आमचं बिऱ्हाड. रघ्या व बंड्या दोन गाद्यांवर लोळत आहेत. प्रथम बंड्या उठून बसतो.)

**बंड्या** : दादा, आई आणि बाबा केव्हा गेले रे ?

**रघ्या** : पहाटेच.

**बंड्या** : मग अजून कसे आले नाहीत ?

**रघ्या** : मी नक्की सांगतो...दोघंही तिथं भांडत बसली असतील...

**बंड्या** : आपण जायला पाहिजे होतं नाही तिथं ?

**रघ्या** : कशाला ? भांडण बघायला ?

**बंड्या** : नाही रे, आई कशी पोहते ते बघायला...

**रघ्या** : ती काय बघण्यासारखी गोष्ट आहे ?

**बंड्या** : पण तो एवढासा भोपळा पुरला असेल का रे आपल्या आईला ?

**रघ्या** : काही तरीच विचारतोस...बिनडोक आहेस तू अगदी...

**बंड्या** : तुला तरी कुठं आहे अक्कल ?—आई तर नेहमी म्हणते की तुला काडीचीही अक्कल नाही म्हणून...

रघ्या : बंड्या, तोंड संभाळून बोल...मोठ्या भावाला अक्कल नाही म्हणतोस ? लक्ष्मण रामाला म्हणत होता कधी असं ?

बंड्या : तूं राम होय ! आईला विचार–ती म्हणते तूं रावण आहेस नुसता रावण म्हणून—

रघ्या : बंड्या, थोबाडीत देईन ठेवून मी—

बंड्या : मार बघू हिम्मत असेल तर—

रघ्या : बंड्या, गाढवा—

बंड्या : रविटल्या—मूर्खा—

रघ्या : आचरट आहेस तू...

बंड्या : तूं महामूर्ख आहेस—

(रघ्या बंड्याच्या अंगावर धावून जातो. दोघांची मनसोक्त मारामारी होते. एकामेकांना उश्या फेकून मारतात. शेवटी रघ्या एक उशी उचलून बंड्याच्या अंगावर भिरकावतो. बंड्या ती चुकवतो. आणि ती उशी तावातावाने आत येणाऱ्या कुटुंबाला लागते. कुटुंबाच्या पाठीला बांधलेला भोपळा तसाच आहे.)

कुटुंब : मेल्यांनो, साधी उशी का मारता ! चांगला धोंडा घाला आईच्या डोक्यात–व्हा बाजूला...(तेवढ्यात गलका ऐकू येतो) आणा त्याना आत– (चारपाच लोक मला भिजलेल्या स्थितीत आणून ठेवतात.)

रघ्या : काय झालं ग आई ?

कुटुंब : झालंय तुमचं डोंबल—

एकजण : वहिनी, आधी त्यांचे कपडे बदला...

दुसरा : गरम कॉफी द्या त्यांना प्यायला...

बंड्या : काय झालं ग बाबाना ?

पहिला : जरा आराम करू द्या त्याना...बावरले आहेत जास्त...चला रे. (इसम जातात)

बंड्या : बाबा भिजले कशानं ग आई ?

कुटुंब : माणूस कशानं भिजतो !

बंड्या : पाण्यानं—

कुटुंब : मग झालं तर—

बंड्या : म्हणजे पाऊस आला होता विहिरीवर ?

रघ्या : गाढवा, पाऊस आहे होय आता ?

बंड्या : मग कसे भिजले ?

कुटुंब : विहिरीत पडले म्हणून भिजले—

रघ्या : कोण ? बाबा ? पण पोहायला तर तू शिकणार होतीस ना ? तू तर मुळीच भिजलेली दिसत नाहीस ?

कुटुंब : मेल्यांनो, तुम्हालां काय करायच्या आहेत मोठ्या माणसांच्या पंचायती ? जरा बसा इथं...उंडारायला जाऊ नका कुठं...मी कॉफी करून आणते. (कुटुंब आत जाते. रघ्या आणि बंड्या दोघेही मला सर्व बाजूंनी फिरून न्याहाळून पहातात.)

बंड्या : रघ्या, बाबांचं हृदय चालतंय का बघ बरं जरा ? बाबा बोलत का रे नाहीत ?

रघ्या : घाबरले आहेत ते...

बंड्या : पण बाबा कसे रे पडले असतील पाण्यात ?

रघ्या : त्यात काय आहे मोठंसं ? विहिरीच्या काठावरून डोकावून पाहताना तोल गेला असेल आणि पडले असतील आत—

बंड्या : पण भोपळा होता ना त्यांच्याजवळ ?

रघ्या : भोपळा आईजवळ होता. (थोडा विचार करून) बंड्या, तूं इथं बाबांच्या-जवळ थांब...मी आता येतो परत...

बंड्या : आई रागवेल हं दादा—

रघ्या : ती कॉफी करून आणायच्या आत परत येतो मी—

बंड्या : लगेच ये हं...

रघ्या : हा आलोच बघ...(रघ्या जातो)

मी : (कण्हत) आई . ग...

बंड्या : आई नाही...मी बंड्या आहे बाबा...

मी : मी...मी...पाण्यातच आहे का रे अजून ?

बंड्या : नाही बाबा...तुम्ही पाण्यात नाही...आता तुमच्या कपड्यात फक्त पाणी आहे.

मी : बाळ बंडू, तुझी आई विहिरीवर राहिली रे चुकून...

बंड्या : नाही बाबा...ती घरात आहे...

मी : आई ग...देवा रे देवा...

बंड्या : काय होतंय बाबा तुम्हाला ?

**मी** : काही नाही...काही नाही...मला पाण्यातनं बाहेर काढा रे...

**बंड्या** : बाबा तुम्हाला केव्हांच पाण्यातनं बाहेर काढलंय...पण बाबा तुम्ही कसे हो विहिरीत पडलात ?

**मी** : बहुतेक आत्महत्या करायचा विचार असावा माझा...

**बंड्या** : मग भोपळा तरी बांधायचा होता तुम्ही ?

**मी** : रामा रे...अरे कोरडे कपडे तरी आणून द्या रे मला कुणीतरी—

(तेवढयात कुटुंब कॉफी घेऊन येते.)

**कुटुंब** : ही कॉफी घ्या म्हणजे बरं वाटेल जरा. बरं तर बरं थोडक्यावरच निभावलं...बंड्या, रघ्या कुठं गेला रे इतक्यात ?

**बंड्या** : रघूदादा ना ?...रघूदादा...रघूदादा...

**कुटुंब** : मेल्या रघुदादा रघुदादा काय करतोस ? गेला ना पळून बाहेर ? कार्ट्याला प्रसंगाचं गांभीर्य सुद्धा कळत नाही.

**मी** : आधी कोरडे कपडे देतंय का कुणी मला ?

**कुटुंब** : आधी कॉफी घ्या म्हणजे हुशारी वाटेल जरा...(रघ्या येतो. त्याला) मेल्या, आईबाप मेले तरीसुद्धा खेळ आटपत नाही ना ? कुठं गेला होतास धडपडायला ?

**रघ्या** : बाहेर गेलो होतो—

**कुटुंब** : तुला इथं थांबायला सांगितलं होतं की नाही ? मग का गेलास बाहेर ?

**रघ्या** : उगीच—

**कुटुंब** : थोबाड फोडलं पाहिजे तुझं...असली कार्टी असण्यापेक्षा बुडवलेली बरी...

**रघ्या** : बुडव ना मग ? बाबांना बुडवायलाच निघाली होतीस ना तू ?

**कुटुंब** : रघ्या, तोंड संभाळून बोल—

**रघ्या** : मला कळलं आहे सारं—

**कुटुंब** : काय रे कळलं आहे मेल्या तुला ?

**रघ्या** : मग बाबा कसे विहिरीत पडले ? सांग ना ? मी सांगू ? बाबांनी तुला भोपळा बांधला आणि तुला ते पाण्यात उतरायला सांगत होते. पण तू घाबरलीस म्हणून बाबांनी तुला हाताला धरून पाण्यापाशी नेलं आणि उतर म्हणून सांगितलं...पण तू बाबांना हिसडा दिलास आणि 'एवढं सांगताय तर दाखवा

की तुम्ही पोहून' असं म्हणून तूंच बाबाना धक्का दिलास आणि बाबा पाण्यात पडले—होय ना? खरं की नाही हो बाबा?

**कुटुंब** : मेल्या, त्यांना नकोस त्रास देऊ आता—पडू देत स्वस्थ जरा—

**रघ्या** : सांग की? खरं आहे ना हे?

**कुटुंब** : रघ्या, आजारी माणसाच्या जवळ बसून फार बडबड करू नये—

**रघ्या** : बाबा अगदी थोडक्यात वाचले ना! मला माहीत आहे सारं...त्या पलिकडच्या अंतोबानी बाबांना काढलं ना पाण्यातून बाहेर?

**मी** : अग मला कुणीतरी कोरडे—

**कुटुंब** : आधी या मेल्याच्या पाठीवर कोरडे ओढले पाहिजेत चांगले—

**रघ्या** : सांग ना आई? खरं आहे की नाही मी सांगितलें ते?

**कुटुंब** : थांब मेल्या, तुझ्या चांगल्या खांडोळ्याच करते.

**मी** : अग आजारी माणसाच्याजवळ खांडोळ्याचा आवाज करू नये—

**कुटुंब** : मेल्याची चामडी लोळवळी पाहिजे...

**मी** : मला कोरडी चामडी तरी द्या रे आणून कुणीतरी लौकर—

**बंड्या** : कोरडी चामडी!

**कुटुंब** : बंड्या मेल्या, जा कोरडे कपडे आण आतनं (बंड्या जातो) (रघ्याला) तुला मेल्या जन्माची आठवण राहिली पाहिजे चांगली—

**मी** : कुणाला? मला? (मी उठून बसतो) जन्माचीच काय, आता साता जन्माची आठवण राहिली आहे मला चांगली...

**कुटुंब** : असं करा...तुम्ही आतच चला. शेगडीपाशी बसा जरा म्हणजे ऊब येईल अंगात...

**मी** : असं म्हणतेस? बरं चला आत...

(एका बाजूला रघ्या आणि एका बाजूला कुटुंब मला धरते आणि मी हळुहळू आत जातो. मी आत गेल्याबरोबर इंदिराबाई आणि त्यांच्या वन्स येतात.)

**इंदिरा** : अय्या, कुणीच दिसत नाही घरात?

**वन्सं** : अहो सगळीजण विहिरीवरच असतील अजून?

**इंदिरा** : विहिरीवर नसतील...बहुतेक हास्पिटलात गेली असतील सगळीजणं.

**वन्सं** : मलासुद्धा तसंच वाटतंय्...मग जाऊ या का परत आपण!

(कुटुंब आतून येते)

**कुटुंब** : कोण ? इंदिराबाई ? आणि वन्सं सुद्धा आल्यात वाट[illegible]ळी शेवटी सकाळीच का येणं केलंत ? म्हणजे

**इंदिरा** : तस नाही...मघाशी कळलं अपघाताचं...म्हटलं कसं अ[illegible] [illegible]द्धा यावं...म्हणून आलो...

**वन्सं** : कसं आहे आता तुमच्या यजमानांचं ?

**कुटुंब** : ठीक आहे... काळजी करण्यासारखं काही[illegible]

**इंदिरा** : ईश्वर करो आणि त्यांना लौकर बरं [illegible] [illegible]स कसे पडले पाण्यात ?

**कुटुंब** : कसे न् काय...पडले एवढं खरं...काळ आला होता पण वेळ आली नव्हती हेच खरं...

**वन्सं** : म्हणजे वहिनी म्हणत होत्या ते खरं नव्हे तर—

**कुटुंब** : काय म्हणत होत्या इंदिराबाई ?

**वन्सं** : म्हणत होत्या–काही नेम नाही तिचा, त्या मेलीनं—म्हणजे तुम्ही ढकलून सुद्धा दिलं असेल आपल्या नवऱ्याला पाण्यात.

**कुटुंब** : मेल्याना लाजा कशा वाटत नाहीत म्हणते मी–वाटेल ते बोलायला ?

**इंदिरा** : हां वन्सं...उगाच खोटंनाटं रचू नका माझ्याबद्दल...

**वन्सं** : मी कशाला खोटंनाटं सांगू ? मघाशी भाजीची पिशवी खुंटीवरून काढता काढता म्हणाला नाहीत तुम्ही असं ?

**इंदिरा** : असं म्हणाले नाही काही मी—

**कुटुंब** : काही सांगू नका...तुमचा स्वभाव चांगला माहीत आहे मला...

**इंदिरा** : तुमचा वन्संच्या बोलण्यावर विश्वास बसतो पटकन...

**वन्सं** : कारण मी खरं तेच बोलते...

**इंदिरा** : काय खरं बोलता हो तुम्ही ? काल ह्यांचं धोतर घाण केलं तुमच्या कमळीनं...हे रागावले तसं चक्क माझं नाव सांगितलंत...ही काय रीत झाली ?

**वन्सं** : मग खोटं काय होतं त्यात ? मी विचारलं हे धोतर कमळीच्या अंगाखाली घालू का...तर तुम्ही म्हणालात घाला म्हणून...

**इंदिरा** : मला धोतर दाखवलंत तरी का त्यावेळी ?

**वन्सं** : धोतर काय माहीत नाही तुम्हांला ? मी म्हणते दुसऱ्याचं धोतर नसेल माहीत एखादवेळी...पण नवऱ्याचं धोतर सुद्धा ओळखता येत नाही तुम्हांला ? मग कशाला केलात संसार इतके दिवस ?

संसाराचा आणि धोतराचा काय संबंध ?

की तुम्ही पोह : अगदी घनिष्ठ संबंध आहे...आमच्या कमळीन नाही का दाखवला ?

पडले—

**कुटुंब** : का हो इंदिराबाई...तुम्हांला तुमची घरं नाहीत भांडायला ? दरवेळी ह्या वन्सना घेऊन येता आणि एकमेकीशी भांडता कैदाशिणीसारख्या—

**इंदिरा** : आम्ही भांडलो तरी तुमच्यासारखा तमाशा नाही करीत गावभर... खरं म्हणाल तर मला भांडायचा कंटाळाच आहे...पण (वन्संकडं हात ओवाळून) हे हे ध्यान आहे ना नणंदेच्या रूपानं गळ्यात पडलेलं—

**वन्सं** : मी ध्यान काय मग तुम्ही अंबाबाईच आहात...काय तो रंग, काय ते रूप, काय ते डोळे, तो वामटपणा—

**इंदिरा** : बस करा वटवट...चांगल्या झिंज्या ओढून थोबाडीत देईन तेव्हा कळेल...

**वन्सं** : हात तर लावा माझ्या अंगाला मग दाखवते माझा इंगा...

**इंदिरा** : मग भिते की काय तुम्हांला

(दोघी पदर खोचून व बांगड्या सारून फिसकारणाऱ्या मांजरीसारख्या एकमेकासमोर उभ्या राहातात. कुटुंब दोघींनाही ढकलते)

**कुटुंब** : मेल्यांनो...तुम्ही खुशाल उपटाल झिंज्या एकमेकींच्या...पण माझ्या घरांत केरं नको तुमच्या केसांचा...आपल्या घरी जा आणि खुशाल एकमेकींच्या उरावर बसा—जा—(दोघीनाही जवळ जवळ ढकलते. दोघी एकमेकीकडे मारक्या म्हशीप्रमाणें पाहात निघून जातात)...राक्षसिणी आहेत मेल्या—

(कमरेवर हात ठेवून त्यांच्याकडे नाक उडवीत बघत राहते आणि अंधार होतो.)

(मी माईकपुढे उभा आहे)

**मी** : मंडळी कुटुंबानं विहिरीत माझं अर्घ्य दिल्यापासून पोहण्याचा प्रश्न माझ्याप्रमाणंच भिजत पडला आहे. मी पाण्यात पडलो तेव्हा मी पडलो आहे असं वाटलंच नाही...मला वाटलं जलप्रलय झाला आहे आणि आपण त्यात सापडलो आहोत. पण मंडळी खरं सांगू का ? अहो मी पाण्यात पडून एखाद्या बुडणाऱ्या गलबतासारखा शांतपणे बुडत चाललो होतो पण मला वर का काढलं या मंडळींनी ते काही कळत नाही. या मंडळींची इच्छा असो नसो पण परमेश्वराची इच्छा मात्र मी जगावं अशीच होती. कारण याचि देही याचि डोळा अजून काही खेळ मला बघायचे होते...

शेजारी पाजारी अजून रोज नियमानं विचारतात मला 'काय जमतय की

नाही पोहायला?'...इतकं माणसाला पाण्यात पाहू नये सारखं. मंडळी शेवटी वैतागलो आणि दहा दिवसांची रजा घेऊन गेलो परगावी. पण परगाव म्हणजे परलोक थोडाच आहे! पुन्हा यावंच लागलं परत. परत आलो तो घरात नवा अध्याय सुरू झाला होता.

(मी जातो. मागचा पडदा वर जातो. आमचे विन्हाड–बाळक्या आरशापुढे उभा राहून केसांचा कोंबडा कुरवाळीत आहे. हीरो स्टाइलने लचकून मुरडून स्वत:कडेच पाहतो. तेवढ्यात पानवाला आल्याचे दिसताच पटकन पलंगाखाली जाऊन लपतो. पानवाल्यानं त्याला येता येताच पाहिलं आहे. तो येतो तो थेट पंलगापाशीच जातो.)

**पानवाला :** ए—सुव्वर के बच्चे, उधारी कोन देगा? तेरा बाप?...चल बाहर आजाव...(त्याच्या आवाजातील हुकमत जाणवताच बाळक्या मुकाट्यानं पलंगाखालून बाहेर येतो.)

**बाळक्या :** देखो भैय्याजी! मेरी बहेन बहोत बीमार है—उसका कुछ भी भरोसा नही हैं...मै परेशानी मे हूँ...आपका पैसा कल लाके दूंगा...तुम्ही जा आता–

**पानवाला :** जा नाही आता...नही जायेगा हम...पहले पैसा लाव.

**बाळक्या :** अरे माझी बहीण आजारी आहे आणि तू पैसे मागतोस? काही माणुसकी आहे की नाही तुला?

**पानवाला :** अबे...इन्सानियतवाले—पैसे की बात बोलो...खालीपिली बकवाज क्यू करते हो तुम?

**बाळक्या :** मी सांगितलं ना तुला माझ्या छोरीचे पैसे...

**पानवाला :** तेरी छोरी की ऐशी तैसी—

**बाळक्या :** अरे हळू ओरड–माझी बहीण आजारी आहे म्हणून सांगितलं ना तुला?

**पानवाला :** अबे जा–मै ठहर नही सकता...हमको पैसा होना. बाकी कुछ जानता नही हम...

**बाळक्या :** जरा ठहर जाइये...(इकडे तिकडे पाहतो आणि पटकन आत जाऊन देव्हाऱ्यातील देवापुढची चांदीची घंटी घेऊन येतो) भैय्याजी, मै कल पैसा ला के दूँगा तबतक यह घंटी रख देना तुम्हारे पास–चांदीकी घंटी है...अभी जादा बात मत करो—

**पानवाला :** क्या मैं घंटी बजाते बैठा रहू ठेलेपर ?

**बाळक्या :** चूपचाप ले जाइए...बस्स...(पानवाला घंटी वाजवतो. वाळक्या एकदम ती वंद करतो) बजाइए नही लेजाइए...

**पानवाला :** मगर—

**बाळक्या :** मगर मत करना–पहले जाइए यहाँसे–जाइए (त्याला जवळ जवळ ढकलून वाहेर घालवतो. पानवाला जातो.)

(वाळक्या 'सुटलो एकदाचा' या भावनेने हुश्श करून वसतो. तेवढ्यात कुटुंब बाजारातून भाजीची पिशवी घेऊन येते.)

**कुटुंब :** बाळक्या, रघ्या बंड्या आहेत घरात ?

**वाळक्या :** नाहीत. कां ?

**कुटुंब :** मी खाली बोलत होते रानडीणबाईशी तेव्हा आपल्या देवाची घंटी वाजल्यासारखं वाटलं (वाळक्या दचकतो)—

**वाळक्या :** हां हां ती घंटी ना ! मी सुद्धा ऐकली–पण ती आपल्या देवाची नव्हती...देवांच्या देवांची होती. म्हणजे ते पलिकडे देव आहेत ना त्यांच्या देवांची घंटी थेट आपल्यासारखीच आहे ...

**कुटुंब :** नाही मला वाटलं रघ्याबंड्यापैकी कुणी धडपडलं का काय देवापाशी ?

**वाळक्या :** (विषय वदलण्यासाठी) वाकी काहीही म्हण दिदी...पण तू आत्ता ज्या चपळाईनं चालत आलीस ना त्यावरून तुला आता नक्कीच हलकं हलकं वाटत असणार—

**कुटुंब :** कशामुळं ?

**वाळक्या :** अग गेले आठ दिवस तू दोरीवरल्या उड्या मारतेस ना त्यामुळं तुझं वजन कमी झालं आहे...खरं सांगू का...जिथं तिथं तुझं वजन आड येत होतं...एकदा वजन कमी झालं की पोहणं म्हणजे हातचा मळ आहे नुसता—

**कुटुंब :** पण मेल्या नुसत्या उड्यानी होइल का कमी वजन ?

**बाळक्या :** त्याशिवाय डॉक्टर शेलारयांना भेटायचंच आहे आपल्याला. मी त्यांना सांगूनसुद्धा आलोय...ते म्हणालेसुद्धा वजन कमी करायला दोरीवरल्या उड्या वेस्ट.

**कुटुंब :** इतकं करून नाही कमी झालं तर ?

**वाळक्या :** नही होगा तो मूछ उतार दूंगा...अग ती मिस झेबुन्निसा नटी... कशी होती पूर्वी ? हत्ती बुजला होता एकदा तिला...पण एक महिनाभर

नुसत्या दोरीवरल्या उड्या मारल्या तिनं
बनगयी...अग मी टुणटुणलाही सांगत होतो हे
**कुटुंब** : इतकं सांगतोसच आहेस तर बघते —
झालीच आहे माझी उडया मारण्याची...रघ्या, बंडय़ा
प्रमाणं...(खिडकीत जाऊन) रघ्या...बंड्या...मेल्यांनी
कुणास ठाऊक? (रघ्या व बंड्या येतात) माझी दोरी कुठाय?

`घरात आम्ही काय वाटेल ते करू—
होतो. अनेकदा माझ्या पानात
पडली असेल नाहीतर
रुमालकांना सांगा—घर
माझी बायको

**रघ्या** : कसली दोरी?

**कुटुंब** : फासाची दोरी...माझी उडया मारायची दोरी...

**रघ्या** : ती होय...ती आतच आहे डब्यामागं...

**कुटुंब** : जा घेऊन ये जा आधी—

**बंड्या** : मी आणतो (बंड्या जाऊन दोरी घेऊन येतो).

**रघ्या** : आता दोरीवरल्या उड्या म्हणजे अभ्यास बोंबलला आमचा... बाळक्यामामा तूच दोरी धरून उभा रहा आज. मला जमायचं नाही...

**कुटुंब** : रघ्या, फाजीलपणा करू नकोस—

**रघ्या** : दोरी धरून दमायला होतं आम्हांला—

**कुटुंब** : मेल्या, उड्या तर मीच मारते—अन् तुला दमायला होतं काय? नुसती दोरी धरायची—तिरडी तर धरायला नाही ना सांगत?

**रघ्या** : तिरडी परवडली—ती फक्त स्मशानापर्यंतच न्यावी लागते म्हणे... पण हे हे दोरीचं तसं नाही...

**कुटुंब** : रघ्या जीभ आवर मुकाट्यानं...तुझं तोंड आहे का गटार? देवानं एवढं चांगलं तोंड दिलं आहे...चांगलं बोल जरा—

**रघ्या** : बाबासुद्धा असंच म्हणतात ना रोज तुला?

**कुटुंब** : याच दोरीचा फास घालीन जास्त बोलशील तर—धर दोरी मुकाट्यानं—

(रघ्या पाय आपटीत दोरीचे एक टोक धरतो. बंड्या दुसरे धरतो. दोघे दोन्ही बाजूला उभे राहतात. रघ्यानं अन् बंड्यानं दोरी फिरवायची आणि कुटुंबानं त्यावरून टुणकन् उडी मारायची असा प्रकार सुरू होतो. बाळक्या उड्या मोजतो. अशा एकदोन उड्या होतात आणि मी बाहेरगावाहून हातात होल्डाल व बॅग घेऊन येतो, हा उड्यांचा प्रकार पाहून थक्क होतो. जागच्या जागी खिळल्यासारखा उभा राहतो. बॅग व होल्डाल माझ्या हातातून गळून पडतो.)

**बंड्या** : आई, बाबा आले—

देत—मला काय खाणार आहेत की काय ?

चाललंय तुमचं ?

. मातेच्या मात्र दोरीवरील उड्या चालू आहेत बाबा.

ाता कशासाठी ? आता काय वायुतरण विद्या वगैरे

ठ दिवस ह्या उड्या चालल्या आहेत बाबा...

ाठ दिवस ? आठ दिवस सारख्या उड्या ? (कुढंवास) अग, हे आठ दिवस सारख्या उड्या मारीत राहिली आहेस—किती त्रास सल वरं ?

: मुळीच त्रास होत नाही मला—

: तुला नाही म्हणत मी...खालच्या मजल्यावरच्या लोकांना...

**कुटुंब :** (माझ्यापुढे हातवारे करीत) तुम्हांला माझ्या त्रासाची कशी काळजी असेल ? शेजाऱ्यांचीच असणार...मी मेले तर मला उचलायला दुसऱ्यांना किती कष्ट पडतील याचीच चिंता करीत बसणार तुम्ही...

**मी :** अग...तुला माहीतच आहे. आपण साधं खलबत्त्यांत जरी काही कुटलं तरी खालच्या बिऱ्हाडात माती पडते...म्हणून म्हटलं दुसऱ्याचा थोडा तरी विचार करावा...

**कुटुंब :** हे तुम्ही सांगता मला ? मी माझ्या घरात उड्या मारते आहे. मी उड्या मारीन, लांब उड्या मारीन नाहीतर हनुमान उड्या मारीन. आणि मी म्हणते खालच्या बिऱ्हाडाच्या आधी तुमचाच आरडाओरडा का ? त्यांनी आजपर्यंत एक ब्रसुद्धा काढला नाही तोंडातून...

(त्याचक्षणी खालच्या बिऱ्हाडातले वाळवणे तावातावानं वर येतात.)

**वाळवणे :** आम्हांला अक्कल आहे म्हणून ब्र काढला नाही. अहो पंत... आम्हांला खाली राहू द्यायचंय की नाही ?

**मी :** अहो काय झालं वाळवणे ?

**वाळवणे :** काय झालं म्हणून विचारता आणखी ? गेले आठ दिवस तुमची मंडळी इथं काय धांगडधिंगा घालतात कुणास ठाऊक ? रोज आमच्या घरात माती पडते...तुम्ही इथं नव्हता म्हणून गप्प बसलो. म्हटलं उगीच बायका— माणसाच्या तोंडी कशाला लागा ? पण हे वाढतच चाललं...

**मी :** (कुढंवास) ऐकलंस का हे वाळवणे काय म्हणाले ते ?

**कुटुंब** : ऐकलं. त्यांना म्हणावं आमच्या घरात आम्ही काय वाटेल ते करू–
**वाळवणे** : (मला) पण त्याचा आम्हांला त्रास होतो. अनेकदा माझ्या पानात माती पडली.
**कुटुंब** : (मलाच) त्यांना म्हणावं...तुमच्या पानात पडली असेल नाहीतर कानांत पडली असेल. त्याचं आम्हांला काय सांगता ? घरमालकांना सांगा–घर त्यांचं आहे आणि मातीही त्यांचीच आहे—
**वाळवणे** : (मला) पंत, रोज आपटता तरी काय एवढं ? माझी बायको म्हणाली की हत्ती ड्रील करीत असावा तुमच्याकडे.
**मी** : काय ?
**वाळवणे** : हत्ती ड्रील करीत असावा—
**मी** : अहो वाळवणे...काहीतरी काय बोलताय तुम्ही !
**वाळवणे** : अगदी हेच मी म्हणालो. अहो हत्ती वर जाईलच कसा ? त्याला जिन्यावरनं चढता का येणार आहे ? मग ती म्हणाली की हत्ती ड्रील करीत असावा असा भास होतो—
**मी** : हां, भास. मग हरकत नाही...
**कुटुंब** : (मला) त्यांना म्हणावं बायकोचं डोकं बिघडलं म्हणजे हत्तीचा भास होतो—
**वाळवणे** : (मला) त्याना म्हणावं हत्तीचं डोकं–नव्हे हत्तींची बायको नव्हे बायकोचा हत्ती—नाही नाही बायकोचं डोकं ठिकाणावर आहे
**मी** : अहो वाळवणे.
**वाळवणे** : अहो मी सरळपणे सांगतो आहे तर त्याच वाकडं बोलताहेत... रोज सकाळी आंघोळ करून यावं तो मातीचा अभिषेक सुरू...हे असंच चाललं तर एखादे दिवशी आम्ही मातीतच गाडले जाऊं...
**कुटुंब** : त्यांना म्हणावं, एक ना एक दिवस सगळयांनाच मातीतच जायचं आहे...तुम्हांला फार तर थोडं आधी जावं लागेल इतकंच.
**मी** : अग पण तू जरा गप्प बस ना—
**वाळवणे** : पंत, तुम्ही करता तरी काय रोज असं ?
**रघ्या** : आमची आई रोज दोरीवरल्या उड्या मारते—
**वाळवणे** : (धक्का बसल्यासारखे आश्चर्यचकित होऊन व आ वासून) क–क–क–काय ?
**रघ्या** : दोरीवरल्या उड्या.

**वाळवणे :** दोरीवरल्या उड्या!...दोरीवरल्या उडया म्हणजे मी नाही समजलो?

**कुटुंब :** रघ्या, त्यांना म्हणावं तुम्हांला समजलं नसेल तर बायकोला जाऊन विचारा दोरीवरल्या उडया म्हणजे काय ते?

**वाळवणे :** राघोबा, तुमच्या मातोश्रींना म्हणावं दोरीवरल्या उड्या म्हणजे काय ते मला माहीत आहे...पण तुमच्या मातोश्रींनी दोरीवरल्या उडया का माराव्यात हे नाही समजलं म्हणावं मला—

**रघ्या :** अहो, आम्हांला तरी कुठं समजलं आहे?

**वाळवणे :** आमच्याकडे लहान मुली अशा उड्या मारतात...

**कुटुंब :** आमच्याकडं लहान मुली नाहीत म्हणून मी मारते. समजलं? आणि त्यांना म्हणावं आमच्या घरात काय करायचं ते आम्ही ठरवू.

**वाळवणे :** काय करायचं ते करा...पण माती आमच्या घरात पडते एवढं लक्षात ठेवा.

**कुटुंब :** तुमच्या घरात माती पाडण्यासाठी आम्ही उड्या मारीत नाही.

**रघ्या :** आम्ही? म्हणजे तू...

**वाळवणे :** पंत मी तुम्हांला बजावतोय...तुम्ही तुमच्या कुटुंबाला बजावून ठेवा—

**मी :** मी सांगेन...जरूर सांगेन...

**वाळवणे :** जातो मी, पण पुन्हा बोलण्याची माझ्यावर वेळ आणू नका. पंत, आम्ही सांगू नये पण तुमच्या कल्याणासाठी सांगतो की ह्या वयात दोरीवरल्या उडया बऱ्या नव्हेत...(वाळवणे जातात.)

**कुटुंब :** दुसऱ्याच्या घरात येऊन उपदेश करण्याचा चोंबडेपणा करू नकोस म्हणावं त्या वाळवण्याला—(वेडावून) म्हणे या वयात दोरीवरल्या उड्या बऱ्या नव्हेत...ह्याच्या बापाचं काय गेलं मी उड्या मारल्या म्हणून?

**मी :** त्यांच्या घरात माती पडते...

**कुटुंब :** पण ती माझ्या वयामुळं का पडते?

**मी :** वयामुळं नाही. वजनामुळं—पण म्हणतो आपण तरी उगाच उड्या का माराव्या?

**कुटुंब :** मी काय उगाच उड्या मारते? उड्या मारल्या नाहीत तर वजन कोण माझा काका कमी करील?

मी : वजन ? वजनाचा काय संबंध ?

कुटुंब : मग मी काय वेड लागलंय् म्हणून उड्या मारतेय, का माकडानं झपाटलंय् म्हणून उड्या मारतेय ? माझं वजन वाढलंय आणि ते वेळेवर कमी केलं पाहिजे—म्हणजे पोहणं वगैरे जमेल...

मी : आणि नाही कमी झालं तर ?

कुटुंब : तर ब्लडप्रेशर वाढेल, अर्धांगवायू होईल...

मी : आणि !

कुटुंब : आणि काय ? तुम्ही विधुर व्हाल एखादे दिवशी पट्कन...

मी : पण त्यासाठी नुसत्या उड्या मारून काय होणार आहे ? तोंडावर ताबा पाहिजे.

कुटुंब : तुम्हीच निघालात पहिले—बोलण्यानं वजन वाढतं म्हणून सांगणारे ...म्हणे तोंडावर ताबा पाहिजे...

मी : तोंडावर म्हणजे बोलण्यावर नव्हे...खाण्यावर...

कुटुंब : माझा ताबा आहे हो खाण्यावर—आणि पुन्हा आज जाणार आहे मी डॉक्टर शेलाट्यांकडे...बाळक्यानं सांगितलं आहे मला...त्या झेबुन्निसासारखं एका महिन्याच्या आत वजन कमी करून दाखवीन तेव्हा कळेल तुम्हाला...

मी : ही झेबुन्निसा कोण ?

कुटुंब : आहे माझी सासू...

मी : असू दे...असू दे...माझ्या आईचं नवं नाव समजल मला या निमित्तानं—म्हणजे एकूण बाळक्यानं ही दोरी घातलीय तुझ्या डोक्यात... सगळा आनंद आहे...(पडदा पडतो) (बाहेरच्या माइकपाशी येऊन मी उभा राहतो.)

मी : मंडळी, गेला महिनाभर आमचं कुटुंबच नव्हे तर सबंध बिऱ्हाड उड्या मारतं आहे. दस्तुर खुद्द कुटुंब दोरीवरून, रघ्या, बंड्या दोरी धरून आणि मी कपाळावर हात मारून उड्या मारतो आहोत ! अहो, जिथं नशिबानं उलट्या सुलट्या उड्या मारायचं ठरवलं आहे तिथं मी काय करणार ? आणि ज्याला कुटुंबाच्या उड्या सुद्धा थांबवता येत नाहीत तो नशिबाच्या उड्या काय थांबवणार ? ते खालच्या बिऱ्हाडातले बाळवणे कुत्र्यासारखे पिसाळले आहेत— दिवसातून दोनचार वेळा तरी भुंकून जातात. रस्त्यात भेटले की गुरगुरतात. आमच्या कुटुंबानं त्यांच्या संसारात माती कालवली असा गावभर प्रचार करीत फिरतात. आमच्या घराचे मालक तर सारखा शंख करताहेत. "तुम्हाला कोर्टात

उड्या मारायला लावतो म्हणजे कळेल" अशासारख्या धमक्या देताहेत. हा दम, ह्या धमक्या, हे सगळं फक्त मला—कारण कुटुंबापुढं जाण्याची प्राज्ञा नाही कुणाची! मी तरी काय करणार! मी आपला परदेशातील वकिलाच्या वृत्तीनं या सर्वांचे निषेध खलिते आणि निरोप कुटुंबाकडं दाखल करतो आणि गप्प बसतो. मी गप्प बसतो याचं कारण मलाही आतल्याआत कुठंतरी आशा वाटते आहे की ह्या उड्यामुळं कुटुंबाचं वजन होईल कमी एखादवेळी. अहो आटोपशीर आणि आवाक्यात असलेलं कुटुंब कुणाला नको असतं? आटोपशीर कुटुंब हे तर आजचं आपलं राष्ट्रीय ब्रीदवाक्य आहे!

पण मंडळी, हे प्रकरण फक्त उड्यावर थांबलेलं नाही. डॉ. शेलाटे तिचे वजन सल्लागार झाल्यापासून आमच्या घराचा उपासमार आश्रम झालेला आहे. घरात आजपर्यंत फक्त आमची डाळच शिजत नव्हती—आता भातही शिजत नाही. कारण भातानं वजन वाढतं म्हणे! अहो भातानं जर वजन वाढलं असतं तर राजकारणात कोकणचं वजन कशाला घटलं असतं? भाताप्रमाणंच बटाटा बंद, साबूदाणा खायचा नाही, तूप गेलं तेल लावीत, दूध कमी, लोणी आणायचं नाही, साखर वर्ज्य...वास्तविक मी आणि पोरं यांचा वजनाशी तोळाभरही संबंध नाही. पण आम्ही या वस्तू खाल्ल्या तर तिलाही खाण्याचा मोह होतो म्हणे! म्हणून कुणीच खायच्या नाहीत. कुटुंबातला कर्ता पुरुष म्हणून कुटुंबासाठी मला त्याग केलाच पाहिजे. पण पोरांच्या तोंडाकडे बघवत नाही हो! कसल्या तरी पालेभाज्या घरात येतात आणि त्या उकडून खातो आहोत आम्ही! माझी खात्री आहे की आमच्या गावात अशी एकही वनस्पती उरली नसेल की जी आम्ही भाजी म्हणून गेल्या महिन्याभरात खाल्ली नसेल.

ही उपासमार सहन होईना म्हणून वजन कमी करण्याचे इतर अनेक उपाय मी तिला सुचवले. उरळी कांचनच्या निसर्गोपचार केंद्रात जाऊन राहण्याचाही सल्ला दिला. पण कांहीही उपयोग झाला नाही. स्वतःचं वजन आणि आमचं आयुष्य कमी करण्याचा धूमधडाका आमच्या घरात चालूच आहे...

(मी जातो. मागचा पडदा उघडतो. आमचे बिऱ्हाड. कुटुंब पलंगावर प्रेक्षकाकडे पाठ करून बसले आहे, आणि घाईघाईनें काहीतरी खात आहे, इकडे तिकडे पाहते आणि पुन्हा खाऊ लागतें, एवढ्यांत रघ्या आणि बंड्या चोरपावलानी येतात आवाज न करता. आई काय खातें ते हळूच बघतात. दोघेंही कुटुंबाच्या दोन्ही बाजूस उभे राहतात, कुटुंब खाण्यातच गर्क आहे.)

वंड्या : (एकदम) आई......(कुटुंब दचकतें आणि मागे पाहतें, ठसका लागतो. जवळच्या भांड्यातील पाणी गटागटा पिते.)
कुटुंब : मेल्या केवढ्यांदा ओरडलास दैत्यासारखा?
बंड्या : मी ओरडलो कुठं? तुला हाक मारली फक्त...
कुटुंब : मेल्यांनो तुम्ही मित्राच्या ना घरी गेला होता?
रघ्या : हो गेलो होतो. पण मित्र भेटलाच नाही. म्हणून परत आलो...
कुटुंब : मग मेल्यांनो यायच्या आधी दार वाजवता येत नाही तुम्हांला?
रघ्या : उघडं दार वाजवतात वाटतं कुणी? आई, तू काय ग खात होतीस भिंतीकडे तोंड करून?
कुटुंब : खात होते शेण...काय करायचंय तुम्हांला?
रघ्या : मग थांबलीस का खाताना?
कुटुंब : थांबले ठसका लागला म्हणून...
रघ्या : म्हणजे शेणाचा सुद्धा ठसका लागतो? आम्हांला नाहीत नाही म्हणून विचारतो—
बंड्या : अरे दादा वडे होते कसले तरी—होय की नाही ग आई?
रघ्या : अरे शेणाचे असतील...
कुटुंब : मेल्या शेणाचे वडे असतात होय कधी?
रघ्या : मग शेणात बटाटे घालून केले असतील वडे...
कुटुंब : रघ्या; जीभ आवर म्हणते मी—
रघ्या : मग सरळ सरळ सांग की बटाटेवडे खात होतीस म्हणून...
कुटुंब : खाल्ले मी बटाटेवडे तर तुझ्या काकाचं काय गेलं त्यात?
रघ्या : खुश्शाल खा...पण आम्हांलाही दे म्हणजे झालं—
कुटुंब : मेल्यांनो, चुकून कुठे अर्धा एक बटाटेवडा खाल्ला तर लगेच शंख करायला लागलात?
बंड्या : आणि परवा भजी खात होतीस ती?
रघ्या : हो अन् गेल्या रविवारी जिलेबी सुद्धा खाल्लीस...
कुटुंब : मेल्यांनो, तुम्हाला काय माझ्यावर पाळत ठेवायला नेमलंय सरकारानं?
रघ्या : मग आम्हांला बटाटेवडा दे, लगेच आमची तोंडं बंद होतील...
कुटुंब : देत नाही...
रघ्या : दिलाच पाहिजे...

**कुटुंब** : नाही म्हणजे नाही...

**रघ्या** : (जोराने ओरडून) ऐका हो मंडळी आईनं भजी खाल्ली...

**बंड्या** : बटाटेवडे खाल्ले...आईनं जिलेबी खाल्ली...बटाटेवडे खाल्ले...

**कुटुंब** : मेल्यांनो, घराला आग लागल्यागत काय ओरडताय? थांब रघ्या, तूच कार्ट्या नीच आहे...

(असं म्हणून रघ्याला मारायला धावते. रघ्या हुलकावणी देतो. कुटुंब रघ्याच्या मागे धावते. रघ्या पटापट पलंगावर, टेबलावर, खुर्चीवर चढून उड्या मारतो. कुटुंब कोपऱ्यातली काठी घेऊन रघ्याच्या अंगावर चाल करून जाते. रघ्या उशीची ढाल बनवून काठीचा वार झेलतो. तेवढ्यात मी येतो.)

**मी** : अरे...अरे...काय चाललंय् हे?

**बंड्या** : दादाचं आणि आईचं दुसरं महायुद्ध बाबा, पहिलं मागंच झालं...

**मी** : (कुटुंबास) अग काय हे? तुला तरी कळावं थोडं?

**कुटुंब** : (वसकन् माझ्यावर) कुणाला? मला? लाज नाही वाटत असं बोलायला? (काठी उगारलेलीच)

**मी** : मलाही मारायचा विचार असेल तर तसं सांग—म्हणजे मी देवाचं नाव घेऊन मरणाला तयार होतो—

**कुटुंब** : तुम्हांला मारायला का वेड लागलंय मला?

**मी** : मग रघ्याला तरी कशासाठी मारतेस?

**कुटुंब** : विचारा त्यालाच मुर्दाडाला—

**मी** : काय रे रघू?

**रघ्या** : मी काहीही केलं नाही बाबा...आईच माझ्यावर वार करायला लागली.

**कुटुंब** : मेल्या, तलवारीनं का वार केला तुझ्यावर?

**रघ्या** : काठीनं केला काय अन् तरवारीनं केला काय—वार तो वारच!

**मी** : अरे पण का?

**बंड्या** : मी सांगू का बाबा? आई की नाही भिंतीकडे तोंड करून हळूच बटाटेवडे खात होती...

**मी** : म्हणून आईनं मारलं रघूला!

**बंड्या** : तसं नाही हो...काय खातेस म्हणून आम्ही विचारलं तर म्हणाली शेण खाते...

**मी** : काय?

बंड्या : शेण...शेण माहीत नाही तुम्हाला? ते ते रस्त्यावरचं हो—म्हशी पुढं जातात आणि त्यांच्या मागं पडतं ते—

मी : ते माहीत आहे रे...पण आई असं भलतं म्हणेलच कसं?

बंड्या : खरंच म्हणाली...विचारा हवं तर दादाला—

रघ्या : तसं तोंडानं म्हणाली ती...पण प्रत्यक्षात खात होती बटाटेवडा...

मी : अरे पण बटाटेवडा तरी ती कशी खाईल? आपल्या घरात बटाटा, साखर, भात, हे सगळं बंद आहे...

रघ्या : बंद आहे ते आपल्याला...तिला नाही काही...

मी : अरे वजन कमी करण्यासाठीं जवळ जवळ उपासच करते आहे ती...

रघ्या : खरं सांगू बाबा? आपल्या आईचं की नाही मुंबईच्या टॅक्सी-वाल्यासारखं आहे.

मी : म्हणजे?

रघ्या : मुंबईचे टॅक्सीवाले कसा आग्रह धरतात आपली टॅक्सीही चालली पाहिजे आणि दादागिरीही चालली पाहिजे म्हणून—तसंच आहे आईचं आपल्या......तिचा उपासही चालला पाहिजे आणि खाणंही चाललं पाहिजे.

कुटुंब : बघा बघा कसा मेला बृहस्पतीसारखा बोलतो आहे तो—आणि मी म्हणते एखादे दिवशीं खाल्ले बटाटेवडे म्हणून काय बिघडणार आहे असं?

मी : अग पण तुझ्या वजनाचं काय होईल?

कुटुंब : माझं वजन झालंय आता कमी—

मी : कशावरून?

कुटुंब : आता कमी झालेलं वजनसुद्धा न कळण्याइतकी का मूर्ख आहे मी?

मी : अग स्वतःचं स्वतःला असं कळत नाही.

कुटुंब : मला कळतं. कसं हलकं हलकं वाटतय मला—

मी : असं वाटतं फक्त...कळत नाही तसं...

कुटुंब : मग बघा उचलून मला—म्हणजे कळेल तुम्हाला तरी—

मी : (घाबरून) काय उचलून? बाप रे? नको...नको...तेवढं सांगू नकोस...

कुटुंब : का? आता का घाबरलात?

मी : घाबरलो नाही—पण आयुष्यात कधीच वेट लिफ्टिंगच्या भानगडीत पडलो नाही मी—

कुटुंब : तुमची खात्री म्हणून पटायची नाही कधी...माझंच मेलं नशीब खोटं...

मी : काहीही झालं नाही तुझ्या नशिबाला...

कुटुंब : मग तुमचा विश्वास कुठाय माझ्यावर ?

मी : अग यात विश्वासाचा प्रश्न कुठं आला ?

कुटुंब : मग मी म्हणते वजन कमी झालं तर का शंका घेता तुम्ही ?

मी : मी नाही शंका घेतली—

कुटुंब : तसं कशाला पाहिजे ? माझ्या देखत खात्री पटली पाहिजे तुमची—

मी : खात्री पटली माझी—मग तर झालं ?

कुटुंब : तसं नको—रघ्या शेजारहून वजनाचा काटा घेऊन ये—

मी : काटा कशाला ?

कुटुंब : मी पाहिजे म्हणून सांगते ना ? जा रघ्या...

रघ्या : बाबा ?

मी : जा...आण जा...

रघ्या : चल रे बंड्या...(दोघेही जातात)

कुटुंब : कधी म्हणून तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवीत नाही. माझं वजन वाढलेलं तुम्हांला खपत नाही आणि कमी झालं तर त्यावर विश्वास बसत नाही. कसं जगावं माणसानं म्हणते मी ?

मी : असं कसं म्हणतेस ?

कुटुंब : नाहीतर काय ? कशाचं कधी कौतुक केलंत ? तुम्ही झापड बांधलेल्या बैलासारखे नुसती कचेरी आणि घर अशा फेऱ्या तेवढ्या मारता...(रघ्या आणि बंड्या धावत येतात.)

मी : का रे रघू ? काटा नाही आणलास ?

रघ्या : तो कोळसेवाला म्हणतो माझ्या वजनाचा काटा रिकामा नाही— गिऱ्हाईकांची गर्दी आहे...

कुटुंब : मेल्या, कोळशाचा का काटा आणायला सांगितला तुला ? माझी काय रौप्यतुला करायचीय् का सुवर्णतुला ?

मी : अरे...माणसाचं वजन करायचा काटा आणायचा...

रघ्या : तो कुठं आहे कोळसेवाल्याकडं ?

कुटुंब : मेल्या मुद्दाम अडाणीपणा करतोस होय ? जा, त्या शांडिल्यांकडचा काटा घेऊन ये.

रघ्या : तो होय...आत्ता आणतो...(पुन्हा रघ्या बंड्या जातात)

कुटुंब : हे तुमच्या पोराचं डोकं?

मी : पण तुझी नाहीत का ही पोरं?

कुटुंब : माझी आहेत...पण डोकं तुमचं घेतलंय ना त्यांनी?

मी : चालायचंच...डोकं बापाचं...तोंड आईचं...अशी विभागणी व्हायचीच

कुटुंब : बोला...बोला...करा निंदा माझी...दुसरा धंदाच नाही तुम्हाला...

(रघ्या आणि बंड्या वजनाचं यंत्र आणतात. त्यांच्या मागोमाग शांडिल्यही येतात.)

शांडिल्य : मीही आलो. कारण एकः—ही व्यायाम शाळेची मालमत्ता आहे. कारण दोनः—तिच्यावर देखरेख ठेवणं हे माझं कर्तव्य आहे. तीनः— या मालमत्तेचा योग्य त्या कारणासाठीच उपयोग केला जावा असा आमचा कटाक्ष असतो. चारः—हे यंत्र मुलें नीट नेतील की नाही याची खात्री नव्हती...

मी : तसं विशेष काही नाही...आम्हांला जरा वजन करायचं आहे—

शांडिल्य : एकः—या काट्यावर फक्त माणसाचं वजन करायचं असतं. दोनः—भाजी वा अन्य वस्तूंचे वजन यावर करीत नाहीत. तीनः—या यंत्राची किंमत भारी आहे.

मी : एकः—आम्हाला भाजीचं वजन करायचं नाही. दोनः—माणसाचंच करायचं आहे. तीनः—आम्ही सर्वजण माणसेच आहोत.

शांडिल्य : मग हरकत नाही. एकः—बाळ रघू ये बेटा...उभा राहा पाहू यावर? (रघ्या चटकन उभा राहातो) पंचाहत्तर पौंड...हं उतर...

(रघ्या उतरतो) बाळ बंडू तू ये आता...रहा उभा (बंड्या उभा राहातो) सत्तावन पौंड...हं उतर (बंड्या उतरतो) या पंत तुम्हीही या...

रघ्या : म्हणजे बाबा...माझं सात पौंड कमी झालं आहे.

बंड्या : आणि माझंही पाच पौंड कमी झालं आहे...

शांडिल्य : या पंत. उभे रहा...(मी यंत्रावर उभा राहातो) एकशे पस्तीस पौंड.

मी : (उतरता उतरता) काय? एकशें पस्तीस? म्हणजे माझं बारा पौंड कमी झालं? आश्चर्य आहे...का हो? काटा बरोबर आहे ना?

शांडिल्य : काटा? एकः—तो नवा आहे. दोनः—तो नीट परीक्षा करून घेतलेला आहे. तीनः—त्यांत चूक होणं शक्य नाही. काम झालं ना काट्याचं? घेऊन जाऊ मी?

कुटुंब : मेल्यांनो, माझं वजन करायला म्हणून काटा आणला आणि तुम्हीच सगळीजणं घुसलात पुढं...व्हा बाजूला...

**शांडिल्य** : काय ? तुमचं वजन ? माझा हा काटा नवीन आहे हो...
**कुटुंब** : मग माझं वजनही नव्यानंच कमी झालं आहे. कळलं ?

(कुटुंब काट्याकडे चाल करून जाते.)

**शांडिल्य** : अहो पंत...पंत...माझा काटा...(वजनाच्या यंत्राला घट्ट मिठी मारून बसतात.)

**कुटुंब** : काही होत नाही तुमच्या यंत्राला...व्हा बाजूला आधी...

**शांडिल्य** : पंत...कुटुंबाला आवरा...काट्याला सावरा...

**कुटुंब** : उगाच ओरडू नका. मी सांगते. एक :—यंत्र सोडा. दोनः—बाजूला व्हा. तीन—जवळ आलात तर याद राखा—

**मी** : शांडिल्य. इथं इलाज नाही...आमचा सुद्धा काटा ढिला झाला आहे; मग तुमच्या काट्याचं काय घेऊन बसलात ? मुकाट्यानं दूर व्हा...(शांडिल्य मोठ्या मुष्किलीनं काटा सोडून बाजूला होतात. आणि भयभीत चेहऱ्यानं काट्याचं भवितव्य बघत राहतात. कुटुंब काट्यावर चढते. मी जाऊन वजन बघतो)

**मी** : (मोठ्याने) दोन...दोनशे...दोनशे...तीस...पस्तीस—चाळीस पौंड...दोनशे चाळीस...म्हणजे...म्हणजे...(मी डोळे वटारून तसाच बघत राहतो.)

**कुटुंब** : ओरडू नका उगीच...मेला काटाच चुकीचा आहे. वीस पौंड वजन वाढेलच कसं कमी झालेलं असताना—

**मी** : कारण आहार—नियंत्रण !

**शांडिल्य** : (कुटुंबास) अहो...खाली उतरा हो...कृपा करून खाली उतरा...त्या मुक्या यंत्रावर दया करा हो...त्याची कीव करा हो—

**कुटुंब** : (कमरेवर हात ठेवून महिषासुरमर्दिनीच्या आवेशात) मुळीचं उतरणार नाही. वजन कमी होईपर्यंत उतरणार नाही...

(शांडिल्य कपाळाला हात लावून खाली बसतात. पडदा पडतो.)

## प ड दा

## म्हैस येता माझ्या घरा—

# अंक तिसरा

(दर्शनी पडदा उघडताच मी आनंदाने जवळ जवळ उड्या मारीतच माइकपाशी येतो. माझे स्वरूप एकदम पालटले आहे. चालण्यात ऐट आहे. पावलात दमदारपणा आहे. एखाद्या आक्रमक नवऱ्याचा संचार माझ्या अंगी झाला आहे, असेही कुणाला वाटेल.)

मी : आनंदी आनंद गडे... जिकडे तिकडे चोहिकडे...

नमस्कार मंडळी. मला माहीत आहे तुम्ही आश्चर्यचकित झाला आहात. दिसतंय ना तुमच्या चेहेऱ्यावरून... मला आनंद झाला आहे हे तर खरंच... कारण मी आता तुमच्यात आलो आहे. तुमच्यात म्हणजे कुटुंबाला मुठीत ठेवणारे तुमच्यामध्ये जे महात्मे आहेत त्यांच्यातला मी एक झालो आहे. खरं नाही वाटत ? नाहीच वाटायचं... एकदा हाताबाहेर गेलेलं कुटुंब मुठीत आणलंत का कधी तुम्ही ? नाही ना ?... मग माझा आनंद कळायचा नाही तुम्हांला—

माझा आनंद नुसता दुथडी भरून वाहतो आहे... जसं काय आनंदाचं धरणच फुटलं आहे... याचंही कारण आमचं कुटुंबच. अहो आमच्या कुटुंबानं लग्न झाल्यापासून इतका अमाप आनंद कधीही दिला नाही.

या आनंदात आमच्या घरमालकांचा वाटाही मोठा आहे. त्यांचा मी ऋणी आहेच....पण ह्या आनंदनिर्मितीबद्दल स्पेशल ऋणी आहे...कारण त्यांनी आम्हांला वरच्या मजल्यावरून तळमजल्यावर आणलच नसतं तर हा आनंद कदाचित निर्माणही झाला नसता...आम्हांला त्यांनी तळमजल्यावर आणलं आणि मातीवाल्या वाळवण्याना वरच्या मजल्यावर ढकललं. म्हणून आनंदाचा योग जुळून आला. सबब मी मालकांचा फार ऋणी आहे. हा आनंद निर्माण झाला दोनच दिवसांपूर्वी. कसलीशी सुटी होती. सकाळची कोवळी उन्हं पृथ्वीवर पसरली होती. फुलं नुकतीच उमलून त्यांचा सुगंध वाऱ्यावर तरंगत होता. सकाळ एखाद्या लग्नमंडपातल्या वधूप्रमाणं प्रसन्न व तजेलदार दिसत होती. अशा ह्या रम्य सकाळी मी पुस्तक वाचीत होतो—

(मागचा पडदा उघडतो. मी आमच्या बिऱ्हाडात खुर्चीवर बसून पुस्तक वाचीत आहे. इतक्यात बाळक्या घाबराघुबरा होऊन धांवत येतो आणि पायाला मिठी मारतो – अगदी नारायणरावानें राघोबादादाच्या पायाला मारली तशी—)

**बाळक्या :** मुझे बचाव पंत...मुझे बचाव—(त्याचे केस विस्कटलें आहेत. त्याच्या मागून सलूनवाला व पानवाला धावत येतात दोघांच्या हातात मिळून थर्मास, छत्री, पुजेतील देवाची चांदीची घंटी, आणि एक सुटकेस इतक्या वस्तू असतात.)

**मी :** काय गडबड आहे रे सकाळीं सकाळींच ?

**बाळक्या :** पंत हे सुमेरसिंग खरगसिंग माझ्या मागं लागले आहेत हो—

**सलूनवाला :** हा कोण लागतो साहेब तुमचा ?

**मी :** माझा मेव्हणा आहे हा–(त्यांच्या हातातील वस्तूकडे लक्ष जाऊन) ह्या वस्तू कसल्या आहेत तुमच्या हातांत ? (मी जवळ जाऊन बघतो) अरेच्या—हा थर्मास— बघू बघू ? हा आमचा आहे...ही छत्री माझीच आहे...ही सूटकेस –आणि ही तर देवाची घंटी...अरे आहे काय हा प्रकार ? या वस्तू तुमच्या-जवळ कशा आल्या ?

**पानवाला :** उधारी का मामला है यह सब...

**मी :** म्हणजे ?

**सलूनवाला :** म्हणजे साहेब या तुमच्या साल्यानं उधारीच्या बदल्यात या वस्तू आणून दिल्या आम्हाला...माझी वीस रुपये, यांची दहा रुपये, लॉंड्री-वाल्याची आठ रुपये, हॉटेलची सत्तावीस रुपये उधारी याच्या अंगावर आहे...

**मी :** बाळक्या...बाळक्या...(मी बाळक्याला साष्टांग नमस्कार घालतो) धन्य

आहेस तू माझा मेव्हणा झालास म्हणून. आणि धन्य आह बहिणीशी लग्न केलं म्हणून—मला काय हलवाई समजलास का माझ्या घरावर तुळशीपत्र ठेवायला निघालास तो?

**बाळक्या :** तस नाही पंत मी त्यांचे पैसे देणारच होतो...पण त्यांना दम नाही ना तेवढा...लगेच आले बोंबा मारीत...

**मी :** अरे पण हे कोण आहेत तुझे काके मामे—

**सलूनवाला :** मी सलूनवाला आहे साहेब. माझं बाताराम पेठेंत सलून आहे. (पानवाल्याकडे हात दाखवून) ह्यांचा माझ्या दुकानापलीकडंच पानाचा ठेला आहे. अहो ह्या सगळ्या वस्तू पाहिल्यावर आम्हाला शंका आली म्हणून इथं आलो...ए बाळक्या पैसा निकाल पहले...

**बाळक्या :** बाळक्या बाळक्या म्हणायचं काम नाही सांगून ठेवतो. बी. राम म्हणा नाहीतर बाळारामसाहेब तरी म्हणा...मी काय तुमच्या दुकानातला नोकर वाटलो की काय तुम्हाला?

**पानवाला :** देखो तो सही—सुरत कुत्ते की और मिजाज हाथी की!

**मी :** अरे बाळक्या, आम्ही अन्नं इतके दिवस राहिलो या गावात—कधी देणेकरी म्हणून दारात आला नाही...

**बाळक्या :** पण पंत तुम्ही ऐकून तर घ्या—

**पानवाला :** (बाळक्याच्या अंगावर जाऊन) चूप बे सुव्वर के बच्चे...

**सलूनवाला :** उधारीचं काय करतोस बोल आधी...

**बाळक्या :** सध्या पैसे नाहीत माझ्याजवळ...माझी ष्टोरी गेली की—

**सलूनवाला :** तुझी ष्टोरी गेली खड्डयात...ष्टोरीबीरी जानते नही हम, आम्हाला पैसे पाहिजेत—

**पानवाला :** निकालो पैसा—

**सलूनवाला :** पैसे काढ नाहीतर दाखवतो हिसका...

**बाळक्या :** अरे जा...मला हिसका दाखवतोय? वीस रुपडयांची उधारी ती काय आणि बकवाज केवढा करतोस?

**मी :** अरे बाळक्या, उधारी ठेवूनच्या ठेवून वर हा उन्मत्तपणा!

**बाळक्या :** तुम्ही आमच्या व्यवहारात पडू नका पंत—आमचं आम्ही बघून घेऊ...माझी ष्टोरी गेली म्हणजे असले दहा सलूनवाले आणि पंधरा पानवाले गाडी पुसायला ठेवीन माझ्या पदरी—

या आनंदात ।  झपाट्यानं पुढे होऊन बाळक्याचा शर्ट गळ्यापाशी धरतो.)

आहेच... **...ला** : तुला काय गमज्या वाटल्या होय? दाताची कवळी काढून

आम्ह... ...त देईन तेव्हा समजेल...मघापासून खूप ऐकून घेतलं...

क **बाळक्या** : अंगाला हात लावायचं काम नाही...

**सलूनवाला** : (हिसका देऊन) अरे जा कोंबडीच्च्या...

**पानवाला** : लगाव बत्ती सालेकू...

**बाळक्या** : (ओरडतो) खून करताहेत हो माझा...

(कुटुंब आतून धावत येते)

**कुटुंब** : मेल्यानो ही काय छोरी मागायची पद्धत झाली तुमची!

**सलूनवाला** : बाई, तुम्ही दूर रहा...ही आमची वेगळी छोरी आहे...

**कुटुंब** : आधी सोडा बघू त्याला—

**पानवाला** : उसको पकडा है तो छोडने के लिये नहीं—मारने के लिये—

**कुटुंब** : पण मेल्यानो, जीव का घेणार आहात त्याचा छोरीसाठी?

**मी** : अग छोरीसाठी नाही पकडलं त्याला...बाळक्याकडं उधारी आहे त्यांची...

**कुटुंब** : उधारी असली म्हणून मारामारी का करायची?

**मी** : तुझ्या ह्या दिवट्या भावानं ह्या ह्या...घरातल्या वस्तू उधारीच्या बदल्यात गहाण टाकल्या होत्या त्यांच्याकडं...

**कुटुंब** : कुणी बाळक्यानं? पण मी म्हणते गहाण टाकल्या होत्या म्हणजे गेल्या तर नव्हत्या ना? त्याचे छोरीचे पैसे आल्यावर त्यानं आणल्या असत्या परत...

**मी** : तू सुद्धा त्याचीच बहीण—

**कुटुंब** : ए दांडग्यांनो सोडा बघू त्याला...मी सांगते ना—

**सलूनवाला** : बाई आता ह्याला असा सोडणार नाही...

**बाळक्या** : सोड मला...मी बघतो किती पैसे आहेत माझ्याजवळ ते... सोड–सोड—

**सलूनवाला** : ठीक आहे. बघ...नाहीतर पुन्हा धरीन मी तुला...

(सोडतो. बाळक्या खुनशीपणानं त्याच्याकडं पहात कपडे नीट करतो. ड्रॉवर उघडून पैसे शोधण्याचा बहाणा करतो आणि तसाच खिडकीपाशी जाताच खिडकीतून उडी मारून पळून जातो. पानवाल्याचें त्याच्याकडे लक्ष जातें.)

**पानवाला** : देखो देखो...भाग गया सुव्वर का बच्चा—

**सलूनवाला** : पळून पळून कुठं पळेल? चलो जल्दी—

(दोघेही घाईने पळून जातात.)

**मी** : पाहिलेत आपल्या भावाचे प्रताप?

**कुटुंब** : काही एवढं खवचटपणानं विचारायला नको...तुम्हाला मी सुद्धा चांगली दिसत नाही मग माझा भाऊ तरी कसा दिसेल चांगला...थोडीशी उधारी झाली म्हणजे काय माणूस वाईट होतो लगेच?

**मी** : पण कुठून देणार आहे तो पैसे?

**कुटुंब** : तुम्हाला नाही ना मागितले त्यानं? मग झालं तर...त्याचा तो बघून घेईल...

**मी** : मार खाईल झालं कुठंतरी...

**कुटुंब** : तुम्ही म्हणजे अगदी शुभ बोल रे नाऱ्या आहात...अहो पण मी कशासाठी आले होते? (आठवते) माझी मेलीची आठवणही धड राहिलेली नाही...तुम्ही असे काहीतरी भलते विषय काढता आणि माझी आठवण नाहीशी होते...(पुन्हा आठवते) हां...रध्या बंड्याला बघायला आले होते... ग्राउंडवर जायचंय ना आम्हाला? अरे रध्या, बंड्या, रध्या-बंड्या, रध्या—

(रध्या आणि बंड्या हातात पतंग घेऊन येतात.)

काय करताय मेल्यानो तुम्ही?

**रध्या** : पतंग उडवतोय आम्ही—

**कुटुंब** : ठेवा तो पतंग बाजूला आणि आधी चला ग्राउंडवर बाळक्यामामानं सकाळीच सायकल आणून ठेवली आहे—

**मी** : ग्राऊंडवर कशाला?

**रध्या** : तुम्हाला माहीत नाही बाबा? अहो आपली आई—

**मी** : आपली नव्हे...तुमची...

**रध्या** : अं (लक्षांत येऊन) हो...हो...आमची आई—आमची आई सायकल शिकते गेले दोन तीन दिवस—

**मी** : काय? सायकल? सायकल म्हणजे दोन चाकांची, हँडलची, पायडलची?

**कुटुंब** : नाही...चार चाकांची, बिन हँडलची अन् चार पायडलची कळलं?

**रध्या** : पण बाबा — तिचं सायकल शिकणं म्हणजे आम्हांला उगाच शिक्षा—

**कुटुंब** : मेल्या तुला रे काय त्रास पडतोय एवढा? सायकल तर बाळक्याच आणतो. फक्त ग्राउंडमध्ये सायकल धरायचं तेवढं काम करावं लागतं तुला...

रघ्या : आ हा...ग्राउंडमधली गाढवं, कुत्रीं, डुकरं हाकलायचं काम कोण करतं रोज?

बंड्या : आणि तूं सायकल फिरवतेस त्या भागातले सगळे दगड नाही का आम्ही वेचून काढीत आधी?

रघ्या : झालंच तर रोज मोठा थोरला धोंडा उचलून कोण आणतं? आम्हीच ना?

मी : धोंडा कशाला आणायचा!

रघ्या : बाबा, तुम्हांला माहीत नाही? अहो त्या धोंड्यावर चढून आई मग सायकलवर बसते. पाच ते दहा वेळा ती नुसती धोंड्यावरच चढते—मग धोंड्यावरनं सायकलवर बसते—कधी सायकल पडते कधी आई पडते—तर कधीं धोंडाच पडतो. आणि परवा तर आई, सायकल, धोंडा हे तिघंही पडले.

बंड्या : आणि बरं का बाबा? आईला सायकलचा राग आला ना की ती ढकलून देते—सायकलीला लाथ पण मारते...

कुटुंब : मेल्यांनो...किती कराल आईची निंदा? पुढच्या जन्मी वटवाघूळ व्हाल वटवाघूळ! हॅं...सायकल कशी धरायची असती हे सुद्धा माहीत नाही होय मला? मी काय घरात प्रॅक्टिस करते ती काय उगाच?

मी : काय? घरात प्रॅक्टिस?

कुटुंब : हो, कां, एवढं आश्चर्य का वाटलं तुम्हाला?

मी : तसं नाही...पण घरात सायकल नसताना प्रॅक्टीस म्हणजे—

कुटुंब : प्रॅक्टीस करायला सबंध सायकलच कशाला पाहिजे! थांबा जरा...

(कुटुंब आत जाते आणि सायकलचे नुसते हॅंडलच घेऊन येते. हॅंडलला घंटा आहे. ती वाजवीत सायकलवर बसल्यासारखी येते.)

मी : हे काय! (आश्चर्यानें बघतच राहतो)

कुटुंब : ही प्रॅक्टिस...

मी : अग पण हे नुसतं हॅंडलच आहे...

कुटुंब : हो...हॅंडल धरायची प्रॅक्टिस करते मी यावर...पायडलही ठेवली आहेत आत...

मी : मग नुसती सीटही आणायची—

कुटुंब : ती पण आणली आहे—

मी : छान! म्हणजे विकेंद्रीकरण पद्धतीनं सायकल शिकते आहेस की काय तू?

कुटुंब : मग त्याशिवाय का येते मला चालवायला ?

मी : म्हणजे इतक्यात यायलासुद्धा लागली सायकल तुला ?

कुटुंब : शंका वाटते काय तुम्हांला ? मेला विश्वास म्हणून कधी ठेवलात माझ्यावर ? मग आज चलाच तुम्ही माझ्याबरोबर ?

मी : तुझ्याबरोबर ? कुठं ?

कुटुंब : मी सायकल कशी चालवते ते बघायला—

मी : मी कशाला येऊ ? मला बघवणार नाही ते—

कुटुंब : काय बघवणार नाही हो तुम्हांला ?

मी : मला कुणाचेही हाल झालेले बघवत नाहीत—मग ते जनावर असो नाहीतर सायकल असो—

कुटुंब : मेलं वाकडं तेवढं बोलायला छान येतं तुम्हांला. ते काही नाही-आज आलंच पाहिजे तुम्हांला माझ्याबरोबर...मी आज रस्त्यावरून सायकल चालवून दाखवणार आहे तुम्हाला...

मी : मला कशाला दाखवतेस ? तशी थोडीशी येत असेल तुला—

कुटुंब : तुमचं मेलं त्या वर्तमानपत्रवाल्यासारखं आहे. कुठल्या कोण ५०–६० वर्षांच्या साळकाया एसेसीला अन बी एला बसतात अन् पास होतात-त्यांचं मेलं केवढं कौतुक करतात ते वर्तमानपत्रवाले...म्हणे एवढ्या वयात शिकण्याची हौस कौतुकास्पद आहे. घरात बसून पुस्तकं वाचायची अन् तीच मेली पेपरात लिहून काढायची—त्यात काय विशेष आहे ? अन् माझ्यासारखी संसारी बाई सगळा संसार सांभाळून—

मी : सांभाळून ?

कुटुंब : गप्प बसा तुम्ही – सगळा संसार सांभाळून पोहायला शिकते, सायकल चालवायला शिकते त्याचं काही वाटत नाही त्यांना—

मी : अग ते शिकणं निराळं आणि हे शिकणं निराळं—

कुटुंब : काही निराळं नाही.

मी : नाही कसं ? अग पोहणं काय, सायकल शिकणं काय ह्या गोष्टी ठराविक वयातच शिकाव्या लागतात—

कुटुंब : वय लागत नाही अन् फय लागत नाही. हौस असावी लागते. तुम्हांला तर वयाशिवाय दुसरं काही सुचतच नाही. चला मुकाट्यानं.

मी : अग पण मला काम आहे—

**कुटुंब :** काम घाला चुलीत. मुकाट्यानं धोतराचा काचा मारा आणि माझ्याबरोबर निघायची तयारी करा. थेट रस्त्यावरच जायचं आपण.

**मी :** तू असं बघ...रस्त्यावर सायकल चालवायची म्हणजे जरा विचार करायला पाहिजे. तिथं मोटारी, बैलगाड्या, ट्रक अशी मोठाली वाहनं जात येत असतात—

**कुटुंब :** मला मुळीच त्यांची भीती वाटत नाही.

**मी :** तुला नसेल वाटत...पण त्यांचा काही विचार करशील की नाही. ?

**कुटुंब :** मी काय खाणार आहे का गिळणार आहे त्यांना ?

**मी :** तसं नाही. चुकून धक्का लागला तर ?

**कुटुंब :** मला धक्का द्यायला त्यांचे काय डोळे फुटले आहेत ?

**मी :** तुला नाही—तुझा म्हणतोय मी...तू नव्यानं सायकल चालवणारी—

**कुटुंब :** मग त्यांत काय झालं ? आणि समजा मला मोटार चुकवता आली नाही तरी मोटारवाल्याला सायकल चुकविता येईल की नाही ? आता काही एक सांगू नका मला...मेला प्रत्येक गोष्टीत मोडता घालायचा तेवढा माहीत आहे तुम्हांला...आधी तयारीला लागा...बंड्या, रघ्या तुम्ही लांब उभे रहा आज... कळलं ? चला सगळेजणं—

(रघ्या, बंड्या, जातात. कुटुंबही जाते. मी काचा मारतो आणि जातो. पडदा खाली येतो. पुन्हा पडदा वर जातो आणि मी धावत बाहेरून येतो)

**मी :** मंडळी, मी निम्म्या वाटेतनंच पळून आलो आहे. आता काय सांगायचं तुम्हांला ? आमची वरात—हो वरातच ती—सर्वांत पुढं रघ्या, बंड्या. रघ्या-बंड्या तोंडानं बँड वाजवीत होते. मध्ये कुटुंब कमरेला पदर खोचून विहिणीची जिरवायला निघाल्यासारखे चालले होते. आणि सर्वांत मागे मी सायकल धरून—नव्हे ओढीत चालली होतो...तमाम गल्ली ही वरात बघायला रस्त्यावर आली होती. आम्ही रस्त्यापर्यंत गेलो. कुटुंबानं सायकलचा ताबा घेतला. कुटुंबाची आणि सायकलची झटापट मी थोडा वेळ पाहिली मात्र—पुढं काय होणार हे मला कळेना. तेव्हा कुटुंबाची नजर चुकवून चक्क पळून आलो...

(तेवढ्यात भाजीवाली लंगडत येते. तिच्या लुगड्यावर टमाट्याच्या साली, भाजीची पानं चिकटली आहेत मातीही लागली आहे. हातात भाजीची पाटी, भाजीवाली अस्ताव्यस्त आहे.)

**भाजीवाली :** अवं पंत...पंत...

**मी :** काय ग बाई...काय हवंय तुला ? अन् लंगडतेस कशानं ?

**भाजीवाली :** आता मलाच इचारा...

**मी :** म्हणजे ?

**भाजीवाली :** अवं तुमची बायकू सायकलवरनं ढुशा देतीया नव्ह का तकडं जाणारा येनाऱ्याला—

**मी :** सायकलवरनं ? बाप रे...(एक गाडीवान हातात चाबूक घेऊन तावातावाने येतो)

**गाडीवान :** (भाजीवालीस) ओ बाई, त्यो पंत पंत म्हनत्यात त्यो हतच—न्हातो का ?

**मी :** (दबकत) हो...हो...मीच तो...

**गाडीवान :** पंत म्हणं ! लइच्च संथ दिसताय तुमी ?

**मी :** काय झालं ?

**गाडीवान :** अवं तकडं तुमची बायकू कुनाला बी आवरनाशी झालीया... माजी बैलं बुजली अन् झाडावर जाऊन आदळली न्हवं का ? पाय बी मुडपला येका बैलाचा—

**मी :** बैल बुजले ? कशाला ?

**गाडीवान :** तुमच्या बायकूला—तुमच्या बायकूनं टक्कर दिली न्हवं का सायकलसकट...तशी बैलाना सवं हाय टकरीची...पर बैलांच्या टकरीची... एकदम यवडी मोठी बाई टक्कर द्याला आल्याबराबर बुजली न्हवं का ती !

**मी :** अरे मग इकडं कशाला आलास ?

**गाडीवान :** आलो असली अफलातून बायकू पाळणारा कोन गडी हाय त्ये बघावं म्हणुन...

**मी :** पण आमच्या कुटुंबाला तर लागलं नाही ना ?

**गाडीवान :** तुमच्या कुनाला ?

**मी :** कुटुंबाला...

**भाजीवाली :** म्हंजी बायकूला—बायकूला—

**गाडीवान :** बायकूला व्हय ! न्हाइ...तुमचं कुटुंब अज्जात उडालं अन् गवतात पडलं धबेलदिशी...

(एक त्रस्त म्हातारा मोठमोठ्याने ओरडत येतो)

**म्हातारा :** गाढव, मूर्ख, बेअक्कली (गाडीवानाला धरून) तूच का तो पंत का जंत म्हणतात तो ?

**गाडीवान** : मी न्हाई...(माझ्याकडे बोट दाखवून) त्यो तकडं हाय...
**म्हातारा** : (गाडीवानास) मग तू कशाला मधे उभा राहिलास ? (मला) कुठाय तो पंत...माझ्यापुढं आणा त्याला....
**मी** : काय काम आहे ?
**म्हातारा** : आधी पंत आणा मग काम सांगतो–
**मी** : मी...मीच पंत आहे...
**म्हातारा** : कोण तू ? तू पंत आहेस ?
**मी** : हो...का ? वाटत नाही मी पंत ?
**म्हातारा** : वा रे पंत ! स्वतःला एवढे पंत म्हणवता तर अक्कल कुठं गेली तुमची ?
**मी** : कुठं नाही...इथंच आहे...
**म्हातारा** : मूर्ख आहात...
**मी** : ते कळलं मला...पुढ बोला...
**म्हातारा** : मला सांगा–तुमची बायको नकोशी झालीय का तुम्हांला ?
**गाडीवान** : घ्या...पंत...आणखीन एक गिराइक आलं तुमाला—
**भाजीवाली** : या बया...म्हातारबाबा तुमाला बी मारलं का काय तिनं ?
**म्हातारा** : (मला) मारलं ?...चेचलं...चेचलं मला...अहो ती तिकडं रस्त्यावर सायकलवरनं लोकाना धडका मारतेय ती तुमचीच ना बायको ?
**मी** : धडका मारते ?
**म्हातारा** : नुसत्या साध्या धडका नव्हे...एडक्यासारख्या जोराच्या धडाका मारते आहे...अरे कुणाची आहे ती बायको ?
**मी** : नाही...तशी माझीच आहे...
**म्हातारा** : तशी सर्वस्वी तुमचीच असेल तर अशी मोकाट का सोडलीत लोकांच्या अंगावर ?...महामूर्ख...शतमूर्ख...
**मी** : मला म्हणालात ?
**म्हातारा** : हो हो तुम्हाला आणि तुमच्या त्या मारक्या बायकोलाही...कळलं ?
**मी** : अहो...त्याचं काय आहे ?...
**म्हातारा** : मी विचारतो. बायको सुटली कशी इतकी ?
**मी** : (लाइट मूडमध्यें) छे हो...ती तशी फारशी सुटलेली नाही...शिवाय वजन कमी करण्याच्याच प्रयत्नात आहे ती—

**म्हातारा :** तशी सुटली तर खुशाल सुटू दे माझं काही एक बिघडणार नाही!
–मी विचारतोय अशी–रस्त्यावर कशी सुटली मोकाट ?

**गाडीवान :** पाइंट बराबर हाय...मी बी त्येच इचारतो...आपली बायकू घरात बांदून ठिवावी...उगा रस्त्यावर कशापायी मोकळी सोडावी ? अवं माजी बैलं तशी गरीब हैत तरीबी त्येना बांदून ठिवतो...

**म्हातारा :** म्हणजे तुलासुद्धा धडक दिली की काय तिनं ?

**गाडीवान :** अवं मलाच काय पर ह्या भाजीवालीची बी लइ दुरदशा केलीया ह्यांच्या कुटुंबानं...

**म्हातारा :** (मला) हे हे दिसतंय ना तुम्हांला–मग लौकर धरून आणा तिला ...नाहीतर सगळ्या गावाची मोडतोड करून टाकील ती !

**मी :** ती सायकल शिकते आहे म्हणून–

**म्हातारा :** उपकार करते आहे आमच्यावर...नशीब आमचं ती मोटार <u>नाही</u> शिकत...

**मी :** आपल्याला फार लागलं नाही ना कुठं ?

**म्हातारा :** सगळं अंग ठेचून निघालं आहे...

**गाडीवान :** माझं बैल बुजलं न्हव का ?

**म्हातारा :** अहो मी देवाला निघालो होतो...समोरून सायकलवरनं काहीतरी येतय असं वाटलं...त्यात नीट दिसत नाही मला...मी आपला रस्ता सोडून झाडाच्या कडेनं चाललो...कसलं काय अन् कसलं काय ? सरळ नेम धरून सायकल आणली ना माझ्या अंगावर... झाडातच चेचलं मला...

**मी :** तोल गेला असेल तिचा...

**म्हातारा :** (खवळून) अरे, असा बायकांचा तोल जायला लागला तर कसं व्हायचं या दुनियेचं ?

**भाजीवाली :** म्हातारबाबा तुमाला निस्तच चेचलं–पर माझं पार नुसकान केलं तिनं...मी भाजीची पाटी घिऊन चाललेवते ... मागनं सायकलं वरनं आली अन् हुंदाडलं न्हव का मला ? मी शाप पालथी पडली रस्त्यावर...आन् माझ्याखाली भाजी चिरडली...मी इचारायला गेले तर मलाच दम दिला— म्हणाली मागं बगून नीट चालता येत न्हाइ का म्हणून ? ...तुमीच न्याव द्या आता—

**गाडीवान :** अन् मला काय थोडा दम दिला व्हय ह्यांच्या कुटुंबानं ?...

बैलाना टक्कर दिली ती दिली अन् वर म्हणतय कसं...गाडी रस्त्यात का आनलीस?

**म्हातारी :** ही काय पद्धत झाली बोलण्याची? अरे, आम्ही काय घोडं मारलंय तुमचं?...तुम्ही नवराच आहात ना तिचा?

**मी :** शंका आहे की काय तुम्हाला...अगदी नवरा नव्हे सख्खा नवरा आहे मी तिचा—

**म्हातारा :** सख्खा असा नाही तर अख्खा असा—पण तुम्ही नुसता नवरा नसून नंदीबैलही आहात...शुद्ध नंदीबैल...बायकोला सायकल चालवायला येत नाही हे माहीत असताना—

**मी :** नाही...तशी थोडीशी येते तिला...

**म्हातारा :** (सगळ्याकडे हात दाखवीत) थोडीशी येते काय? थोडीशी येते तर एवढा गोंधळ घातला तिनं...जास्त येत असती तर काय केलं असतं? बायको ऐकत नाही म्हणजे काय? दोन लाथा घालायच्या कमरेत आणि सांगायचं याद राख घराबाहेर जाशील तर—

**मी :** नाही...म्हणजे तसं सांगितलं होतं मी—

**म्हातारा :** लाथा घालून सांगितलं होतंत?

**मी :** नाही. लाथा नाही घातल्या...म्हणजे काय आहे की लाथेची सवय नाही...माझ्या पायांना...

**म्हातारा :** मग तुम्ही बजावलं असतानासुद्धा गेली ती बेमुर्वतखोरपणानं?

**मी :** तशी बेमुर्वतखोरपणानं नाही गेली...मला म्हणाली तुमची सूचना विचाराधीन आहे.

**म्हातारा :** विचाराधीन आहे काय? अरे सूचना विचाराधीन ठेवायला ती काय सरकार समजते की काय स्वतःला?

**मी :** म्हणजे काय आहे की मी जरा आंतरराष्ट्रीय धोरणानं वागायचा प्रयत्न करतो...एकदम लाथेवर जाण्यापेक्षा वाटाघाटींनी सुटला प्रश्न तर...

**गाडीवान :** आतां हाय का मजा? अवं बायकू ही काय वाटाघाटी करायची जागा हाय व्हय?

**मी :** कारण घरात मी शांततावादी आहे...

**म्हातारा :** बस्स...सांगूच नका आणखी काही. आम्ही जाणलं सगळं— कुटुंबापुढं आपलं काही एक चालत नाही हाच या सगळ्याचा अर्थ!

**मी :** (उसन्या अवसानानें) हां...हां...भलतं सलतं बोलू देणार नाही मी— शांततावादी असलो तरी माझी शांतता समर्थाची आहे...दुबळ्याची नाही. मनात आणीन तर (इकडे तिकडे पाहून कुटुंब जवळपास नाही याची खात्री करून घेतो—) अशी पाच पन्नास कुटुंबं वठणीवर आणीन—

**म्हातारा :** पाचपन्नास सोडा एक तरी कुटुंब रस्त्यातून काढून दाखवा अगोदर ...तुमच्यासाठी नाही तरी सार्वजनिक हितासाठी तरी...

**गाडीवान :** न्हाइतर काय...आतापातुर येक तरी झाड न्हाइलं आसल का शिल्लक जाग्यावर ?

**मी :** अहो ती झाडांना काय करते ?

**म्हातारा :** काय करते ? माझंच उदाहरण सांगतो—मी विचारलं...बाई, तुम्ही माझ्या अंगावर सायकल घातलीत—मी नसेन दिसलो तुम्हांला पण हे एवढं मोठं झाड तरी दिसलं की नाही ? तर त्यावर काय म्हणाली ती माहीत आहे ? ती म्हणाली की मला फक्त रस्ता दिसत होता...ही मेली दहा दहा वर्षं रस्त्याच्या कडेला उभी असलेली झाडं आजच नेमकी रस्त्याच्या मधोमध येऊन उभी राहिली त्याला मी काय करू ? आता बोला...

**मी :** असे म्हणाली ती ?

**म्हातारा :** एवढंच नाही—मी रागावलो तर मला म्हणाली तुम्हांला एवढी समोरून येणारी सायकल दिसत होती तर झाडावर का नाही चढून बसलात ? मला सांगा माझं हे वय का आहे कुठही चढण्याचं ?

**गाडीवान :** ओ म्हातारबावा, असलं कुटुंब असल्यावर ह्यो विचारा पंत तरी काय करील ? ह्यात पंतांचा काय बी गुन्हा न्हाइ...मागल्या जल्मी पंतानं लइ घोळ केला आसल बायकूच्या पायात तवा ह्या जल्मी असलं अफलातून कुटुंब त्येंच्या वाट्याला आलया...

**म्हातारा :** (मला) असं बघताय काय धोतर सुटल्यासारखे ! आता तरी आपल्या बायकोला रस्त्यातून काढता की नाही ?...

**मी :** तोच विचार करतोय मी...

(तेवढ्यात वाळवणे)

**वाळवणे :** विचार करायला सवड कोण देतोय इथं ? आम्हांला मातीत घालायचा निश्चय केलाय ना तुम्ही ?...पंत...

**मी :** कोण ? वाळवणे ?

**वाळवणे** : तुम्हांला मी मागंच बजावलं होतं...

**मी** : कशाबद्दल ?

**वाळवणे** : तुमच्या कुटुंबाबद्दल—

**म्हातारा** : (मला) अजून तरी शहाणे व्हा...(वाळवण्यांस) तुम्हांला कुठल्या मातीत घातलं यांच्या कुटुंबानं ?

**वाळवणे** : घरातल्या—

**म्हातारा** : म्हणजे ती घरातही आली ? तुमच्या अंगावर ?

**वाळवणे** : पंत केव्हा संपणार आहे तुमचा हा धिंगाणा ?

**मी** : अहो कसला धिंगाणा ?

**वाळवणे** : आमचं आयुष्य म्हणजे दुसरं काही राहिलेलंच नाहीं...नुसती माती...माती आणि माती...

**मी** : काय झालं ते तरी सांगाल की नाही ? का आपलं सारखं मातीतच तोंड घालून बसताय ?

**वाळवणे** : अजून माती थांबली नाही पडायची...रोज पानात माती पडते... तुम्हांला किती वेळा सांगायचं ? कुटुंबाला आवरा...आवरा...आवरा...

**मी** : वाळवणे...तुमचं डोकं फिरलंय कां ?

**वाळवणे** : मला विचारता वर ! लाज नाही वाटत तुम्हांला ?

**मी** : अहो वाळवणे...गेले चार महिने आम्ही तळमजल्यावर राहात आहोत आणि तुम्ही वर राहात आहात. माती वरून खाली पडते – खालून वर नव्हे – आमची माती वर जाईलच कशी !

(वाळवणे या खुलाशाने हवा गेलेल्या फुग्यासारखा चेहरा टाकतात)

**वाळवणे** : (गडबडतात)...म्हणजे...ते...हे...ते...म्हणजे (कृत्रिम हसून) विसरलोच मी...मला वाटलं माती म्हटली की तुमचीच...आम्ही आता वरच्या मजल्यावर आहोत नाही का ! हो...ते काय झालं सवयीनं...तुमच्याकडंच आलो तक्रार करायला...वर जायला हवं नाही का ? माफ करा...(झटकन जातात)

**मी** : (चिडून) काय मांडलय काय सगळ्यानी इथं !

**म्हातारा** : अहो, बायकोला काढताय ना रस्त्यातून तुम्ही ?

**मी** : (भानावर येऊन) अं ?...अं ! हो हो...काढतो...

**म्हातारा** : मग उभे काय राहिलात शुंभासारखे नुसते ? निघा लगेच.

**मी** : हो...पण

म्हा... : मी आहे ना तुमच्या मदतीला—
गाडीवान : आन् मी बी हाय की...माजलेलं लइ बैल धरून दावणीला बांदल्यात ह्या पठ्यानं—
मी : का हो ? माझी बायको म्हणजे काय बैल आहे माजलेला ? सांगितलं ना तुम्हांला—मी घेऊन येतो तिला...तुम्ही जा...आणि झाल्या तसदीबद्दल मी क्षमा मागतो तुमची...
म्हातारा : क्षमा बिमा काही चालायचं नाही—आमच्या देखत तिला आवरा... निघा म्हणतो ना—
मी : अहो पण अशी दमदाटी काय देता ? तुम्ही काय कुटुंब आहात आमचं ?
गाडीवान : ओ पंत संग एक काठी अन् दोर बी असू द्या—
मी : काठी आणि दोर ? काय वेड लागलय् काय तुम्हांला ?
म्हातारा : होय...बरोबर आहे त्याचं म्हणणं...सायकल थांबवायला काठी हवी आणि तुमच्या कुटुंबाला धरायला दोर हवा...
मी : उगाच काहीतरी काय सांगताय ? तुम्ही जा आता मी येतोच तुमच्या मागून...
म्हातारा : (वेडावून) मागून येतो...मागून कशाला येता ? चांगले मर्दासारखे पुढं व्हा...सणसणीत लाथा घाला कमरेत आणि विचारा तिला—
मी : (हात जोडून) हे बवा मंडळी, मी दोनच काय पण चारसुद्धा लाथा हाणतो आणि नुसतंच नव्हे तर अगदी कान धरून विचारतो—
म्हातारा : कान धरा पण कुटुंबाचा धरा...नाहीतर तिच्यापुढं स्वतःचाच धराल...
मी : हो हो सगळं काही करतो...पण तुम्ही एकच करा हे सगळं मला तुमच्या देखत करता यायचं नाही...
म्हातारा : वाटलंच मला...
मी : (चिडून) वाटलंच मला म्हणायला तुम्हांला काय होतंय ? नंतर मला इस्पितळांत पोचवायला तुमच्यापैकी एकजणही जाग्यावर राहणार नाही हे पक्कं माहीत आहे मला...तेव्हा तुम्ही मेहेरबानी करा आणि जा...मी एकटा समर्थ आहे कसल्याही संकटाला तोंड द्यायला...
म्हातारा : तसं का होईना !—तुम्ही एकटे जा...(खालच्या आवाजात) पण

जाण्यापूर्वी धोतराचा काचा घट्ट करा...कुटुंबाला आवरायला जायचं ... ६ लक्षात असू द्या–

**मी :** हो...हो...(मी काचा घट्ट करतो.) तुम्ही मुळीच चिंता करू नका... आमचं कुटुंब कसंही असलं तरी—एका लाथेत—

**कुटुंब :** (तरातरा येते) लाथा घातल्या पाहिजेत मेल्यांना...

(मी, गाडीवान, म्हातारा आणि भाजीवाली भूकंप झाल्यासारखे वेडेवाकडे हादरतो. कुटुंबाचं फक्त माझ्याकडे लक्ष आहे.)...

तुम्ही बायकोला रस्त्यावर टाकून पळून आलात ना इकडे भागुबाईसारखे?

**मी :** म्हणजे काय झालं की—

**कुटुंब :** चूप...बघून घेणार आहे मी एकेकाला...

(गाडीवान म्हाताऱ्याला खुणावतो, दोघही दरवाज्याकडे जातात. भाजीवालीही तशीच जाते)

**म्हातारा :** (दरवाजातून मला खुणावून) तेवढं लाथेचं अन् कानाचं लक्षात ठेवा ...(कुटुंब दाराकडे तोंड वळवते. सर्वजण पळतात)

**कुटुंब :** (मला) लाथेचं अन् कानाचं काय बोलला तो म्हातारा? बोला...

**मी :** म्हणजे काय...ते...हे...आपलं...मी तुझं गुणवर्णन करीत होतो की ...तुझ्या अंगात एवढं सामर्थ्य आहे की तू जिथं लाथ मारशील तिथं पाणी काढशील असं सांगत होतो मी त्यांना...

**कुटुंब :** आणि कानांचं?

**मी :** कानाचं ना?...अं...अं...हे सगळं मी कानाची शपथ घेऊन त्यांना सांगितलं इतकंच

**कुटुंब :** तुम्हांला काय वाटलं मी कुकुलं बाळ आहे?...त्या म्हाताऱ्यानं सांगितलं नाही तुम्हांला की बायकोच्या कमरेत लाथा घाला आणि कान धरून सांगा तिला म्हणून?

**मी :** तुला कसं कळलं?

**कुटुंब :** माझी सायकल पाडली मेल्यानं तेव्हा तिथंच म्हणाला तसं माझ्या तोंडावर...तुम्ही काय करीत होता इथं घरात बसून?

**मी :** तक्रारी नोंदवून घेत होतो समस्त जनतेच्या—

**कुटुंब :** तक्रारी? ह्या मेल्यांनी सगळ्यांनी येऊन सांगितलं असेल तुम्हांला की मीच त्यांच्या अंगावर सायकल घातली म्हणून—

मी : हो—

कुटुंब : हो—काय हो? त्यांनी सांगितलं आणि तुम्ही विश्वास ठेवलात! हे मेले सगळे माझ्या वाटेवर येऊन घडपडले असं मी सांगितलं तर मात्र तुमचा विश्वास बसायचा नाही. कारण बायकोपेक्षा इतर लोक तुम्हाला जवळचे!

मी : अग पण सगळेच कसे वाटेत येतील?

कुटुंब : मग काय मी मुद्दाम त्यांच्या अंगावर जाऊन सायकल घातली? म्हणून म्हणत होते की तुम्ही चला माझ्याबरोबर म्हणजे कळलं असतं तुम्हाला—

मी : ते जाऊ दे आता तरी झाली ना सायकल चालवून तुझी?

कुटुंब : मुळीच झाली नाही...मी भाजी फोडणीला टाकायला आले आहे... सायकल शिकत असले तरी संसारदक्षता सोडलेली नाही मी—अजून अर्धातास फिरवायचीय मला सायकल—

मी : बाप रे! अजून अर्धातास?

कुटुंब : काही बाप रे न् आई ग करू नका...तुम्हांला मुळीच त्रास देत नाही मी. रघ्या बंड्या आहेत माझ्याबरोबर...हा मेला बाळक्या येतो म्हणाला अन् कुठं गेला पळून कुणास ठाऊक? (आत जाते तेवढ्यात बंड्या धावत येतो)

बंड्या : बाबा...बाबा...बाबा...

मी : काय झालं रे बंड्या?

बंड्या : बाबा, बाळक्यामामाला मारलं...

मी : मारलं? कुणी?

बंड्या : तो सलूनवाला, पानवाला, धोबी, हॉटेलवाला—

मी : केव्हा?

बंड्या : आत्ता...रघूदादा आईबरोबर पळत होता सायकलमागून—तेव्हा तिकडं त्या लोकांचं आणि बाळक्यामामाचं जोरदार भांडण चालू होतं...

मी : असं? (कुटुंब आतून येतं)

बंड्या : हो...ना...आणि लगेच फायटिंग सुरू झाली...

कुटुंब : कुणाची?

बंड्या : अग तो सलूनवाला, पानवाला, धोबी सगळ्यांनी मिळून बाळक्यामामाला बडवलं...

मी : मला वाटलंच होतं असं काहीतरी होईल म्हणून—

**कुटुंब** : अन् मेल्या तू नुसता बघत होतास ?

**बंड्या** : मग काय करायचं ? आम्ही काय मार खायचा होता ?

**कुटुंब** (मला) अहो तुम्ही तरी जायचं ?

**मी** : कुठं ? फायटिंग करायला ? मला काय फायटिंग करता येते ? ती आली असती तर आपल्या संसाराचं चित्र केव्हांच बदललं असतं – जाऊ द्या झालं –

**कुटुंब** : अरे मेल्या पण बाळक्यामामा कुठाय आता ?

**बंड्या** : त्याला सगळ्यांनी धरून पोलिस चौकीवर नेलं आहे.

**कुटुंब** : कुठं पोलिस चौकीवर ? मारूनऱ्यामारून वर मेल्यांनी पोलिस चोकीवर नेलं ?...(मला) अहो तुम्ही उभे काय राहिलात इथं खांबासारखे ? पोलिस चौकीवर जा आधी – सोडवा त्याला—

**मी** : मी आणि पोलिस चौकीवर ? छे छेः पोलिसाचं अन् आपलं अजिबात जमत नाही...शिवाय घरातही कुणीतरी पाहिजेच –

**कुटुंब** : बसा घरात तुम्ही...भागुबाईसारखे...मीच जाते रध्याला घेऊन... आणि सोडवून आणते बाळक्याला...

**मी** : अग तू कशाला जातेस पोलिस चौकीवर ?

**कुटुंब** : तुम्हांला काय बाळक्याला पोलिसांनी पकडलं काय किंवा चोरांनी धरलं काय सारखंच पण माझा भाऊ आहे तो...चल रे बंड्या...

(बंड्या आणि कुटुंब जातात. मी मान उंचावून दोघे गेल्याची खात्री करून घेतो. सलूनवाला व पानवाला यांनी आणलेल्या वस्तू गोळा करून एका कोपऱ्यात ठेवण्यासाठी जातो. तेवढ्यात इंदिराबाई आणि त्यांच्या वन्सं एकमेकीशी भांडतच आमच्या घरात येतात. माझ्याकडे त्या दोघींचे अजिबात लक्ष नाही.)

**वन्सं** : (तोऱ्यात) मला काही एक सांगू नका—

**इंदिरा** : वन्सं...मी काय म्हणते –

**वन्सं** : काहीही म्हणू नका अन् सांगू नका...

**इंदिरा** : पण—

**वन्सं** : मला ऐकायचं नाही...मला सांगू नका...तुम्ही खोटारड्या आहात— लेखी पुरावा आहे माझ्याजवळ...आता बोलूनच द्यायची नाही मी तुम्हांला—

**इंदिरा** : ह्या आपल्या घरगुती गोष्टी—

**वन्सं** : घरगुती नाही न् फिरगुती नाही. मुकाट्यानं नाक घासा न् कबूल करा—

इंदिरा : अहो पण वन्सं—

**वन्सं** : वन्सं गेली मसणात...मला नका सांगू...रघ्याच्या आईला ‹

**इंदिरा** : तुम्हांला सरळ सांगून कधी पटलंय्? मेलं सारखं गेंड्यासारखं . वर करून बोलायचं...मीच सांगते रघ्याच्या आईला...(वन्संकडं बघत माझ्याकडे येत) रघ्याची आई...अहो रघ्याची आई...

**मी** : अहो मी रघ्याचा बाप आहे—आई नव्हे...

**इंदिरा** : इश्श्य! तुम्ही? मला वाटलं रघ्याची आईच आहे...

**मी** : असं कसं वाटलं? रघ्याची आई काय धोतर नेसते की शर्ट घालते?

**इंदिरा** : म्हणजे तुम्ही इथं आहात याची कल्पना नव्हती...

**मी** : आणि का हो? देवानं तुम्हांला चांगलं तोंड दिलं आहे—

**इंदिरा** : इश्श्य! तसं रूप चांगलं आहे माझं असं हे सुद्धा म्हणतात—(मला धक्का बसतो)

**मी** : अं? अं?...तुमचा काहीतरी गैरसमज होतोय...

**वन्सं** : स्वतःच्या रूपाच्या बाबतीत त्या नेहमीच गैरसमज करून घेतात...

**मी** : तसं नाही. मला म्हणायचं होतं की देवानं चांगली वाचा दिली आहे तर रघुनाथाची आई म्हणावं, रघूची आई म्हणावं—का रघ्याची आई? आणि तेही त्याच्या बापापुढं?

**इंदिरा** : सगळी आळी म्हणते तेच म्हटलं हो मी...चुकलं असेल तर रघूची आई म्हणते मी...रघूची आई कुठाय?

**मी** : आपण?

**इंदिरा** : मी इंदिरा मंकीकर...

**मी** : काय कर म्हणालात?

**वन्सं** : मंकी...मंकी...मंकीकर

**मी** : वाटलंच मला...आणि (वन्संकडे) या?

**इंदिरा** : या माझ्या वन्सं...

**मी** : नेहमी अशाच भांडता का?

**वन्सं** : मी मुळीच भांडत नाही ... पण प्रत्येक गोष्टीत आमच्या वहिनी...

**इंदिरा** : चूप! एक शब्द बोलू देणार नाही मी—प्रत्येक गोष्टीत मोडता कोण घालतं? तुम्ही का मी? लग्न व्हायच्या आधीपासून पाहते आहे मी तुम्हांला...

**वन्सं** : आणि मी काय तुम्हांला पाहिलं नव्हतं असं वाटतय की काय!

कुटुंब : …ची सगळी माहिती आहे मला. शेजारी काय बोलतात हे सुद्धा
बंड्या आहे मला —
कुत्र्रा : हो जिथं तिथं हुंगायची सवयच आहे ना तुम्हांला मांजरीसारखी…
मी : अहो वन्सं … अहो मंकीकर वहिनी … तुम्ही इथं कशासाठी आलात ते कळेल का मला ?

इंदिरा : रध्याच्या—नाही रघूच्या आईला भेटायचं होतं जरा…

मी : ती सध्या घरात नाही…तुमचा काही निरोप असला तर सांगेन मी तिला…

वन्सं : (इंदिराबाईंना) सांगा…सांगा की आता…

इंदिरा : ह्यांना कशाला सांगायचं ? आपलं बायकाबायकांचं बायकांपुरतच ठेवावं…

वन्सं : हो पण त्यांना तरी कळू दे कशाला आलो होतो ते—

इंदिरा : काही गरज नाही त्यांना कळायची…

वन्सं : काही बिघडणार नाही त्यांना कळलं तर…तुमचा खोटारडेपणा बाहेर पडेल म्हणून भिताय ना…आलं आहे माझ्या लक्षात…

इंदिरा : मुळीच नाही…तसं असतं तर अर्ध्या स्वयंपाकातनं उठून आलेच नसते मुळी…(मला) सहज आले होते म्हणून सांगा. (तरातरा जाते. वन्सं रागावतात)

वन्सं : बघा बघा कशी मेली निघून गेली ती…पक्की खोटारडी अन् एक नंबरची आतल्या गाठीची आहे—

मी : अहो पण मला काहीच कळत नाही हा काय प्रकार आहे ते ?

वन्सं : वहिनी गेल्यावर मी कशाला सांगू ?…मेली असलीच आहे अवसानघातकी (वन्संही फणकाऱ्यानं निघून जातात. मी आश्चर्यचकित होऊन बघत राहतो. बंड्या येतो.)

मी : का रे बंड्या, तू परत का आलास ?

बंड्या : आई म्हणाली रघूदादाला एकट्यालाच येऊ दे बरोबर…

मी : पण रघूदादा गेला का तिच्याबरोबर ?

बंड्या : हो…ना…अगदी पळत गेला…

मी : पळत कशासाठी ?

बंड्या : आई सायकलवर बसून गेली…

**मी** : आई काय ?
**बंड्या** : सायकलवर बसून गेली--
**मी** : (आश्चर्याने) म्हणजे चक्क सायकलवर... बसून आणि गेली ?
**बंड्या** : हो... ना... का ?
**मी** : तसं नव्हे नीट बसली का ती सायकलवर ?
**बंड्या** : अगदी झकास बसली...तशी थोडी लटपटत होती...पण विशेष नाही... पण का हो बाबा, आईला सगळे लोक हसतात तरी ती का हट्टानं सायकल शिकते ? मला कळतच नाही हे...
**मी** : अरे तू तर लहानच आहेस अजून... मी एवढा मोठा असून-- मलासुद्धा कळत नाही... (तेवढ्यात शांडिल्य घाबरेघुबरे होऊन घाइघाईने येतात)
**शांडिल्य** : (येता येता) मला तर अजिबात कळत नाही...
**मी** : का ? तुमचंही कुटुंब सायकलवरनं गेलं ? मग काय कळत नाही तुम्हांला ?
**शांडिल्य** : (त्रस्त) नाही हो... माझा काटा कुठं गेला ते कळत नाही...
(शांडिल्य पलंगाखाली जाऊन येतात)
**मी** : अहो पण कसला काटा ?
**शांडिल्य** : वजनाचा हो...वजनाचा.
**बंड्या** : एक :--वजनाचा काटा जाईलच कसा; दोन :--गेला तरी तो इथं येईलच कसा ? तीन :--इथं आलाच असला तर आम्हांला दिसल्याशिवाय राहीलच कसा ?
**शांडिल्य** : पंत...पंत...तुमचा मुलगा माझी थट्टा करतोय...एक :--मी काय त्याच्याबरोबरीचा आहे ? दोन :--त्यानं असं बोलणं बरं नव्हे. तीन :-- तुम्ही त्याला रागवायला पाहिजे...
**मी** : अहो पण तुमचा वजनाचा काटा शोधायला तुम्ही आमच्या घरात यायचं कारण काय ?
**शांडिल्य** : एक :--तुमच्या कुटुंबाला वजनाचं व्यसन आहे; दोन :--मागं एकदा ह्याच कारणासाठी तुम्ही तो काटा आणला होता--
**मी** : तीन :--
**शांडिल्य** : अजून दोन संपलं नाही...मागं एकदा ह्याच कारणासाठी तुम्ही तो काटा आणला होता आणि मोडला होता; तीन :--त्याच कारणासाठी तो पुन्हा आणला असण्याची शक्यता आहे.

**मी** : आणि चार :– तो आम्ही आणलेला नाही.

**शांडिल्य** : मग माझा एवढा मोठा वजनाचा काटा गेला कुठं ?

**मी** : (वैतागून) गेला असेल मसणात...आम्हांला काय विचारता ?

**शांडिल्य** : एक :– तो काटा निर्जीव आहे त्यामुळे तो मसणात जाणेच शक्य नाही; दोन :– तुम्ही शेजारी आहात म्हणून चौकशी करणे हे माझे कर्तव्य आहे...

**मी** : मग मी सांगतो की तुमचा वजनाचा काटा आम्ही आणलेला नाही आणि तो आमच्या घरात नाही. ती काय काड्याची पेटी आहे खिशातून उचलून आणायला...

**शांडिल्य** : अहो पण रागावता काय असे ? नसला तर नाही म्हणून सांगा... पण मला शोधायला नको माझा काटा ? वजनाच्या भानगडी होतात तुमच्या घरात आणि काटा शोधायला आलो तर रागावता उगाच...मी जातो...पण कुठं सापडला झाडताना घरात तर कळवा मला...(तसेच तरातरा निघून जातात. वंड्या त्यांच्या चालण्याची नक्कल करीत त्यांच्या मागून जातो.)

**मी** : वंड्या...

(तेवढ्यात रघ्या वेड लागलेल्या माणसासारखा 'बाबा' 'बाबा' असा ओरडत व वेडेवाकडे हातवारे करीत धावत येतो)

**रघ्या** : बाबा...बाबा...बाबा...आई...आई...(धाप लागते)

**मी** : अरे पण काय झालं ?

**रघ्या** : बाबा...आई...सायकल...सायकल...

**मी** : (अतिशय अस्वस्थ व उतावीळ होऊन) अरे काय झालं बोल तरी लौकर... बोल...बोल...नीट सांग.

**रघ्या** : आई सायकलवर बसली—

**मी** : मग त्यासाठी एवढा आरडाओरडा कशाला ?

**रघ्या** : नाही हो...आई सायकलवर बसून निघाली आणि पुढच्याच कोपऱ्यावर एक आई आली...

**मी** : आई आली ?

**रघ्या** : आई नाही...म्हैस...म्हैस...आली.

**मी** : काय म्हैस ?

**रघ्या** : हो...

**मी :** आणि त्या म्हशीनं आईला हुंदाडलं असंच ना ? चल चल. कुठाय आई तुझी ? (मी घाई करतो)

**रघ्या :** नाही...नाही...आईनंच म्हशीला सायकलवरनं ढुशी दिली.

**मी :** (घाबरून) कुणी ? आईनं ?

**रघ्या :** हो—

**मी :** मग त्या म्हशीचं काय झालं ?

**रघ्या :** म्हैस बिथरली ... आणि आईवर चालून आली ...

**मी :** म्हणजे फारच भयंकर—

**रघ्या :** पण आई भ्याली नाही काही ! तिनं सायकल ढकलून दिली म्हशीच्या अंगावर ...

**बंड्या :** म्हणजे दादा, आईचं आणि म्हशीचं युद्धच झालं म्हण की ?

**मी :** अरे पण आईला लागलं नाही ना कुठं ?

**रघ्या :** मुळीच नाहीं. अहो आईनं सायकल ढकलून दिल्याबरोबर म्हैस मागं पळाली ... आणि लांब जाऊन आईकडं बघत राहिली ...

**बंड्या :** असं असं म्हणजे बाबा रागावल्यावर लांबून आईकडं बघतात तशीच ना ?

**मी :** गप रे बंड्या—पुढं काय झालं ?

**रघ्या :** म्हैस लांब उभी असलेली बघून आईनं हळूच सायकल उचलली (अभिनय करून दाखवतो) आणि पटकन् सायकलवर बसली.

**मी :** (अनवधानानं) कोण ? म्हैस ?

**रघ्या :** नाही हो...आई...बाबा तुमचा असा कसा हो घोटाळा होतोय आईच्या आणि म्हशीच्या बाबतीत ?...आई सायकलवर बसली आणि पोलिस चौकीच्या रस्त्याला गेली...

**मी :** मग ठीक आहे...मी एवढा घाबरलो होतो...

**रघ्या :** काहीही ठीक नाही बाबा—अहो आई सायकलवरनं पळतेय असं दिसल्याबरोबर म्हैस मोठ्यानं ओरडली आणि चौखूर उधळत गेली ना आईच्या मागं ! आई पुढं आणि म्हैस मागं...अशी रेस चालली होती...अहो रस्त्यातले लोक जोरजोरानं ओरडत होते...टाळ्या वाजवीत होते...शिट्या मारीत होते (शिट्टी मारून दाखवतो) अशा...

**मी :** अरे मग हे आधी नाही का सांगायचं ?—तूं कुठं होतास ?

**रघ्या :** मी रस्त्याच्याकडेनं पळत होतो...पण मला जोरानं पळता येईना... मग मी थांबलो...आई सायकलवरूनच पोलिस चौकीत घुसली.

**मी :** सायकलवर बसून पोलिस चौकीत ? म्हणजे पोलिस चौकीच्या आत ?

**रघ्या :** हो...ना...अगदी वेगानं घुसली—तळमजल्यालाच नाही का ती पोलिस चौकी !...आई सायकलसकट आत गेली आणि तिच्या मागनं म्हैसही गेली--

**मी :** कुठं ? पोलिस चौकीत ?

**रघ्या :** हो...तशीच वेगानं—अहो सगळे पोलिस ओरडत पळापळ करायला लागले...दोघं तिघं तर पडलेच पळताना...मग सगळेच लोक तिकडं धावले— म्हणून मी तुम्हाला सांगायला परत आलो—

**मी :** अरे पण आता आई कुठाय ? म्हैस कुठाय ?

**रघ्या :** मला काहीही माहीत नाही...पण दोघीही पोलीस चौकीतच असा-ल्यात...पण बाबा त्या गोंधळात बाळक्यामामा मात्र पळाला पोलिस चौकीतून... धूम पळाला...बाहेर पडताना मी बघितलं त्याला. नंतर मात्र मला दिसलाच नाही तो गर्दीत—

**मी :** बाप रे...म्हणजे काहीतरी भलताच प्रकार झालेला दिसतो—तू असं कर...तू आणि बंड्या इथंच थांबा. मी आत्ता जाऊन येतो...परमेश्वरा आणखी काय काय चमत्कार तू दाखवणार आहेस कुणास ठाऊक ?

(मी घाईघाईने कोट घालतो. धोतराचा काचा आवळतो. चप्पल घालायच्या तयारीत असतो. तेवढ्यात पाय मुरगळल्याने लंगडत असलेला पोलिस सब-इन्स्पेक्टर हातात पिस्तुल घेऊन येतो. त्याच्यामागे दोन तीन पोलिस आहेत. कुणाच्या डोक्याला पट्टी आहे...कुणाच्या हाताला फडके बांधलेले आहे. सर्वजण तोंडं वेडीवाकडी करीत लंगडत येतात. त्यांच्यामागे पानवाला, सलूनवाला आहेत. पण ते ठीक आहेत. पोलिस इन्स्पेक्टर रागारागाने बोलतो पण पायातून कळा निघत असल्याने मध्येच त्याचा राग ओसरतो. तो विव्हळतो.)

**सब-इन्स्पे० :** गोळी घालीन मी...मागंपुढं पाहणार नाही...

**मी :** (काय करावं हे न समजून जागच्याजागीच अस्वस्थ झालेला) साहेब...साहेब...

**सलूनवाला :** हाच हाच साहेब तिचा नवरा...

**सब-इन्स्पे० :** ती कुठाय ? कुठाय !

**मी :** कोण ती ?

**सब-इन्स्पे०** : तुमची बायको—

**मी** : म्हणजे ? माझ्या कुटुंबानं काय केलं साहेब ?

**सब-इन्स्पे०** : काय करायचं ठेवलं आहे ?

**मी** : मी नाही समजलो ?

**पोलिस** : (डोक्याची पट्टी दाखवीत) हे बघा म्हणजे तरी समजेल...

**सब-इन्स्पे०** : (एका पायावर उड्या मारीत) मेलो...मेलो...(पायातील कळा असह्य होतात पटकन पलंगावर बसतो.)

(माझी उगीचच इकडून तिकडे धावपळ. सब-इन्स्पे० पुढे हात जोडून उभा राहतो.)

**मी** : साहेब...मी गोंधळून गेलो आहे...मला काहीएक कळेनासं झालं आहे.

**सब-इन्स्पे०** : अहो तुमच्या बायकोनं सगळी पोलिसचौकी उधळून टाकली.

**मी** : उधळून !

**पोलिस** : हो — हो — तुमच्या बायकोनं आणि तुमच्या म्हशीनं...

**मी** : माफ करा... म्हैस माझी आहे...बायको माझी नाही...

**सब-इन्स्पे०** : काय म्हणालात ?

**मी** : नाही — नाही चुकलो — बायको म्हशीची आहे. नाही नाही — म्हैस बायकोची आहे—

**सब-इन्स्पे०** : चूप थट्टा करता माझी ?

**मी** : साहेब...मी घाबरलोय हो...मला म्हणायचय...मला म्हणायचंय... म्हैस माझी नाही...

**सब-इन्स्पे०** : पण बायको तरी तुमचीच आहे ना ?

**मी** : हो... हो...माझीच आहे...गळ्या शप्पत माझी आहे...

**सब-इन्स्पे०** : मग तिला काय म्हशीबरोबर खेळायला सोडलीत बाहेर ?

**मी** : तसं नाही—साहेब, मला कळलं आहे सगळं काही—ती म्हैस मागं लागल्यामुळे घाबरली असेल...

**सब-इन्स्पे०** : घाबरली असेल म्हणे...अहो पोलिस चौकी म्हणजे काय मैदान आहे सायकल चालवायचं ! तुमची बायको सायकलवर बसून पोलिस चौकीत घुसली...आम्ही—अहो बाई—अहो बाई—म्हणेपर्यंत टेबलाला घसटून मागच्या दारानं बाहेरसुद्धा गेली...आम्ही जागचे उठून उभे राहतों तों तिच्या मागनं म्हैस शिरली पोलिस चौकीत...आम्हांला धडका मारून म्हैसही

सायकलीच्या मागनं पळत गेली...खुर्च्या उलट्या पालट्या झाल्या, टेबल कलंडलं, पाण्याचा माठ फुटला...माझा पाय मुरगळला...ह्या शिपायाच्या डोक्याला लागलं...त्याच्या हाताला लागलं...

**मी** : फारच भयंकर...फारच भयंकर...साहेब...

**सब-इन्स्पे०** : तुमची बायको भयंकर...तुमची म्हैस भयंकर...

**मी** : साहेब पुन्हा एकदा सांगतो...ती म्हैस माझी नाही...माझा आणि म्हशीचा काहीही संबंध नाही...

**सब-इन्स्पे०** : अहो...आम्ही पोलिस मंडळी...लोकांच्या तक्रारी ऐकायचं काम आमचं–आम्ही कुणाकडं जायचं? कुठाय तुमची बायको?

**मी** : ती इथं आली नाहीं अजून...

**सब-इन्स्पे०** : मग म्हैस कुठाय? अरे, बाई माणूस म्हणून गय केली नाहीतर एका गोळीत खलास केली असती तिला—

**मी** : पण साहेब...आपण सांगितलेल्या हकिगतीवरून पाहता खरी दोषी असेल तर ती म्हैस...आमचं कुटुंब नाहीं...साहेब, तुमचा पाय मुरगळला तो म्हशीमुळं...

**सब-इन्स्पे०** : म्हैस काय अन् तुमची बायको काय...तसा काय फरक आहे त्यांच्यात? दोघीही सारख्याच आडदांड—

**मी** : खूप आहे...खूप फरक आहे साहेब...माझं कुटुंब सायकलवर बसतं... म्हशीला येतं का बसता? माझ्या कुटुंबाला दोन मुलं आहेत. म्हशीला किती आहेत हे सांगाल का तुम्ही? उगाच म्हशीचं कातडं आमच्या कुटुंबाला लावायचा प्रयत्न करू नका साहेब—

(सब-इन्स्पे०, पोलीस, पानवाला, सलूनवाला–सगळे कावकाव करतात. कुणाचं बोलणं कुणाला कळत नाहीं. सगळे तावातावानं बोलतात. या गोंधळात बेडके तालीम मास्तर धावत बाहेरून येतात)

**बेडके** : पंत...अहो पंत...कुणाचा तरी पाय मुरगळल्याचं कळलं...धावत आलो...अहो नोकरी सुटली...फक्त पायावर जगतो आहे–बऱ्याच दिवसांत एकही पाय हाताला लागला नाही हो—

**मी** : अहो पण—

**बेडके** : पंत...मुरगळलेल्या पायावरच माझं पोट आहे हो. तेव्हा माझ्या पोटावर पाय देऊ नका हो...कुणाचा पाय मुरगाळला आहे?

(सलूनवाल्याचा पाय धरतो. सलूनवाला 'हॅट' करून त्याला दूर ढकलतो. एका पोलिसाचा पाय धरतो. पोलिसही धुडकावतो. हा प्रकार चालू असतान दुसरा पोलिस व पोलिस सबइन्स्पेक्टर आपापसात काही बोलत असतात. त्यांचे लक्ष नसताना बेडके मास्तर पटकन जाऊन पोलिस सबइन्स्पेक्टरचा पाय धरतो. सबइन्स्पेक्टर ओरडतो)

**सब-इन्स्पे०** : ओय...मेलो —मेलो—(पाहातो. पिस्तूल रोखतो.) ठार मारीन.. म्हैस सोडलीस कशाला रस्त्यावर ? आता पाय धरायला आला आहे बदमाष...

**बेडके** : अहो, साहेब...

**सब-इन्स्पे०** : पकडा या हरामखोराला...

**मी** : अहो साहेब...साहेब...त्यांचासुद्धा म्हशीशी काहीही संबंध नाही...

**सब-इन्स्पे०** : संबंध नाही ? अरे मग कुणाचा आहे संबंध त्या म्हशीशी ? हा कोण आहे मग ?

**बेडके** : मी...मी...बेडके तालीम मास्तर आहे...(पिस्तुलाकडे बोट दाखवून) ते ते...जरा आत ठेवा...अहो अपघातानं गोळी सुटायची एखादवेळी...मी मुरगाळलेले पाय दुरूस्त करतो...आपला पाय मुरगाळला म्हणून धावत आलो—

**सब-इन्स्पेक्टर** : असं...असं...म्हणजे तुम्ही पाय दुरुस्त करायला आलात ?

**बेडके** : हो...ना...मग देता ना पाय तेवढा साहेब ?

**सब-इन्स्पेक्टर** : बेतानं बघा...फार दुखतोय हो पाय...कळा येताहेत सारख्या...ओय्...ओय्...

**बेडके** : काही एक चिंता करू नका साहेब...मी व्यवस्थित करतो तुमचा पाय.

(पाय धरून दाबू लागतो. इन्स्पेक्टर ओरडतो. पोलीस, पानवाला, सलूनवाला त्या दोघांच्या भोवती गोळा होतात. बंड्या टेबलावर चढून वाकवाकून बघतो. रध्या बाहेरच्या दारात आहे. मी चोळामोळा होऊन उंदरासारखा अंग चोरून स्टेजच्या एका टोकाला उभा आहे. तितक्यात बाळक्याची तथाकथित प्रेयसी सुरेखा घाबरी होऊन धापा टाकीत येते आणि थेट पोलीस इन्स्पेक्टरकडे जाते)

**सुरेखा** : इन्स्पेक्टरसाहेब, मला फसवलं हो...

**इन्स्पेक्टर** : कुणी ? कशासाठी ?

**सुरेखा** : अहो इथंच राहात होता मेला तो...बाळकराम नाव त्याचं...

**सलूनवाला** : तोच तो साहेब...आम्ही मघाशी आपल्याकडं आणला होता तोच...

**सुरेखा** : (रडू लागते) माझ्याकडनं शंभर रुपये घेतले मागून त्यानं...

**सब-इन्स्पे०** : पण तुम्ही का दिलेत ?

**सुरेखा** : प्रेम करीत होते मी त्याच्यावर !

**सलूनवाला** : प्रेम केलत ते ठीक झालं पण पैसे कशाला दिलेत !

**पानवाला** : पक्का चारसोबीस आदमी है...

**सुरेखा** : (रडतेच आहे) मला माझे वडील मारतील हो आता...त्यांच्या कपाटातले पैसे काढून मी त्याला दिले...म्हणाला उद्या सकाळी पैसे आणून देतो...पुन्हा गुपचूप कपाटात ठेवून दे...

**सब-इन्स्पे०** : कुठनं आणणार होता पैसे ?

**सुरेखा** : वजन करायचं एक यंत्र आहे म्हणाला माझं...ते विकून टाकणार आहे म्हणाला लगेच...

**मी** : (शांडिल्याच्या हरवलेल्या वजनाच्या काट्याची आठवण होऊन) वजन करायचं यंत्र ?

**सुरेखा** : हो—पण दोन दिवसापूर्वी म्हणाला तुझे पैसे देता येत नाहीत... मोहब्बत पण आता जमायची नाही...

**बेडके** : काय माणूस आहे हो...माझ्या तावडीत सापडला असता तर त्याची मानगूटच धरली असती (असं म्हणता म्हणता इन्स्पेक्टरचा पाय जोरात ओढतो. इन्स्पेक्टर बेंचीच्या देठापासून कोकलतो. सर्वजण त्याला शांत करतात. इन्स्पेक्टर थोडासा स्थिरावतो. सर्वजण पुन्हा आपापल्या जागा घेऊन बसतात. तेवढ्यात रघ्या बाहेरून वेड लागल्यासारखा धावत येऊन ओरडतो)

**रघ्या** : बाबा...बाजूला व्हा...बाजूला व्हा...(मी पटकन बाजूला होतो. रघ्याही टुणकन उडी मारून टेबलावर चढतो. पोलिस इन्स्पे० वगैरे ह्या आरडा ओरड्याने थक्क त राहातात. कुटुंब सायकल हातात धरून पिसाटासारखे बाहेरून धावत येते आणि इकडे तिकडे न पाहता सायकलसह स्वयंपाकघरात जाऊन धडकते. आतून डबे, परण्या, कपबश्या, भांडी कोसळल्याचा प्रचंड आवाज येतो. स्टेजवरील सर्व मंडळी भेदरून पलंगावर उभी राहतात. मी कानात बोटे घालून डोळे घट्ट मिटून मध्यभागी उभा राहतो. आणि रघ्या पुन्हा एकदा धावत येऊन मला मिठी मारतो.)

**रघ्या** : (ओरडून) बाबा — बाबा — म्हैस — आली... (एवढे म्हणेपर्यंत म्हशीचे मुंडके शिंगांनी हुंदडल्यासारखं करीत खिडकीशी येते. खिडकीतच थांबते. सारखे हुंदडल्या-सारखे करीत राहते. इतर सर्वजण अवाक होऊन बघत राहतात. म्हशीच्या भीतीने

भिंतीला चिकटून उभे राहतात. त्याच वेळी आतून कुटुंब बाहेर येते आणि म्हैस पाहताच किंचाळते.)

**कुटुंब :** नाही...नाही...त्या म्हशीला मारा...हाकला...

**मी :** (शांतपणे) नाही...ती आता जाणार नाही...तू सायकल चालवून तिला जखमी केलं आहेस...

**कुटुंब :** नाही...मी पुन्हा कधीही सायकल चालवणार नाही...

**मी :** (आनंदाने टुणकन उडी मारून) काय म्हणालीस ! ते अमृताचे बोल पुन्हा एकदा ऐकू दे तुझ्या तोंडून मला !

**कुटुंब :** (घाबरून) खरंच हो...मी पुन्हा कध्धी कध्धी सायलवर बसणार नाही—तुमच्या गळ्याशप्पत—रघ्या बंडयाच्या शप्पत—

**मी :** (भलत्याच आत्मविश्वासाने) पुढं ये अशी—सांग त्या म्हशीला—घे शपथ तिच्या पायांची नाही नाही—खुरांची—

**कुटुंब :** (धावरत घाबरत पुढं येते) मी शप्पथ घेते—माझे यजमान सांगतील तसं वागेन...नेहमी त्यांच्या आज्ञेत राहीन...

**मी :** (म्हशीला) ऐकलंस का ग बाई तूं नीट?

(कुटुंब म्हशीपुढे हात जोडून उभे राहाते, सर्वजण हा चमत्कार पाहून त्तिमित होतात आणि मागचा पडदा पडतो. मी आनंदानं उड्या मारीत पुढच्या पडद्यावर येतो. माईकपुढं उभा राहतो.)

**मी :** मंडळी...आता बोला...माझ्या अद्वितीय आनंदाचं कारण आलं की नाही तुमच्या लक्षात? अहो 'म्हैस येता माझ्या घरा तोचि दिवाळी दसरा' अशी स्थिती झाली आहे माझी. मला तर आनंद झालाच पण त्या म्हशीलासुद्धा आनंद झाला...ती चक्क हसली...खरंच हसली...आम्हीसुद्धा सध्या म्हशी-सारखे आणि म्हशीइतकेच आनंदात आहोत. मंडळी, आणखी एक गुपित सांगतो तुम्हाला...अहो प्रॉव्हिडंट फंडातून पैसे काढून मी एक म्हैस खरेदी करून कायमचीच घरात ठेवायचं ठरवलं आहे...नाहीतरी कुटुंब पाळतोच आहोत. त्यात आणखी एक म्हैस...आणि संसाराचं महान सूत्र लक्षात ठेवा तुम्हीही...कुटुंब वठणीवर आणायचं असेल तर बाई ठेवू नका, एक म्हैस ठेवा !

**पडदा**

IRBK-0120002

शाखा. २८।१०।८३
क्र. २०००२

[illegible]

[illegible]

[illegible]